



सोलापूर

# तरुण भारत


न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर | गुरुवार, २९ जानेवारी २०२६ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक ६३। पाने ८+४+४ । किंमत रु. ६/-

RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही


# महाराष्ट्राचा दादा हरपला





विशेष संपादकीय

## असा 'दादा' पुन्हा होणे नाही...

अजित पवार यांचा जन्म २२ जुलै १९५९ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील देवळाली प्रवरा येथे झाला होता. ते शरद पवार यांचे मोठे भाऊ अनंतराव पवार यांचे सुपुत्र होत. अजित यांचे वडील चित्रपटसृष्टीशी संबंधित होते आणि मुंबईतील व्ही.शांताराम यांच्या राजकमल स्टुडिओमध्ये काम करत होते. पवारांचे आजोबा, गोविंदराव पवार, बारामती सहकारी व्यापारात काम करत होते आणि त्यांच्या आजी शेतीची देखभाल करत होत्या. अजित यांच्या मोठ्या भावाचे नाव श्रीनिवास आहे. श्रीनिवास कृषी आणि ऑटोमोबाईलशी संबंधित मोठे व्यावसायिक आहेत. असे म्हटले जाते की अजित आपल्या महत्त्वाच्या निर्णयांमध्ये मोठ्या भावाचा सल्ला घेत असत. त्यांनी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी हायस्कूल, बारामती येथून आपले प्राथमिक शिक्षण घेतले. कॉलेजमध्ये असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. अजित यांनी महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठातून पदवी संपादन केली आहे. अजितदादा सुरुवातीला शरद पवारांचे खासगी सचिव होते. बालपणाची आठवण सांगताना ते म्हणाले होते, मी सुरुवातीपासूनच माझ्या काकांना घाबरत होतो, पण आम्हा भावंडांमध्ये नेहमीच प्रेम होते. मला वाटते की, पक्ष आणि कुटुंब वेगळे ठेवले पाहिजेत. अजित यांनी महाराष्ट्राचे माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांच्या बहीण सुनेत्रा पवार यांच्याशी विवाह केला आहे. त्यांना जय पवार आणि पार्थ पवार अशी दोन मुले आहेत. सुप्रिया सुळे या अजित यांच्या चुलत बहीण आहेत.

अजित पवार १९८२ मध्ये पुण्यातील एका सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर निवडून आले. यामुळे त्यांच्या सक्रिय राजकीय कारकिर्दीची सुरुवात झाली. त्यांचे काका शरद पवार यांच्या निगराणीखाली त्यांनी झपाट्याने प्रगती केली. अजित पवार पहिल्यांदा १९९१ मध्ये बारामती येथून लोकसभेचे खासदार झाले, परंतु त्यानंतर त्यांनी शरद पवारांसाठी ही जागा सोडली. त्याच वर्षी ते बारामती येथून आमदार झाले आणि त्यानंतर १९९५, १९९९, २००४, २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ मध्ये सलग विजयी झाले. त्यांनी सिंचन, वित्त, कृषी आणि ग्रामीण विकास अशी महत्त्वाची खाती सांभाळली. महाराष्ट्राचे सहा वेळा उपमुख्यमंत्री म्हणून काम केले आणि डिसेंबर २०२४ पासून देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये पुन्हा उपमुख्यमंत्री म्हणून काम केले. महाराष्ट्रातील सहकारी संस्था आणि विविध शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, सामाजिक संस्थांसाठीही त्यांनी भरीव काम केले.

पोटात काहीही न ठेवता, थेटपणे बोलणारा माणूस. एवढा कणखर, मनमोकळा आणि दिलखुलास नेता मी दुसरा पाहिला नाही. अजित पवार हे यशवंतराव चव्हाणांच्या राजकारणाच्या तालमीत तयार झालेले, त्या विद्यापीठाचे राजकारणी. सत्ता मिळवायची-टिकवायची. त्यासाठी सगळे अपराध मान्य. मात्र, ही सत्ता लोकांसाठी आहे, हे कधी विसरायचे नाही. संसदीय राजकारणाची शिस्त समजणारे होते. उभा-आडवा महाराष्ट्र त्यांना माहित होता. अजित पवारांनी कधीही जातीचे राजकारण केले नाही. कधीच धर्माचे राजकारण केले नाही. लोकांचे काम करा आणि निवडून या, हा त्यांचा साधा खाक्या होता. अर्ध्या रात्रीही अजित पवार लोकांसाठी उभे असायचे. सतत काम करत असायचे. शरद पवार नावाच्या वटवृक्षाखाली वाढत असताना, एवढी स्वतंत्र उंची मिळवणे, ही सोपी गोष्ट नाही. काकांचेच बोट धरुन ते राजकारणात आले, हे खरे. पण त्यानंतर त्यांनी आपली स्वतःची ओळख तयार केली. ती स्वतःच्या कर्तबगारीने तयार केली. अहोरात्र मेहनत करुन, लोकांमध्ये जाऊन, स्वतःचे लोक मिळवून आपली ओळख त्यांनी तयार केली. कुटुंबात धाक, पक्षात दरारा, समाजात भीतीयुक्त आदर, मित्रपक्षांसह विरोधकांमध्येही प्रेमाने सन्मान, प्रशासनावर मजबूत पकड तर प्रशासनातले अधिकारी त्यांना घाबरत, कारण त्यातील ओळ ना ओळ त्यांना ठाऊक असे. महाराष्ट्राच्या राजकारणात ज्यांना राजकीय धुरंधर म्हणून ओळखले जाते, असे अजितदादांचे काका शरद पवार यांनाही त्यांनी वयोमानानुसार आता राजकारणातून निवृत्त व्हा आणि आम्हाला मार्गदर्शन करा असे ठामपणे न घाबरता सांगितले, असा हा खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचा लाडका असणारा 'दादा' हरपला. अजितदादांच्या अपघाती निधनानंतर अवघा महाराष्ट्र हळहळतोय, रडतोय, नेते अश्रू ढाळताहेत तर मित्रपक्षांसह विरोधकांच्या चेहऱ्यावरही दुःखाचे सावट आहे हीच खरी ते महाराष्ट्राचे लाडके दादा होते याची पोचपावती होय.

लोकांचे काम करा आणि निवडून या हा संदेश आपल्या सहकारी व कार्यकर्त्यांना देणारे अजितदादा यांचा दिवस पहाटेपासूनच सुरु व्हायचा. अगदी सकाळपासूनच ते नागरिक, कार्यकर्ते, नेत्यांना भेटायचे. जे काम होणारे आहे ते करणारा आणि जे होणार नाही ते होणार नाही, असे स्पष्ट सांगणारा नेता, वेळ पाळणारा, शब्द दिल्यानंतर तो खरा करणारा, काही चुकल्यास कबुली देवून प्रायश्चित घेत आत्मक्लेष करणारा, स्पष्टवक्ता, रागिष्ठ प्रसंगी प्रेमळ कधी रागाने बोलणारा तर कधी विनोद, हसीमजाक करुन समोरच्यांची मने जिंकणारे, पत्रकारांवर देखील प्रसंगी रागावणारे तर वेळेप्रसंगी आपुलकीने विचारपूस करणारे अजितदादा यांनी आपल्या राजकीय व्यक्तीमत्वाची सोडलेली आगळीवेगळी छाप महाराष्ट्र कधीच विसरु शकणार नाही. उपमुख्यमंत्रीपदावर विक्रमी निवड होणारे अजितदादा यांची मुख्यमंत्रीपदाची इच्छा मात्र अपुरीच राहिली. अजितदादा तूम्हाला महाराष्ट्र कधीच विसरु शकणार नाही, कारण तूम्हीच खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे लाडके दादा होते.

**- प्रशांत माने, मुख्य संपादक.**
**(मो.९८८११९१४४३)**

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू

## अंत्यदर्शनासाठी प्रमुख नेत्यांसह लोटला जनसागर

## आज स.११ वाजता बारामतीच्या विद्याप्रतिष्ठान येथे अंत्यसंस्कार

## दृश्यमानता कमी हे अपघाताचे प्रथमदर्शनी कारण

## पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे राहणार उपस्थित

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, दि. २८ जानेवारी-**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार (६६) यांचे बारामती येथे निधन झाले. बुधवार २८ जानेवारी रोजी सकाळी बारामती येथे त्यांचे विमान कोसळले. बारामती विमानतळावर लँडिंग दरम्यान हा अपघात झाल्याचे वृत्त आहे. विमानात त्यांच्यासोबत असलेले त्यांचे वैयक्तिक सहाय्यक, सुरक्षा कर्मचारी आणि विमान कर्मचाऱ्यांचाही मृत्यू झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे अंत्यसंस्काराला गुरुवारी उपस्थित राहणार आहेत.

अजित पवार पंचायत निवडणुकीसाठी जाहीर सभेला संबोधित करण्यासाठी बारामतीला जात होते. महाराष्ट्र हवाई वाहतूक विभागातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, विमान लँडिंगसाठी बारामती विमानतळाजवळ येत होते. सुरुवातीला पायलटला धावपट्टी स्पष्ट दिसत नव्हती, म्हणून त्याने विमान जास्त उंचीवर नेले. रिपोर्टनुसार, त्यावेळी दृश्यमानता सुमारे २ हजार मीटर होती. विमान लँडिंगचा पहिला प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर, बारामतीच्या धावपट्टी ११वर उतरण्याचा दुसरा प्रयत्न करण्यात आला. या दरम्यान, विमान धावपट्टीवरून घसरले आणि क्रॅश झाले. त्यानंतर लगेचच त्यात आग लागली. लँडिंग दरम्यान पायलटने कोणतेही आपत्कालीन सिग्नल दिले नाहीत, असेही वृत्त आहे. त्याने मेडे कॉल देखील केला नाही. घटनेच्या वेळी बारामती फ्लाइंग क्लबमध्ये कोणतेही विमान उडत नव्हते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी शासकीय सुट्टी आणि तीन दिवसांचा राजकीय दुखवटा जाहीर केला आहे. अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी सकाळी ११ वाजता बारामतीत अंत्यसंस्कार होणार आहेत. अजित पवार यांची पत्नी सुनेत्रा पवार, काका शरद पवार, अजित पवारांचे दोन्ही मुले आणि बहीण सुप्रिया सुळे बारामतीत दाखल झाले आहेत. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे आज अजित पवार यांच्या अंत्यसंस्कारासाठी बारामतीत येणार आहेत.

दरम्यान, विमान अपघात तपास ब्युरो (एएआयबी) ने अपघाताची चौकशी सुरू केली आहे. तपास यंत्रणेचे एक पथक दिल्लीतील विमान संचालक व्हीएसआर व्हेंचर्सच्या कार्यालयात पोहोचले होते. दुसरे पथक बारामतीला रवाना झाले. तर व्हीएसआर व्हेंचर्सने म्हटले की, पायलटला १६ हजार तास विमान उड्डाणाचा अनुभव होता, तर सह-वैमानिकाला १ हजार ५०० तासांचा अनुभव होता. विमानात कोणतीही तांत्रिक बिघाड नव्हता, असा दावा कंपनीने केला आहे.

**दृश्यमानता कमी हे अपघाताचे प्रथमदर्शनी कारण : विमान मंत्री मोहोळ**

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले, प्राथमिक निरीक्षणांवर आधारित, पहिल्या दृष्टीक्षेपात जे दिसत आहे आणि आम्हाला जी माहिती मिळत आहे, त्यानुसार आमचे केंद्रीय मंत्रिमंडळ मंत्री (नागरी विमान वाहतूक), राम मोहन नायडू हे देखील येथे उपस्थित आहेत आणि ते सकाळपासून सर्व माहितीचा आढावा घेत आहेत. आम्ही एकत्रितपणे गोळा करत असलेल्या माहितीच्या आधारावर, असे म्हणता येईल की, पहिल्या दृष्टीक्षेपात ही समस्या दृश्यमानतेशी संबंधित असल्याचे दिसते.

### 'हा निव्वळ अपघात, यामध्ये राजकारण आणू नका' : शरद पवार यांचे आवाहन

अजित पवार ह्यांचा अपघाती मृत्यू हा महाराष्ट्राला प्रचंड मोठा धक्का आहे. एक कर्तृत्ववान आणि निर्णय घेण्याची शक्ती ज्यांच्यात आहे अशा व्यक्तीला महाराष्ट्र आज मुकला. हा निव्वळ अपघात होता ह्यामध्ये राजकारण आणू नका, असे आवाहन देशातील जेष्ठ नेते व राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी केले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघाताबाबत देशभरातील काही नेत्यांनी संशय व्यक्त करून याप्रकरणी सखोल न्यायालयीन चौकशी करावी, अशी मागणी केली आहे. त्याबाबत वृत्तवाहिन्यावरही उलटसुलट चर्चा सुरु आहे. त्यामुळे अजित पवार यांचे चुलते व राजकीय गुरु शरद पवार यांनी बुधवारी सोशल मीडियावर आपली प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. त्यात त्यांनी म्हटले आहे की, ' अजित पवार यांच्या जाण्याने जे काही नुकसान झाले आहे ते भरून निघणार नाही. पण सगळ्याच गोष्टी काही आपल्या हातात नसतात. मी आज मिडियासमोर येणार नव्हतो. पण काही माध्यमांमध्ये ह्या अपघातामागे काही राजकारण आहे, अशा प्रकारची भूमिका कलकत्त्यावरून मांडली गेली, असे कळले. पण यात राजकारण नाही हा निव्वळ अपघात आहे. या मृत्यूच्या यातना महाराष्ट्राला, आम्हा सगळ्यांना आहेत. कृपया यात राजकारण आणू नये. एवढेच सांगायचे आहे, असेही आवाहन त्यांनी केले आहे.

### सहकार क्षेत्रात विशेष योगदान

महाराष्ट्रातील बारामतीमध्ये घडलेल्या विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह अनेक लोकांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत दुःखद आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी, विशेषतः सहकारी क्षेत्रात त्यांच्या विशेष योगदानासाठी त्यांना नेहमी स्मरण केले जाईल.

**- द्रौपदी मुर्मू, राष्ट्रपती**

### जनतेची सेवा करण्यात आघाडीवर

'अजित पवार हे जनतेचे नेते होते. त्यांचे तळागाळातील लोकांशी मजबूत संबंध होते. महाराष्ट्राच्या जनतेची सेवा करण्यात आघाडीवर असलेले कष्टाळू व्यक्तिमत्व म्हणून त्यांचा सर्वत्र आदर केला जात असे. त्यांच्या कुटुंबीयांना आणि चाहत्यांना मी श्रद्धांजली अर्पण करतो.

**- नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

### धाडसी, निर्भय नेते

पवार हे अत्यंत समर्पित, धाडसी आणि निर्भय नेते होते. राज्यातील प्रत्येक निर्णयाची सखोल माहिती घेत, जनतेच्या हितासाठी कार्य करणारा नेता होता.

**- अमित शहा, केंद्रीय गृहमंत्री**

### धाडसी, निर्भय नेते

अजितदादांशी जवळचा संबंध राहिला आहे. त्यांचे प्रशासनिक कौशल्य, विकासात्मक दृष्टिकोन, लोकांना जोडण्याची हातोटीमुळे कायमच ते महाराष्ट्राच्या राजकारणात एक अढळ स्थान राहिले आहे.

**- नितीन गडकरी, केंद्रीय मंत्री**

### हा दुखद प्रसंग

अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या अकाली निधना मुळे तीव्र दुःख झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास सद्गती देवो व पवार यांच्या कुटुंबीयांना, सहकाऱ्यांना आणि असंख्य समर्थकांना हा दुखद प्रसंग सहन करण्याचे धैर्य प्रदान करो.

**आचार्य देवव्रत, राज्यपाल, महाराष्ट्र**

### दिलदार मित्र गमावला

जमिनीशी घट्ट नाळ असलेले जननेते, माझे मित्र आणि सहकारी, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्याची घटना मनाला अत्यंत व्यथित करणारी आहे. मनाला चटका लावणारी आहे. 'माझा दमदार आणि दिलदार मित्र मी गमावला आहे. माझ्यासाठी ही वैयक्तिक हानी आहे.

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

### मोठा भाऊ गेल्याची भावना

अजित दादा माझ्यापेक्षा अनुभवाने आणि वयानेही मोठे होते. त्यांच्या निधनाने माझा मोठा भाऊ गेल्याची भावना माझ्या मनात आहे. त्यांच्याकडे 'वेळ' साधण्याचा अप्रतिम गूण होता. वित्तमंत्री म्हणून त्यांच्याकडे सगळ्याच खात्यांबाबत माहिती असायची.

**- एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री**

### नेहमी सहकार्याची भूमिका

हजरजबाबीपणा, मनात काही न ठेवणारे, जे आहे ते बोलून दाखवणारे असे ते व्यक्तिमत्व होते. पवार आणि शिंदे घराण्याची कौटुंबिक संबंध फार जुने आहेत. सोलापूरसाठी त्यांची नेहमी सहकार्याची भूमिका असायची.

**- सुशीलकुमार शिंदे,**
**माजी केंद्रीय गृहमंत्री**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# अजितदादांना मान्यवरांची श्रध्दांजली

### विकासाची दूरदृष्टी असलेला नेता हरपला

अजितदादा पवार यांनी व मी राज्याच्या मंत्रीमंडळात मिळून काम केले आहे. ते आपली मते स्पष्ट व परखडपणे मांडत होते. त्यांना विकासाची दूरदृष्टी होती. कार्यकर्ता कसा जपावा, त्याला बळ कसे द्यावे हे अजितदादांकडून शिकण्यासारखे होते. त्यांनी आयुष्यभर सर्वसामान्य व गोरगरीब जनतेचे हित जोपासले.

**-विजयसिंह मोहिते-पाटील, माजी उपमुख्यमंत्री**

### धडाडीचे, कर्तबगार व लोकाभिमुख नेतृत्व गमावले

स्पष्टवक्तेपणा, प्रशासनावर मजबूत पकड, जनतेच्या प्रश्नांची सखोल जाण आणि ते सोडवण्याची क्षमता असलेल्या अजित दादा यांच्या निधनाने महाराष्ट्राने धडाडीचे कर्तबगार व लोकाभिमुख नेतृत्व गमावले आहे. कामाच्या बाबतीत ते अत्यंत स्पष्ट, वक्तशीर, कणखर आणि निर्णयक्षम भूमिका घेत असत. कोणत्याही पक्षातील कार्यकर्ता असो, त्याच्या मदतीसाठी ते सदैव तत्पर असत.

**: हर्षवर्धन सपकाळ (प्रदेशाध्यक्ष,काँग्रेस)**

### शिस्तबद्ध, आणि एक कार्यतत्पर नेतृत्व

महाराष्ट्राने एक कणखर, शिस्तबद्ध, वक्तशीर आणि कार्यतत्पर नेतृत्व गमावले आहे. ही पोकळी कधीही भरून निघणार नाही, प्रशासनावर जबरदस्त पकड आणि महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास असलेले धडाडीचे नेते अशी त्यांची ओळख होती.

**: रविंद चव्हाण (भाजपा प्रदेशाध्यक्ष)**

### महाराष्ट्राचे काळीज चारणारे दुःख

अजितदादा पवारांचे निधन हे दुःखदायक आणि धक्कादायक आहे. त्यांच्या निधनाने दिलदार आणि दमदार नेतृत्व व महाराष्ट्राचा लाडका दादा हरपला आहे. महाराष्ट्राची अपरिमीत आणि कधीही भरुन येणार नाही अशी हानी झाली आहे.

**: ना. रामदास आठवले (केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री)**

### आम्ही आमचा कुटुंबप्रमुख गमावला

आजचा दिवस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह संपूर्ण महाराष्ट्रासाठी अत्यंत दुःखद आणि काळा दिवस ठरला. आम्ही आमचा कुटुंबप्रमुख गमावला आहे. त्यांचे आकस्मिक निधन हे धक्कादायक आणि मन पिळवटून टाकणारे आहे. त्यांच्या निधनाने एक कुशल प्रशासक, अभ्यासू, रोखठोक आणि सदैव ग्रामीण महाराष्ट्राच्या विकासाचा विचार करणारे कर्तृत्ववान नेतृत्व हरपले आहे.

**: खा.सुनिल तटकरे (राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष )**

### आमचा आधारस्तंभ हरपला

ही घटना अत्यंत वेदनादायी आणि धक्कादायक आहे. अनेक वर्षे मी त्यांच्यासोबत काम केले. त्यांचे आणि माझे राजकारणापलीकडे कौटुंबिक संबंध होते. माझ्यासाठी ही फार मोठी वैयक्तिक हानी आहे.

**: खा. प्रफुल पटेल (राष्ट्रीय कार्याध्यक्ष,राष्ट्रवादी काँग्रेस)**

### उमद्या, सतत हसतमुख आणि जिंदादिल व्यक्तीमत्व

अजितदादांचे अचानक जाणे हे संपूर्ण महाराष्ट्रासाठी धक्कादायक आहे. त्यांच्यासारख्या उमद्या, सतत हसतमुख आणि जिंदादिल व्यक्तीच्या अकस्मात निधनाची बातमी कधी कानावर येईल, असे मलाच काय, महाराष्ट्रातील कोणत्याही व्यक्तीला वाटलं नसेल. व्यक्तिगत मला स्वतः लाही यातून सावरणं खूप कठीण जाणार आहे

**: छगन भुजबळ (अन्न व नागरी पुरवठामंत्री)**

### दादांच्या जाण्याने मनाला चटका

दादा अशी एक्झिट घ्यायची नव्हती. तुम्ही जीवाला चटका लावून गेलात... तुम्ही सदैव स्मरणात रहाल.. तुमच्याबरोबर प्रवास केला, चर्चा केल्या, अगदी गप्पाही खूप मारल्या.. तुमचा राजकीय आणि अकडमिक सेन्स खूप जबरदस्त होता.

**: पंकजा मुंडे ( पर्यावरण मंत्री)**

### वक्तशीर आणि कार्यतत्पर नेतृत्व गमाविले

त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्राने एक कणखर, शिस्तबध्द, वक्तशीर आणि कार्यतत्पर नेतृत्व गमाविले आहे. ही पोकळी कधीही भरुन निघणारी नाही. त्यांचे कुटुंब तसेच संपुर्ण महाराष्ट्रातील नागरिकांना या दुखातून सावरण्याचे बळ लाभो हिच विठ्ठल,रखुमाई आणि दामाजीपंतांच्या चरणी प्रार्थना.

**- समाधान आवताडे,**

### साखर उद्योगाचा हितरक्षक हरपला

बुधवारची सकाळ अतिशय सुन्न करणारी आणि महाराष्ट्राच्या काळजाचा थरकाप उडविणारी ठरली. राजकारणातल्या मोकळ्या ढाकळ्या नेत्याचं असं जाणं धक्कादायक आहे. कायम वेळेवर येणारे दादा आज अवेळी गेले. साखर उद्योगाच्या हितासाठी दादांनी कायमच पुढाकार घेतला.

**सचिन जाधव, अध्यक्ष : जकराया शुगर, ली. वटवटे, ता. मोहोळ**

### कामात रमणारा नेता हरपला

प्रशासनावर पकड ठेवत समस्याची जाणीव ठेवून अहोरात्र मेहनत करून महाराष्ट्राचं विकासाचं स्वप्न बाळगत पहाटेपासून कामात रमणारा नेता हरपला महाराष्ट्राची न भरून निघणारी पोकळी निर्माण झाली.

**संजय क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)**

### मायेचा हात देणारा नेता गेला

अजितदादा पवार आमच्या डोंगरे कुटुंबाचे प्रमुख होते. विजय वर मी पूर्ण लक्ष ठेवतो, तुम्ही काळजी करू नका, मनोहरभाऊ, असा मायेचा हात डोक्यावर ठेवणारा नेता माझ्या कुटुंबाचा प्रमुख होता. दादांच्या जाण्याने कुटुंब प्रमुख गेल्याचे दुःख झाले आहे.

**विजयराज डोंगरे, माजी सभापती.**

### असा नेता होणे नाही

अतिशय निर्भिड आणि स्पष्ट बोलणारेअसे त्यांचे व्यक्तिमत्व होते . आणि कार्यकर्त्याला बरे वाटावे म्हणून खोटे आश्वासन देणारे असे ते नेतृत्व नव्हते. महाराष्ट्राच्या इतिहासात यापुढे असा नेता होणे शक्य नाही.

**- माजी आमदार राजन पाटील (अनगरकर)**

# ‘वैमानिका’चा निरोप येताच सर्व आवरुन जावं लागतं

## अजितदादांच्या या शब्दांची आठवण वेदनादायी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जानेवारी-**

उपमुख्यमंत्री अजित पवार विमान प्रवासाबाबत अत्यंत काळजी घेत होते. याचा प्रत्यय त्यांच्याच तोंडून मिरज येथील एका जाहीर सभेवेळी कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांना तसेच माध्यम प्रतिनिधींना ९ जानेवारीस ऐकायला मिळाला होता. वैमानिकाचा निरोप येताच सर्व आवरुन जावं लागतं...; अजितदादांचे हे काळीज चिरणारे शब्द, नेमकं काय होते? या त्यांच्या शब्दांचा आठव त्यांचा विमान अपघात झाल्यावर अनेकांना आला.



महाराष्ट्राला हादरवणारी त्यांच्या निधनाची आज (दि. २८) सकाळी बातमी समोर आली. उपमुख्यमंत्री आणि धडाडीचे नेते म्हणून ओळख असणारे अजित पवार यांचा विमान अपघातामध्ये मृत्यू झाला आहे, यावर अनेकांचा विश्वासच बसत नव्हता. आज सकाळी बारामतीमध्ये झालेल्या विमान अपघातामध्ये अजित पवारांसह ५ जणांचा मृत्यू झाला.

जिल्हा परिषदेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज बारामतीमध्ये अजित पवार यांच्या चार सभा होत्या. या सभांसाठी ते सकाळीच नेहमीप्रमाणे लवकर बाहेर पडले होते. मुंबईहून बारामतीसाठी आज सकाळी विमान निघालं होतं. या विमानाच्या लँडिंगदरम्यान बारामतीमध्ये विमानाचा अपघात झाला. यावेळी अजित पवारांसह अन्य पाचजण देखील विमानात होते. परंतु विमानाचा अपघात इतका भीषण होता की, अजित पवारांसह पाच जणांचा मृत्यू झाला.

उपमुख्यमंत्री अजित पवार विमान प्रवासाबाबत अत्यंत काळजी घेत होते. याचा प्रत्यय त्यांच्याच तोंडून एकदा ऐकायला मिळाला होता. ९ जानेवारी २०२६ रोजी मिरजमध्ये महानगरपालिका प्रचारासाठी अजितदादा आले असताना विमान उड्डाणासाठी उशीर होत असला आणि वैमानिकाचा निरोप आला की, मला सभा आवरून जावं लागतं, असं अजितदादा पदाधिकाऱ्यांना सांगत होते. अजितदादांचा हा व्हिडीओ एका वाहिनी प्रतिनिधीच्या कॅमेऱ्यात कैद झाला होता. तो व्हिडिओ आज सर्वत्र व्हायरल झाल्याने अनेकांच्या डोळ्याच्या कडा ओलावल्या.

# टेंभुर्णी-कुर्डूवाडी रोडवर भीषण अपघात; तिघांचा जागीच मृत्यू

### तांबवे हद्दीत भरधाव एसटी बसची कारला धडक; एक महिला गंभीर जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२८ जानेवारी-**

टेंभुर्णी-कुर्डूवाडी रोडवर तांबवे गावच्या हद्दीत विटभट्टीजवळ भरधाव एस टी बसने कारला समोरासमोर जोरदार धडक दिल्याने झालेल्या भीषण अपघातात तिघांचा जागीच मृत्यू झाला, तर एक महिला गंभीर जखमी झाली आहे.

बुधवारी दि.२८ जानेवारीला दुपारी सुमारे २.४५ वाजण्याच्या सुमारास घडलेल्या या हृदयद्रावक घटनेमुळे फलटण व कोळकी परिसरात शोककळा पसरली आहे. या बाबत टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात अनिल जगन्नाथ यादव (वय ५०, रा. निमगाव केतकी, ता. इंदापूर, जि. पुणे) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीतील माहितीनुसार, सुराज्य तालमीचे उस्ताद बाळासाहेब महादेव काशिद (वय ५७), सनिता काशिद (वय ५०) - दोघे रा. बुवासाहेब नगर, कोळकी, ता. फलटण, जि. सातारा तसेच शारदा संभाजी राऊत (वय ६५) व मुक्ताबाई कल्याण राऊत (वय ७०) - दोघी रा. तावशी, ता. इंदापूर, जि. पुणे हे सर्वजण माढा येथून टेंभुर्णीकडे मारुती सुझुकी बलेनो (एमएच ११ सी.जी. ९०६६) या कारमधून प्रवास करत होते. दुपारी सुमारे २.४५ वाजता तांबवे गावच्या हद्दीत विटभटीजवळ टेंभुर्णीकडून येणाऱ्या एसटी बस (एमएच १४ एमएच ०१९८) चा चालक जोतीराम भीमराव जाधव (रा. गीता नगर, पणदारे, पुणे) याने आपल्या ताब्यातील एस टी बस ही रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून, निष्काळजीपणे व भरधाव वेगात चालवली. समोरील वाहनाला ओव्हरटेक करण्याच्या प्रयत्नात त्याने बसचे तोंड रस्त्याच्या बाहेर काढल्याने समोरून येणाऱ्या बलेनो कारला समोरासमोर जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत सुराज्य तालीमचे उस्ताद पैलवान बाळासाहेब काशिद, सनिता काशिद आणि शारदा संभाजी राऊत हे तिघे गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वीच मृत्यूमुखी



पडले. तर मुक्ताबाई कल्याण राऊत या गंभीर जखमी असून त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. एस टी बसचे सुमारे १ लाख ५० हजार तर बलेनो कारचे सुमारे ५० हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी बस चालक जोतीराम भीमराव जाधव याच्याविरुद्ध टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोहेकॉ देवकर यांनी गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश चौधरी करत आहेत.

# कणखर नेतृत्वाला भावपूर्ण अभिवादन..

सकाळीच धक्कादायक बातमी कानावर आली आणि मन व मेंदू सुन्न झालें. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री सर्वांचे लाडकेअजितदादा सकाळीच बारामती येथे विमान दुर्घटनेत त्यांचे दुःखद निधन झालें. पहाता पहाता सर्व सोशल मीडिया वर दुःखद निधनाच्या पोस्ट दिसू लागल्या.आज पहिल्यांदाच असं आढळून आलें कि महाराष्ट्रातील सर्व लोक मोबाईल स्टेस्टस वर दादाच्या निधनाची पोस्ट दिसू लागली. दादा कामाचे इतके पक्के कि विमान जिथं क्रश झाले त्या ठिकाणी कित्येक लोकांच्या कामाच्या अर्जं असताव्यस्त पडलेले आढळून आले. अपघातस्थळी दादांचा मोबाईल हि कायमचा नॉट रिचेबल असल्याचं आढळून आलें.आज दादाचं वय हि ६६ वर्षे, ६ महिने व ६ दिवस झालेत हा पण एक योगायोग आहे.



महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात काही व्यक्तिमत्त्वे केवळ पदामुळे नव्हे, तर त्यांच्या कामामुळे जनमनसात अढळ स्थान निर्माण करतात. अजित पवार हे असेच एक नाव आहे. ठाम भूमिका, निर्भीड निर्णय आणि कामाशी असलेली प्रामाणिक निष्ठा यामुळे अजितदादानी महाराष्ट्राच्या राजकारणात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे.बारामतीच्या मातीशी नाळ जोडलेला हा नेता केवळ सत्तेचा प्रतिनिधी न राहता सामान्य माणसाच्या प्रश्नांशी स्वतःला जोडून घेणारा ठरला. सहकार, सिंचन, कृषी, ऊर्जा आणि अर्थकारण या क्षेत्रांत त्यांनी घेतलेले निर्णय आजही राज्याच्या विकासप्रवाहात महत्त्वाचे मानले जातात. विशेषतः जलसंपदा विभागात काम करताना त्यांनी अनेक रखडलेले प्रकल्प मार्गी लावले. पाणी म्हणजे जीवन आहे, ही भावना त्यांनी कृतीतून दाखवली.अजित पवार यांची कार्यशैली कधी कठोर वाटली, कधी वादग्रस्त ठरली; पण त्यामागे काम पूर्ण करण्याची तळमळ होती, हे अनेक प्रसंगी दिसून आले. ‘‘बोलण्यापेक्षा काम महत्त्वाचे’’ हा त्यांचा दृष्टिकोन अनेक कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरला. सत्ता येते- जाते, राजकीय समीकरणे बदलतात; मात्र प्रशासनावर पकड आणि निर्णयक्षमतेचा ठसा त्यांनी कायम ठेवला.एक अनुभवी प्रशासक, अभ्यासू अर्थकारणी आणि जबाबदार लोकप्रतिनिधी म्हणून त्यांनी अनेक कठीण प्रसंगात राज्याला दिशा दिली. त्यांच्या निर्णयांशी प्रत्येक जण सहमत असेलच असे नाही, पण राज्याच्या हिताचा विचार केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेणारा नेता म्हणून त्यांचा उल्लेख नक्कीच केला जातो.आज त्यांच्या कार्याकडे मागे वळून पाहताना, महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांनी दिलेले योगदान ठळकपणे जाणवते. राजकारणात टिकून राहणे सोपे नसते; पण अनुभव, जिद्द आणि कामाची ओढ यांच्या बळावर अजित पवार यांनी हा प्रवास घडवून आणला. महाराष्ट्रातील असा हुशार, मितभाषी हसमुख, हजरजबाबी नेत्याला श्रद्धांजली वहायला मन धजावत नाही. दादांची राजकीय कार्यकिर्द कायमची महाराष्ट्रातील लोकांच्या कायम स्मरणार्थ राहील.पण दादा अशी अचानक एक्सिट घेतील असं वाटलं नव्हतं.

**- राजाराम मस्के**
**मराठवाडा आवृत्ती विभाग प्रमुख**
**मो. ८८८८८४७२३९**

## न्यायालयीन कामकाज, सभा, कार्यक्रम रद्द

**सोलापूर, दि. २८ जानेवारी-**

बार असोसिएशनच्या सर्व सदस्यांच्या वतीने महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते, कृषी व राज्याच्या विकासाचे स्तंभ, उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामतीजवळ विमान अपघातात झालेले अकाली व अवर्णनीय निधन या वृत्ताने आम्ही सर्वजण स्तब्ध, दुःखी आहोत. त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील एक मोठे राजकीय, सामाजिक व आर्थिक पोकळी निर्माण झाली आहे. ते केवळ एक राजकारणी नेते नव्हते तर शेतकरी, युवा, महिला व दलितांसह सर्व वर्गांचे मार्गदर्शक होते. त्यांच्या अप्रतिम नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या प्रगतीला गती मिळाली.

सदर दुःखद घटनेमुळे सोलापूर बार असोसिएशनच्या कार्यकारी समितीने बुधवार दि.२८ जानेवारी रोजी सर्व न्यायालयीन कामकाज, सभा व कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. संस्थेच्या सर्व सदस्यांना आज कोर्ट कामकाजात सहभागी न होण्याचे आवाहन करण्यात आले. अजित पवार यांच्या

# पंजाब तालीमच्या वतीने श्रध्दांजलीपर अभिवादन

**सोलापूर, दि. २८ जानेवारी-**

अजितदादा यांच्या निधनानंतर पंजाब तालीम यांच्यावतीने पंजाब तालीम येथील मस्जिद जवळ दादांच्या प्रतिमेला श्रद्धांजली अर्पण करून मुस्लिम समाजाकडून अभिवादन करण्यात आले. यावेळी अजितदादांनी मुस्लिम समाजाला भरभरून प्रेम दिले.मुस्लिम समाजासाठी अजित दादांनी मोलाचे काम केले.महाराष्ट्र राज्यातील तमाम मुस्लिम समाजाला अजित दादा नेहमी मदतीला येत होते. त्यांची जागा कोणही भरून काढणार नाही. सर्वांनी एकत्रित येत अजित दादासाठी दुआ केली.

## मुदतवाढ

भारत सहकारी गारमेंट मर्यादित, सोलापूर. गट नंबर १२ होटगी ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर. येथील गारमेंट प्रकल्प भाडेतत्त्वावर देण्यासाठी निविदा सादर करण्यासाठी दैनिक सोलापूर तरुण भारत च्या दि. २१ जानेवारी २०२६ रोजीच्या अंकामध्ये जाहीर प्रसिद्धीकरण अंतर्गत ७ दिवसाची मुदत देण्यात आली होती. ती मुदत ३१ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ३ वाजेपर्यंत वाढवण्यात आली आहे. कोऱ्या निविदा घेऊन गेलेल्या इच्छूकांनी याची नोंद घ्यावी.

**प्रभारी व्यवस्थापक**
**भारत सहकारी गारमेंट मर्या.**
**सोलापूर मो.७७०९६७८९८७**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत काम**

मध्य रेल्वे, सोलापूरचे वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD) यांनी भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. निविदा क्रमांक: SUR/TD/T/2025/29R1; कामाचे नाव: सोलापूर विभागातील वायर नसलेल्या पीट लाईन्स/साइडिंगचे विद्युतीकरण (पुनर्निमंत्रण); अंदाजे खर्च: रु. 1,53,83,701.79 बोली सुरक्षा: रु. 2,26,900/- पूर्ण कालावधी: 12 महिने; ऑफरची वैधता: 60 दिवस; वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 20.02.2026 दुपारी 3:00 वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD)**
**DE/Sur-01 मध्य रेल्वे, सोलापूर**

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**फायर अलार्म सिस्टम**

डीआरएम (एस अँड टी) चे कार्यालय, मध्य रेल्वे, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे:- निविदा क्रमांक: SUR-N-T-2025-26-42 दिनांक: 27.01.2026. कामाचे नाव आणि परिसर: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागातील विविध स्थानके आणि लेव्हल क्रॉसिंग गेट्सवर आरडीएसओ प्रकारची अग्निशामन अलार्म प्रणाली आणि आकांक्षा प्रकारची अग्निशामन अलार्म प्रणालीची तरतूद.; कामाची अंदाजे किंमत: रु. 2,93,26,646.58 निविदा फॉर्मची किंमत: Nil जमा करावयाची बयाणा रक्कम रु. 2,96,600/- काम पूर्ण करण्याचा कालावधी: 12 महिने निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 20.02.2026 15:30 पर्यंत. तपशील ireps वेबसाइटवर उपलब्ध आहेत. जर काही सुधारणा असतील तर त्या फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केल्या जातील. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल/पोस्टल/ई-मॉल, फॅक्स, हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांना कंपनीच्या नावासह वर्ग डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवण्याची आणि www.ireps.gov.in वर नोंदणी करण्याची विनंती केली जाते. अर्नेस्ट मनी (EMD) पेमेंट नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे किंवा बँक गॅरंटी स्वरूपात स्वीकारले जाईल आणि मूळ बँक गॅरंटी निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपूर्वी (म्हणजे बोली सादर करण्याची शेवटची तारीख वगळून) निविदा दस्तऐवजात दर्शविल्याप्रमाणे नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याला वैयक्तिकरित्या वितरित करावी. अधिक तपशीलांसाठी कृपया www.ireps.gov.in ला भेट द्या.

**विभागीय रेल्वे व्यवस्थापक/एस अँड टी शाखा**
**DE/Sur-03 मध्य रेल्वे, सोलापूर**

अनाधिकृत रूप से रेल लाइन को पार करना दंडनीय अपराध है

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युत कामे**

मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD) यांनी भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी नामांकित आणि अनुभवी विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. दोन पॅकेट सिस्टम; निविदा क्रमांक: SUR/TD/T/2026/01S; कामाचे नाव: तीन (03) कुशल तंत्रज्ञ आणि तीन (3) अकुशल कर्मचारी यांच्या शिफ्ट आधारावर कामांच्या उभारणीसाठी मनुष्यबळाची तरतूद. अंदाजे किंमत: रु. 63,05,389.20 बोली सुरक्षा: रु. 1,26,100/- पूर्ण कालावधी: 24 महिने ऑफरची वैधता: 90 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 20.02.2026 दुपारी 15:00 वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD),**
**DE/Sur-02 मध्य रेल्वे, सोलापूर**

अनाधिकृत रूप रेल लाइन को पार करणे दंडनीय अपराध आहे

**उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर शहर सोलापूर यांचे समोर**
सिटी सर्व्हे नं. ८४१३ दुसरा मजला जुने जिल्हाधिकारी आवार सोलापूर -४१३००३

जावक क्रं. / / /२०२६ दिनांक : / /

जनमंगल महिला नागरी सह. पतसंस्था मर्या. सोलापूर -- **अर्जदार**
विरुध्द
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) -- **जाबदेणार**

| अ. क्र. | दावा क्रं. | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ८००/२०२५ | ६४,७४६/- | १<br>२ | चितापुरे मोहसीन अब्दुलगनी रा. सिटी जिमच्या जवळ, प्लॉट नं. ४४/५/१, मुस्लीम पाच्छा पेठ, सोलापूर<br>शेख म. वाजीद म. हनीफ रा. बैतुल अमन अपार्टमेंट किडवाई चौक, सोलापूर |
| २ | ८०२/२०२५ | ३८,५९४/- | २ | रोडगे सुभाष पुंडलिक मु.पो. कामती (बु) ता. मोहोळ, जि. सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे / पत्त्यावर आढळून येत नसल्याने / अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणेत येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांक : १०/०२/२०२६ रोजी दुपारी १२.३० वा. कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि. २७/०१/२०२६ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

**स्थळ - सोलापूर**
**दि. २७/०१/२०२६**

**सही/-**
**उपनिबंधक**
सहकारी संस्था सोलापूर शहर सोलापूर

**अतिरिक्त विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांचेसमोर**

**जाहिर नोटीस**

विधानभवन पुणे-४११००१
क्र.आरटीएस/रि/सो/१६०/२०१८
दिनांक ०९/०१/२०२६
संगणक क्र. २०१८/००१६०

**१. वासुदेव विठठल रेळेकर,** -- **अर्जदार**
रा.शेळगांव आर ता. बार्शी, जि. सोलापूर
विरुध्द
१. गोवर्धन चिंतामणी गोडगे,
रा. वल्लभ को-ऑप हौसिंग सोसा. सावण टॉवर
बी विंग बी-४ सेक्टर नं-१, ता. पनवेल, जि. रायगड -- **जाबदेणार**
२. संजय अपासाहेब गवळी,
रा. शेळगांव (आर) ता. बार्शी, जि. सोलापूर

मौजे शेळगाव (आर), तालुका बार्शी, जि. सोलापूर येथील जमीन गट नं ४०९ यासी क्षेत्र ० हे ३१ आर + पो.ख. ० हे ०३ आर असे एकूण क्षेत्र हे ३४ आर ही मिळकत प्रस्तुत प्रकरणी फेरतपासणी अर्जाची विषय मिळकत असून याबाबत अपर जिल्हाधिकारी, सोलापूर क्र. आरटीएस २ रे अपिल क्रमांक ६१/२०१६, दि. २६/०३/२०१८ अन्वये दिलेल्या निर्णयाविरुध्द रिव्हीजन अर्ज या न्यायालयात दाखल आहे. सदर रिव्हीजन अर्जाचे अनुषंगाने सर्व जाबदार यांना नोंदणीकृत पोहच डाकव्दारे अर्जदार यांनी नोटीसा बजावणेची कार्यवाही केलेली आहे.

तथापी, सदर रिव्हीजन अर्जातील उक्त नमुद केलेप्रमाणे जाबदेणार क्र. ०१ यांना नोंदणीकृत पोहच डाकव्दारे नोटीसा पाठविण्यात आलेल्या होत्या. मात्र संबंधितांना नोटीस बजावणी झालेली नसल्याचे दिसुन येत आहे. उक्त नमूद जाबदार क्र. ०१ यांना वर्तमानपत्राव्दारे जाहीर समन्स काढण्यासाठी दिनांक दि. ०७/०१/२०२६ रोजी सादर केलेला विनंती अर्ज मंजूर करणेत येत आहे.

सबब, या जाहीर नोटीसीव्दारे अर्जदार यांनी दाखल केलेल्या उपरोक्त **रिव्हीजन अर्जाची पुढील सुनावणी दिनांक ०४.०२.२०२६ रोजी सकाळी ११-०० वाजता अतिरिक्त विभागीय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालयात, विधान भवन (कौन्सिल हॉल) पुणे-४११००१ येथे नेमण्यात आली आहे.**

तरी उपरोक्त तारखेस जाबदार तसेच जाबदार यांचे मयत वारस यांनी न्यायालयात समक्ष अथवा आपले कायदेशीर प्रतिनिधी मार्फत सुनावणीसाठी हजर रहावे.

प्रस्तुतची नोटीस माझ्या सही शिक्क्यानिशी देण्यात आला आहे.

**ठिकाण - पुणे-१**
**दिनांक १९/०१/२०२६**

**सही/-**
**(कविता व्दिवेदी)**
अतिरिक्त विभागीय आयुक्त,
पुणे विभाग, पुणे.

### दादा माझ्या कुटुंबाचे आधारवड होते

अजितदादा हे केवळ माझे नेते नव्हते, तर ते माझ्या कुटुंबाचे आधारवड होते. माझ्या आयुष्यातील सर्वात कठीण आणि संघर्षाच्या काळात, दादा माझ्या आणि माझ्या कुटुंबाच्या पाठीशी ढाल बनून खंबीरपणे उभे राहिले. त्यांनी दिलेली ती साथ मी कधीही विसरू शकणार नाही. दादांच्या निधनाने एक कर्तव्यदक्ष आणि शब्दाला पक्का असणारा लोकनेता आपण गमावला आहे.

**: नवाब मलिक**
**(राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री)**

## तुळशीदास अभंगे यांचे निधन

**सोलापूर, दि. २८ जानेवारी-**



मल्लिकार्जुनगर येथील तुळशीदास माणिक अभंगे (वय ७०) यांचे बुधवारी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, नातवंडे असा परिवार आहे. ॲड. प्रकाश अभंगे यांचे ते वडील होत.

**श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान,**
**तुळजापूर, जि. धाराशिव ४१३६०१ फोन - (०२४७१) २४२०१**
Email shreetuljabhavanitemplegmail.com Website - https://shrituljabhavani.org
**ई- निविदा सूचना १४ साल सन २०२५-२०२६.**

**श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात डिजीटल लॉकरची सुविधा उपलब्ध करणेसाठीची ई-निविदा मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक पुरवठादारांनी कंत्राटदारांनी सदरील निविदा दिनांक १७/०२/२०२६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत ऑन लाईन पध्दतीने सादर कराव्यात. सदरील ई निविदेबाबत सविस्तर माहितीसाठी पुरवठादारांनी कंत्राटदारांनी शासनाच्या** https://mahatenders.gov.in **या संकेतस्थळावर भेट दयावी.**

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार**
**तथा व्यवस्थापक**
**श्री तुळजाभवानी**
**मंदिर संस्थान, तुळजापूर,**

**स्वाक्षरित/-**
**जिल्हाधिकारी,**
**धाराशिव तथा अध्यक्ष,**
**श्री तुळजाभवानी मंदिर**
**संस्थान, तुळजापूर**

## अग्रलेख...

# अघटिताचा आघात!

राजकारणाचे क्षेत्र बरेच वादग्रस्त असले तरी या क्षेत्रातील काही व्यक्ती कोणत्या तरी ध्यासाने, ध्येयाने प्रेरित होऊन त्याच्या पूर्ततेसाठी सतत धडपडत असतात. अजित पवार हे राजकारणाच्या पटलावरील त्यापैकीच एक नाव. त्यांच्या दुर्दैवी अस्ताच्या आकस्मिक व धक्कादायक बातमीने महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाच्या मनात अनामिक पोकळीच्या दुःखद जाणिवा तयार झाल्या आहेत. ही पोकळी केवळ एका नेत्याच्या जाण्याच्या वेदनादायी जाणिवेची नाही, तर ती एका आक्रमक, धाडसी, कधी-कधी उद्धट वाटणाऱ्या, पण कायम प्रभावशाली राहिलेल्या राजकीय पर्वाच्या समाप्तीची आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून राज्याच्या सत्ताकारणावर आपल्या अस्तित्वाची अमिट मोहर उमटविणारे अजित पवार यांच्या दुर्दैवी अपघाती निधनाचे सर्वांना झालेले दुःख फार बोचरे आहे. नियतीचा खेळ अनाकलनीय असतो असे म्हणतात. त्यापुढे कोणाचेच काही चालत नाही हेही खरेच असते, पण ज्यांच्या असण्याने असंख्यांचे जगणे सोपे होणार असते, ज्यांच्या अस्तित्वामुळे प्रगतीच्या दिशा उजळणार असतात, त्यांनाच काळाच्या पडद्याआड ओढून नियतीने दाखविलेली अनाकलनीयता मात्र क्रूरच ठरते.

अजित पवार म्हणजे सत्तेच्या केंद्रस्थानी राहण्याची दुर्दम्य आकांक्षा! निर्णयांतील वेग, भाषणातील धार, प्रशासकीय कामकाजावरील पकड आणि प्रसंगी राजकीय संकेत झुगारून, कागदावरच्या नियमांना बगल देऊन केलेली थेट कृती ही त्यांची कार्यशैली महाराष्ट्राला कायमच भावली. त्यामुळेच ते नेहमीच चर्चेत राहिले. ही चर्चा अनेकदा उलटसुलटदेखील होती. त्यांच्या कृतिशील स्वभावामुळे जेव्हा राज्याच्या हिताचे प्रश्न सहजपणे सोडविले गेले, तेव्हा ते कौतुकाचे धनी ठरले आणि कधी त्यांच्या काही निर्णयांवर टीकेचे प्रहारही झाले. स्वभावाने सच्चा असलेल्या या नेत्याने कधीही 'लोकानुनय' केला नाही. रोखठोक स्वभाव, परखड भाषा आणि अप्रिय असले तरी सत्य बोलण्याचा धाडसी स्वभाव असलेला हा नेता सत्तानिष्ठ होता. सत्तेशिवाय समाजाचे हित साधताच येणार नाही, अशा ठाम धारणेमुळेच असावे कदाचित, सातत्याने सत्तेच्या सहवासात राहण्यासाठी त्यांनी प्रसंगी वैचारिक भूमिका बदलल्या. अनेकदा त्यांनी पक्षीय धोरणांना बगल दिली आणि थेट वारसादेखील नाकारण्याचे धाडस दाखविले. स्वतंत्र मार्गावरून चालत राजकारण करण्याची हिंमतही दाखविली. महाराष्ट्राच्या राजकारणात सत्ता ही केवळ पदाने नव्हे, तर प्रभावाने मोजली जाते, हे त्यांनी पुन्हा पुन्हा सिद्ध केले.

नेतृत्वाच्या संधी हिरावल्या जात असल्याचे खदखदते शल्य उराशी जपून ठेवणे एका टप्प्यावर अवघड झाले, तेव्हा शरद पवारांच्या राजकीय संस्कारांची सावली झुगारून त्यातून बाहेर पडण्याचा निर्णय अजितदादांसाठी सोपा नव्हता. भविष्यातील प्रवासात कोणते अडथळे असतील, कोणत्या संधी असतील आणि कोणत्या अडथळ्यांवर मात करून कोणत्या संधीचे सोने करता येईल, याबाबत कोणतीच निश्चिततादेखील नव्हती. शरद पवारांच्या सावलीतच राहण्यासाठी असंख्य राजकीय नेते धडपडत असतानाच्या काळात, आता आम्ही स्वतंत्रपणे निर्णय घेण्याच्या क्षमतेचे झालो आहोत, असे ठणकावून सांगत स्वतःची वाट आखू पाहणारे अजित पवार हे वेगळे रसायन आहे, याची जाणीव महाराष्ट्राला झाली. शरद पवारांचे नेतृत्व झुगारण्यासाठी अगोदर कोणत्याही नेत्यास आपल्या नेतृत्वाचे वेगळे वलय निर्माण करावे लागते, असा तो काळ. अन्यथा, अनेक नेत्यांना सहजपणे कात्रजचा घाट दाखविला जात असे. अशा काळात अजित पवार मात्र आपली भूमिका अधिक टोकदार करून त्या सावलीतून बाहेर पडले आणि अधिक तीक्ष्ण व व्यवहारी झाले. शरद पवारांच्या चाणाक्ष राजकारणाचा वारसदार म्हणून पाहिले जाणे अधिक सोयीचे, की स्वतंत्र निर्णयक्षमता संपादन केलेला समाजमान्य नेता म्हणून उभे राहणे अधिक सोपे या द्वंद्वात त्यांनी घेतलेले काही निर्णय वादग्रस्त होते खरे, पण ते दुर्लक्ष करण्यासारखे कधीच नव्हते. राष्ट्रवादी काँग्रेसची फाळणी करून शरद पवार यांच्या नेतृत्वाच्या सावलीतील पक्षाचे चिन्ह, झेंडा आणि मूळ पक्षावरच हक्क सांगणे असा धक्कादायक प्रयोग त्यांनी केला. ज्या विचारसरणीचा विरोध करणारे राजकारण त्यांनी कायम केले, त्याच विचारसरणीसोबत जाऊन सत्तेच्या नव्या मांडामांडीत उडी घेणे आणि 'व्यवहार्य राजकारण' सांभाळणेही त्यांना जमले. वैचारिक मतभेदापलीकडे जाऊन राज्यहिताची भूमिका सातत्याने आग्रहीपणे मांडण्याच्या स्वभावातून त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात नैतिकतेपेक्षा वास्तवाला अधिक महत्त्व देणारी भूमिका ठसठशीतपणे दाखवून दिली.

अजित पवार नावाच्या एका झंझावाताच्या अस्ताचा आघात महाराष्ट्राला सहन होणारा नाही. अजितदादा हे लोकानुनयी निर्णय घेऊन जनतेला स्वप्नांच्या दुनियेत रमविणारे राजकारण करणारे किंवा टीकाटोमण्यांच्या भावनिक आवाहनांनी जनसमुदायासमोर रडगाणे गाणारे नेते नव्हते. त्यांची राजकीय गणिते पक्की होती. बेरजेच्या, वजाबाकीच्या गणितांची उत्तरे अगोदर मांडून त्यानुसार ती गणिते आखणारे ते निष्णात गणिती होते. मतदारसंघ, जातीय समीकरणे, निधीवाटप, प्रशासनावर पकड, निर्णयाचे परिणाम किंवा दुष्परिणाम या सगळ्यांचा ते थंड डोक्याने हिशेब मांडत. त्यामुळेच अनेकांना ते 'कठोर' वाटले, तर काहींना हा त्यांच्या 'कार्यक्षमते'चा पुरावा वाटला. काहींच्या लेखी त्यांचे राजकारण 'अस्वस्थ करणारे' देखील होते. त्यांचे राजकारण निष्प्रभ मात्र कधीच ठरले नाही. म्हणूनच, सत्ता कोणाचीही असो, सत्तेवर कोणताही पक्ष असो, अजित पवार कायम सत्तेच्या केंद्रस्थानी राहिले आणि महाराष्ट्राच्या अर्थकारणावरही त्यांचा प्रभाव राहिला.

अजित पवार यांच्या पश्चात महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक नवी वळणे येऊ शकतात, असे मानले जात आहे. त्यांच्या नसण्यामुळे राजकारणात आणि महाराष्ट्राच्या वर्तमानकाळात भासणारी पोकळी ही आक्रमक राजकारणशैलीच्या संदर्भातील असेल. राज्याच्या हितासाठी सत्ता असणे गरजेचे आहे, असे ठामपणे ठणकावून, शरद पवार यांच्या सावलीतून बाहेर पडणारा आणि सत्तेच्या राजकारणातील सर्वांत मोठा धोका पत्करणारा नेता गमावल्याने, महाराष्ट्राच्या राजकारणातील नव्या वाटा कोणत्या दिशेला घेऊन जाणार याविषयी आता चर्चादेखील सुरू होईल. अजित पवार यांच्या अलिकडच्या राजकारणातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या दुभंगलेल्या वाटांवरून चालणारे वाटसरू पुन्हा एका वाटेवर येतील अशी चर्चा सुरू झाली होती. तसे राजकीय संकेतही मिळू लागले होते. आता त्याचे काय होणार हा राजकारणाचा प्रश्न झाला. त्याचे उत्तर राजकारणातच मिळेल. मात्र, महाराष्ट्राने एक क्षमतावान नेतृत्व गमावले असल्याची आणि ती पोकळी भरून निघणे शक्य नसल्याची जाणीव महाराष्ट्रास झाली आहे, एवढे खरे! मराठा राजकारण, राज्यातील सहकार चळवळ, पश्चिम महाराष्ट्राचा सत्ताकेंद्रित पट या सगळ्यांवर अजित पवारांची पकड होती. आता हे सगळे पट नव्याने मांडले जातील. महायुती नावाच्या एका आगळ्या राजकीय सत्ताकारणात सहभागी झालेले अजित पवार हे सत्तापक्षाकरिता कधी सोयीचे भागीदार ठरले, तर कधी अस्वस्थ करणारे सहप्रवासीदेखील ठरले. त्यांच्या नसण्याने सत्तेची गणिते सोपी होतील की अधिक गुंतागुंतीची, हा प्रश्नही आहेच. आज मात्र, अजित पवार यांचे निधन ही महाराष्ट्राची हानी आहे, हेच खरे. या अनाकलनीय आघातामुळे महाराष्ट्र एका संक्रमणाच्या टप्प्यावर उभा ठाकला आहे. या राज्यात भावनिक नेतृत्व आहे, आंदोलनातून उभे राहिलेले नेतृत्वदेखील आहे. पण प्रसंगी थेट सत्ताकेंद्रावर घाव घालणाऱ्या नेतृत्वाची उणीवही महाराष्ट्राने अनुभवली आहे. अजित पवार यांच्या नसण्याने ही उणीव अधिक ठळक झाली आहे. अजित पवार हे 'आदर्शवादी' नेते नव्हते, अशी टीका केली जाते. ती काही अंशी खरीदेखील आहे. पण अनेकदा आदर्शवादाने नव्हे, तर ताकदीमुळेच राजकारणाची दिशा बदलते, हेही तितकेच खरे आहे. अजितदादांच्या राजकारणाने अनेक प्रश्न निर्माण केले, अनेक प्रस्थापित मूल्यांवर आघातही केला. पण त्याच वेळी निर्णयक्षमतेचा ठोस निकषही त्यांच्या नेतृत्वाने उभा केला. अजितदादा यांच्या नसण्यामुळे हा निकष कमजोर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. कदाचित, अजित पवार यांची नोंद भविष्यातील इतिहासात बंडखोर नेता म्हणून केली जाईल. कदाचित त्यांच्या राजकारणावर व्यवहारवादाचा शिक्कादेखील मारला जाईल. कदाचित, ही सगळीच अजित पवार यांची वैशिष्ट्ये म्हणूनही सांगितली जातील. पण असे असूनही, अजित पवार यांचे असणे आणि नसणे यातील फरक सर्वांना अंतर्मुख करणाराच असेल. त्यांची वेगळी ओळख कधीच पुसली जाणार नाही. म्हणूनच, त्यांच्या नसण्याची वेदना महाराष्ट्राच्या राजकीय विश्वासह साऱ्यांना अस्वस्थ करणारी आहे. 'तरुण भारत' परिवारातर्फे अजित पवार यांच्या स्मृतीस विनम्र श्रद्धांजली.

## श्रद्धांजली

### नितीन गडकरी

# राजकारणापलीकडचे मैत्र



अजितदादांची आणि माझी मैत्री ही राजकीय मतभेदांच्या पलीकडची होती. आम्ही अनेक वर्षे विधिमंडळात काम केले. एकमेकांवर राजकीय टीका-टिप्पणी केली. परंतु, आमच्या मैत्रभावात अंतर आले नाही. जनहिताच्या मुद्यावर मी काही आग्रह केला आणि तो अजितदादांनी मान्य केला नाही, असे घडले नाही. आणि दादांनी एखादा असा लोकहिताचा विषय माझ्यासमोर ठेवला तर तो मी सकारात्मक पद्धतीने सोडवण्याचा प्रयत्न केला नाही, असेही घडले नाही. आमची मैत्री राजकारणविरहित होती.

पश्चिम महाराष्ट्रातील विकसित सहकार क्षेत्रातून जे काही मोठे राजकीय नेते पुढे आले, त्यात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे नाव महत्त्वाचे आहे. गेली तब्बल चाळीस वर्षे अजितदादा राजकारणात, सार्वजनिक जीवनात कार्यरत होते. राज्यातील विविध खात्यांचे मंत्री म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली. आजही ते सतत आणि अथक कार्यरत होते. महाराष्ट्राच्या विकासाचा त्यांना ध्यास होता. राजकीय नेत्यांना लोकांना, कार्यकर्त्यांना सांभाळावे लागते. त्यामुळे सातत्याने गोड बोलावे लागते. किंबहुना आपण स्पष्ट बोललो तर चुकीचा संदेश जाईल, असे अनेकांना वाटते. अजितदादा मात्र या रीतीला अपवाद होते. ते उत्तम प्रशासक होते, तसे ते स्पष्टवक्तेही होते.

मला त्यांचा स्पष्टवक्तेपणा फार आवडायचा. ज्या कामाबद्दल त्यांचे मत सकारात्मक असेल, त्याबद्दल ते तसे स्पष्टपणे सांगत. जे काम होऊ शकत नसेल, त्याबद्दल तसेही स्पष्टपणे सांगून मोकळे होणे हा त्यांचा स्वभाव होता. मात्र, त्यांनी एखाद्या कामाला होकार दिला असेल तर त्याचा पाठपुरावा करून ते शेवटाला नेण्यापर्यंतची जबाबदारी अजितदादा घेत, हे मी कित्येकदा अनुभवले आहे. त्यांच्या या नेतृत्वगुणामुळे त्यांच्याबद्दल शासन-प्रशासनात एक विश्वास निर्माण झाला. प्रशासनावर चांगली पकड ठेवून जनतेच्या हिताचे नेमके निर्णय करून घेत असताना त्यांची निर्णयक्षमता वेळोवेळी सिद्ध झाली. शिवाय त्यांची लोकाभिमुखताही अधोरेखित झाली. महाराष्ट्राच्या विकासात त्यांचे चांगले योगदान राहिलेले आहे.

केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्री म्हणून महाराष्ट्रात राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या वतीने कामे करीत असताना मला त्यांच्या कार्यशैलीचा अनुभव आला. विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात पुणे जिल्हा, सातारा जिल्हा आणि अन्य संबंधित भागात पालखी मार्ग किंवा अन्य कामे करताना भूसंपादनासह अनेक प्रकारच्या अडचणी आल्या. परंतु, महाराष्ट्राचा विकास होत आहे हे लक्षात ठेवून या सगळ्या कामांना त्यांनी स्वतः संपूर्ण ताकदीने पाठबळ दिले. सहकार्य दिले. या सर्व कामांमध्ये त्यांचे खूप मोठे सहकार्य मिळाले, याचा विशेषत्वाने उल्लेख केला पाहिजे.

राजकारणात कधी जमते, कधी जमत नाही. कधी पार्टी सोबत असते, कधी नसते. ते बघून आम्ही मैत्री केली नाही. त्यामुळे सत्तेत असो वा नसो, त्यांचे व माझे संबंध पूर्वी होते, तसेच ते आज अखेरच्या क्षणापर्यंत होते. राजकीय पदे आणि भूमिका बाजूला ठेवून वैयक्तिक स्तरावरील मैत्रभाव आम्ही दोघांनीही एकमेकांबद्दल जोपासला हे मला अधिक महत्त्वाचे वाटते.

अजितदादा पवार हे माझे राजकारणातले आणि राजकारणाच्या पलीकडले उत्तम मित्र होते. ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा वारसा त्यांनी चांगला चालवला. सुखी, संपन्न, समृद्ध महाराष्ट्र घडवण्याची ताकद त्यांच्याकडे होती. एका दमदार, दिलखुलास आणि कमालीची निर्णयक्षमता असलेल्या नेत्याला आपण सारे मुकलो आहोत. त्यांचे व माझे कौटुंबिक संबंध होते, त्यामुळे अजितदादांचे अचानक निघून जाणे ही माझ्यासाठी एक व्यक्तिगत हानी आहे.

**भावपूर्ण श्रद्धांजली!**

(केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री, भारत सरकार)

## नोंद

### अशोक चौसाळकर

# उमदा राजकारणी, कठोर प्रशासकाचा अस्त

राज्यातील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुकांचा हंगाम सुरू होत असतानाच एक वाईट बातमी येऊन धडकली आणि राज्यातील राजकारण्यांसह जनतेलाही मोठा धक्का बसला. या निवडणुकांच्या प्रचाराचा धडाका सुरू करण्यासाठी सर्व पक्ष सज्ज होत असताना, सकाळी लवकर उठून कामाला सुरुवात करण्याची ख्याती असलेले उपमुख्यमंत्री अजित पवार बारामतीमध्ये पहिली प्रचारसभा घेण्यासाठी मुंबईहून विमानाने पहाटेच बारामतीला जायला निघाले. प्रचारसभेची वेळ सकाळी साडेनऊची होती. पण विमानाच्या 'लॅण्डिंग'मध्ये काही तरी तांत्रिक समस्या निर्माण झाली आणि हे विमान बारामतीजवळच एका दरीत कोसळले. हे विमान ५०० फूट उंचीवरून कोसळल्यामुळे कोणी वाचण्याची शक्यता फारच धूसर होती. त्यानुसार विमानात बसलेल्या अजित पवार यांच्यासह इतरांचा दुर्दैवी मृत्यू झाला. पुढील तपासानंतर अपघाताचे नेमके कारण समोर येईल, हा अपघात टाळता आला असता का, यावर ऊहापोह होईल, पण या अपघातात राज्याने एक उमदे नेतृत्व गमावले आहे, हे वास्तव बदलू शकणार नाही. अजित पवार यांना उभा महाराष्ट्र एक उमदे व्यक्तिमत्त्व, शिस्तबद्ध राजकारणी आणि झटून काम करणारा नेता म्हणून ओळखतो. काका शरद पवार यांच्या छत्रछायेत राजकारणाचे धडे गिरवताना त्यांनी पक्षात, प्रशासनात आणि राज्यातील जनतेच्या मनात स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले होते. १९९१ च्या विधानसभा निवडणुकीमध्ये ते सर्वप्रथम आमदार म्हणून निवडून आले आणि त्यानंतर आजपर्यंत सलग सात वेळा बारामतीकरांनी त्यांना आमदार म्हणून निवडून दिले. त्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्रिपद आणि अर्थमंत्रिपद अनेकदा भूषवले.

राज्याच्या राजकारणामध्ये गेली २५ वर्षे अजित पवार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कर्तबगार मंत्री, कठोर प्रशासक म्हणून ओळखले जाणारे अजित पवार यांनी आर्थिक शिस्त अंगी बाणवली होती. महाराष्ट्राच्या अर्थकारणाचा आवाका त्यांच्या लक्षात आला होता. त्या जोरावर त्यांनी राज्याच्या अर्थ मंत्रालयाची धुरा यशस्वीपणे सांभाळली. महाराष्ट्राच्या ग्रामीण राजकारणामध्ये अजित पवार यांची भूमिका महत्त्वाची होती. त्यांनी शरद पवार यांच्यापासून वेगळे होऊन भारतीय जनता पक्षाशी युती केली तरी राष्ट्रवादी काँग्रेसचे वैचारिक वेगळेपण गमावले नाही. निवडणुकांमध्ये जय-पराजय होत असतात, पण अजित पवार यांच्याकडे नेहमीच जनाधार होता. गेल्या वर्षीच्या विधानसभा निवडणुकांमध्ये त्यांनी चांगले यश मिळवले. या निवडणुकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांनी मिळून (शरद पवार गट आणि अजित पवार गट) एकूण २१.५ टक्के मते मिळवली होती, ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही. पुढे या दोन्ही पक्षांचे विलीनीकरण झाल्यानंतर २० ते २१ टक्के लोकांचा पाठिंबा असणारा हा पक्ष असणार होता. पुढील काळात महाराष्ट्राच्या राजकारणात अजित पवार अतिशय महत्त्वाची भूमिका बजावणार होते. पण दुर्दैवाने त्यांचा अकाली मृत्यू झाल्याने या सर्व शक्यता कागदावरच राहिल्या.

यापूर्वी विमान आणि इतर अपघातांमध्ये अनेक नेत्यांचे मृत्यू झाले आहेत. या नेत्यांच्या मृत्यूंमुळे राजकारणाची दिशा बदलल्याचे आपण पाहिले आहे. संजय गांधी, माधवराव शिंदे, आंध्र प्रदेशचे कर्तबगार माजी मुख्यमंत्री राजशेखर रेड्डी यांचे मृत्यू विमान अपघातांमध्येच झाले होते. तत्कालीन केंद्रीय कृषी मंत्री आणि महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांचा मृत्यू वाहन अपघातात झाला होता. या सर्वांच्या मृत्यूनंतर त्या त्या राज्याच्या किंवा देशाच्या राजकारणात बदल झाल्याचे आपण पाहिले आहे. आता अजित पवार यांच्या मृत्यूनंतर राज्याच्या राजकारणाची दिशाही बदलण्याची चिन्हे आहेत.

अलिकडच्या काळात अजित पवार आणि शरद पवार यांची जवळीक वाढत होती. राज्यातील महानगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये दोन्ही राष्ट्रवादी पक्षांची युती झाल्याचे आपण पाहिले. आता जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठीही हे दोन्ही पक्ष एकत्र आले आहेत. या निमित्ताने अजित पवार भारतीय जनता पक्षाशी असलेल्या युतीतून बाहेर पडून काकांबरोबर जाणार का, असा प्रश्न पुढे येत होता. अर्थात दोन्ही राष्ट्रवादी पक्षांची जवळीक वाढत असली तरी अजित पवार युतीतून बाहेर पडले असते, असे वाटत नाही. युतीबरोबर राहूनही ते स्वतःचे वेगळे अस्तित्व टिकवणार होते आणि त्याच वेळी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीशी जवळीक राखणार होते.

अजित पवार यांची प्रशासनावर घट्ट पकड होती याची अनेक उदाहरणे दिली जातात. त्याचबरोबर एखाद्याला शब्द दिला की तो पूर्ण करण्यासाठी ते जातीने लक्ष घालून काम करून द्यायचे, याचेही अनेक किस्से सांगितले जातात. असाच एक किस्सा मला आठवतो. अजित पवार यांचे महाविद्यालयीन शिक्षण कोल्हापूरच्या शहाजी कॉलेजमध्ये झाले होते. त्यामुळे त्यांचे कोल्हापूरवर आणि कॉलेजजवळ असलेल्या रंकाळा तलावावर विशेष प्रेम होते. मागे एकदा रंकाळा तलावात केंजाळ नावाची वनस्पती मोठ्या प्रमाणावर वाढली होती. ती पाहिल्यावर त्यांना वाईट वाटले आणि त्यांनी संबंधितांना हा तलाव दोन दिवसांमध्ये स्वच्छ करून देतो, असे आश्वासन दिले. त्यानंतर त्यांनी खरोखरच सर्व यंत्रणा कामाला लावून दोन दिवसांमध्ये तलाव स्वच्छ करून दिला. अजित पवार हे एक धडाडीचे नेते होते, सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये ते सहज मिसळत होते. त्यांचा कोणताही अभिजनवादी दृष्टिकोन नव्हता. त्यामुळेच ते जनमानसात लोकप्रिय होते. या संदर्भातील पवार कुटुंबाची परंपरा त्यांनी जपली होती.

गेल्या विधानसभा निवडणुकीत दोन्ही राष्ट्रवादी पक्षांना मिळून २१.५ टक्के मते खेचता आली होती. मग सत्तेत राहून स्वतःचे वेगळेपण कायम ठेवून (शरद पवार यांच्या पक्षाशी जवळीक साधून) ही २१ टक्के मते आपल्याकडे कशी ठेवता येतील याचा विचार अजित पवार करत होते. पुढील काळात त्यांचे भारतीय जनता पक्षाशी वाद झाले असते तर ते युतीतून बाहेरही पडले असते. पण लगेच युतीतून बाहेर पडण्याचा त्यांचा विचार असेल, असे मला वाटत नाही.

आता दोन्ही राष्ट्रवादी पक्षांसमोर एक मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. शरद पवार यांचे वय बरेच झाले आहे. अजूनही कार्यरत असले तरी आता ते पूर्वीप्रमाणे तडफेने काम करू शकत नाहीत, हे सत्य आहे. त्यातच अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांचा पक्षही नेतृत्वहीन झाला आहे. राज्यातल्या या महत्त्वाच्या पक्षापुढे आता नवे, सक्षम नेतृत्व निर्माण करण्याचे आव्हान आहे. अजित पवार यांच्या दुर्दैवी मृत्यूमुळे आता कदाचित दोन्ही राष्ट्रवादी पक्ष एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू होईल. त्यात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पुढील काळात सरकारमध्ये राहायचे की नाही याबाबत सुरू झालेली चर्चा. पण माझ्या मते हा पक्ष सरकारमध्ये राहील. त्यानंतरचा प्रश्न म्हणजे अजित पवार यांच्या जागी योग्य नेतृत्व देऊ शकेल असा सर्वमान्य नेता शोधणे. अजित पवार गटाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांच्याकडे नेतृत्व जाते की आणखी कोणाकडे, हे आता पाहावे लागणार आहे.

पुढील काळात 'पॉलिटिकल रिअलाईनमेंट्स' होण्याची शक्यता असून महायुतीतील अंतर्गत संघर्ष आणि स्वतःचे अस्तित्व प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसने काय भूमिका घ्यावी यावर त्या पक्षाच्या नेत्यांमध्ये होणारे विचारमंथन आणि त्यातून निर्माण होणारे नवे आडाखे हे मुद्दे हळूहळू स्पष्ट होत जातील. अर्थात त्यासाठी आपल्याला थोडी वाट पाहावी लागेल. अजित पवार यांच्या निधनामुळे त्यांच्या पक्षात आणि राज्याच्या राजकारणात एकूणच मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यामुळे पुढे काय घडामोडी घडतात यावर बरेचसे राजकीय विश्लेषक लक्ष ठेवून आहेत.

(लेखक राजकीय विश्लेषक आहेत.)

## वेध

### नंदकिशोर काथवटे

# पराक्रमाची पताका

प्रजासत्ताक दिन हा केवळ सोहळ्यांचा किंवा औपचारिक सन्मानांचा दिवस नसून, देशाच्या अंतर्गत सुरक्षेसाठी प्राणपणाने लढणाऱ्या शूर जवानांच्या त्यागाची आठवण करून देणारा दिवस आहे. याच पृष्ठभूमीवर यंदाच्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला गडचिरोली पोलिस दलाने मिळवलेला सन्मान हा केवळ एका जिल्ह्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण देशासाठी गौरवाचा विषय ठरतो. देशभरात जाहीर झालेल्या १२१ पोलिस शौर्यपदकांपैकी तब्बल ३१ शौर्यपदके गडचिरोली पोलिस दलाला मिळाली असून, त्यामुळे गडचिरोलीने देशात दुसरा क्रमांक पटकावला आहे. नक्षलवादग्रस्त म्हणून देशभरात ओळखल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्याने आज आपल्या ओळखीचा इतिहास बदलला आहे. कधीकाळी भीती, बंदूक आणि स्फोटांची छाया असलेला हा जिल्हा आज शौर्य, नियोजन आणि पोलिस दलाच्या शिस्तबद्ध कारवाईमुळे देशाच्या पटलावर सकारात्मक उदाहरण म्हणून उभा राहिला आहे.

२२ एप्रिल २०१८ रोजी बोरीया-कसनसूर येथे झालेल्या ऐतिहासिक चकमकीत ४० माओवाद्यांना ठार मारण्यात गडचिरोली पोलिसांना मिळालेले यश हे केवळ एक लष्करी यश नव्हते, तर नक्षल चळवळीच्या कणाकणावर घाव घालणारी निर्णायक कारवाई होती. या चकमकीत सहभागी असलेल्या पोलिस अधिकारी व जवानांनी दाखवलेले धैर्य, प्रसंगावधान आणि बलिदान आज शौर्यपदकांच्या रूपाने गौरवले जात आहे. पोलिस निरीक्षक अमोल फडतरे, सहायक उपनिरीक्षक वासुदेव मडावी, मधुकर नैताम, पोलिस नाईक संतोष नैताम, विश्वनाथ सडमेक, बिटाजी वेलाडी, करे उरपा आत्राम यांच्यासह अनेक जवानांनी जीव धोक्यात घालून देशाच्या सुरक्षेसाठी लढा दिला. काही जवानांनी तर आपले प्राण अर्पण करून कर्तव्याची सर्वोच्च पातळी गाठली. त्यांच्या बलिदानामुळेच आज गडचिरोलीचा चेहरा बदलताना दिसतो आहे. या शौर्याच्या जोडीला गडचिरोली पोलिस दलात झालेल्या ३९४ पदोन्नती हा देखील तितकाच महत्त्वाचा टप्पा आहे. वेगवर्धित पदोन्नती, तसेच हुतात्मा पोलिस जवानांच्या कुटुंबीयांना देण्यात आलेल्या पदोन्नती या निर्णयातून शासन आणि प्रशासनाचा संवेदनशील दृष्टिकोन दिसून येतो. केवळ शौर्यालाच नव्हे, तर प्रामाणिक सेवेची दखल घेणारी ही प्रक्रिया पोलिस दलाचे मनोबल वाढवणारी आहे. महत्त्वाचे म्हणजे गडचिरोली पोलिसांनी नक्षलवादाविरोधातील लढा केवळ बंदुकीच्या जोरावर लढलेला नाही. सोशल पोलिसिंगच्या माध्यमातून आदिवासी समाजात विश्वास निर्माण करणे, त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणणे आणि नक्षल चळवळीची वैचारिक मुळे कमकुवत करणे, हा या लढ्याचा खरा पाया ठरला आहे. पोलिस अधीक्षक निलोत्पल यांच्या मार्गदर्शनाखाली सी-६० पथकाने अतिदुर्गम व नक्षलप्रभावित भागात पोलिस चौक्या उभारून नक्षल्यांची मुस्कटदाबी केली. बिना गुंडा परिसरात उभारलेली पोलिस चौकी ही केवळ प्रशासकीय रचना नसून, राज्याच्या उपस्थितीचे आणि सुरक्षेच्या विश्वासाचे प्रतीक आहे. गडचिरोली पोलिसांच्या या कामगिरीकडे केवळ शौर्यपदकांच्या आकड्यांतून पाहणे ही मोठी चूक ठरेल. कारण हा लढा बंदुकीपेक्षा जास्त विश्वासाचा, संयमाचा आणि सातत्याचा आहे. नक्षलवादाला रोखताना पोलिसांनी केवळ हिंसाचाराचे उत्तर हिंसाचाराने दिले नाही, तर विकास, सुरक्षा आणि संवाद या तीन पायांवर उभी राहणारी नवी व्यवस्था निर्माण केली. आज गडचिरोलीत उभा राहत असलेला शांततेचा नवा अध्याय हा सहज घडलेला नसून, तो पोलिस जवानांच्या घाम, रक्त आणि बलिदानातून घडलेला आहे. म्हणूनच हा पराक्रम सन्मानापुरता न ठेवता, तो धोरणांचा भाग बनवणे हीच खरी राष्ट्रसेवा ठरेल. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी २०२६ पर्यंत संपूर्ण देश नक्षलमुक्त करण्याचा संकल्प जाहीर केला आहे. त्या संकल्पाच्या दिशेने गडचिरोली पोलिसांनी उचललेली पावले आज प्रत्यक्षात परिणाम देताना दिसत आहेत. नक्षलवादाच्या अंधारातून बाहेर पडत असलेला गडचिरोली जिल्हा हा देशातील इतर नक्षलप्रभावित भागांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो. प्रजासत्ताक दिनी मिळालेली ही शौर्यपदके केवळ सन्मानचिन्ह नाहीत, तर गडचिरोली पोलिसांच्या रक्त, घाम आणि बलिदानाची पावती आहेत. दुर्गम जंगल, अवघड भौगोलिक परिस्थिती आणि सततचा जीवघेणा धोका असूनही पोलिस जवानांनी कर्तव्याशी तडजोड केली नाही. शासन, प्रशासन आणि स्थानिक नागरिक यांच्यातील समन्वयातून उभा राहिलेला हा विश्वासाचा पूल नक्षलवादाच्या विरोधातील लढ्यात निर्णायक ठरत आहे. गडचिरोलीचा हा अनुभव देशातील इतर नक्षलप्रभावित भागांसाठी दिशादर्शक ठरू शकतो.

९९२२९९९५८८

## अलविदा दादा...

माझे नुकतेच दोनदा बारामतीत जाणे झाले. मुक्कामी राहता आले. यानिमित्ताने मला अजितदादा आणि अजितदादांची 'दादागिरी' खऱ्या अर्थाने अनुभवता आली. रस्त्यांची डागडुजी असू दे, पेयजलाच्या पाईपलाईनकरिता रस्ते खोदण्याचे काम असू दे की तुंबलेली ड्रेनेज सिस्टिम असू दे, बारामतीत कुठंही हिंडा, सारे काम त्वरेने आणि वेळेत पूर्ण झालेली असतील. केलेल्या कामाचे कोणतेही अवशेष अर्थात दगड-विटा-गिट्टी-मलबा असं काहीही इतस्ततः पडलेले दिसणार नाही, यावर अजितदादांचा कटाक्ष होता. व्यवस्था राबवायला दम लागतो. तो दम दादांच्या व्यक्तिमत्त्वात होता.

शनिवारी-रविवारी मतदारसंघात राहायचे, लोकसंपर्क करायचा, हे दादांनी थोरल्या पवार साहेबांकडूनच अंगीकारले. सकाळी सहा-साडेसहाला अजितदादा संबंधित सर्व अधिकाऱ्यांसह मतदारसंघात दौऱ्यावर निघायचे. कामाची सगळी टिपणे, बातम्यांच्या कात्रणांसह दादांच्या हातात मी बघितली आहेत. स्पॉटवर पोहोचल्याबरोबर पंचनामा सुरू. काय बिशाद प्रशासकीय अधिकाऱ्यांची कारणं सांगायची! सगळी प्रशासकीय पलटण दादांसमोर चळचळा कापायची. बोलताना दादा संयमी जरूर असायचे, पण दादांच्या बोलण्यात वचक, धाक जबरी असायचा. दादा हिशेब मागायचे ते जबाबदारीचा. बारामतीतील बसस्थानक, सार्वजनिक उपयोगाची ठिकाणे, ज्येष्ठ नागरिकांकरिता बागेत किंवा फूटपाथवर असलेली आसन व्यवस्था, चौकांचे सौंदर्यीकरण, खेळाची मैदाने, परिसरातल्या शिक्षण संस्था, कृषी प्रयोगशाळा, संशोधन केंद्रे बघितले आणि बारामती परिसरातल्या जनतेची अजितदादा किंवा थोरल्या पवार साहेबांविषयची कृतज्ञता कळायची. आज सकाळी दुर्दैवी अपघात झाला. बारामतीत पोहोचण्याकरिता दादांनी विमानात पाऊल ठेवले खरे, पण बारामतीच्या भूमीवर त्यांना पाऊल ठेवता आले नाही. त्यापूर्वीच त्यांचे विमान क्षतिग्रस्त झाले आणि अजितदादांचा करुण अंत झाला. त्यांना अलविदा म्हणताना दुःखाचे कढ कुणालाच आवरणार नाहीत. दादांच्या स्मृतींना आदरांजली.

**डॉ. पिनाक दंदे/**

अध्यक्ष, डॉ. दंदे फाऊंडेशन, नागपूर

## वाचक पत्रे

### अजितदादा, मनाला कसं समजावू?

आज २०२६ जानेवारीची २८ तारीख बुधवार दिवस सकाळी मृण्मयी माझी सूनबाई म्हणते, "बाबा, अजितदादा पवार विमान अपघातात मृत्युमुखी पडले." "अगं खोटं बोलतेस तू?" ती म्हणाली, "दूरदर्शनवर बातम्या बघा?" दादा, खरंच तुमच्या अपघाताची दृश्ये बघवली जात नव्हती. महाराष्ट्राच्या राजकारणातला कर्तृत्ववान चेहरा, शासकीय यंत्रणेवर दबाव ठेवून जनहितासाठी शासन राबवणारा खराखुरा राजकारणी, अनेक संकटांना, मोठ्या हिमतीने आणि कल्पकतेने त्यांना थोपवत लोकहित साधणारा नेता, अनेकांच्या कल्पनेच्या बाहेरचे आपले कर्तृत्व संपूर्ण जगाने अनुभवले. अजितदादा, पवार कुटुंबाचे एक वलय आपल्या पाठीशी होते, हे सत्य जरी असले तरी आपल्या सेवाकार्यात संत विचारांचा वसा होता.

दादा, माझ्या स्मरणात आपल्यासोबत झालेली नागपूर अधिवेशनातली भेट आठवते. आमचे मित्र आमच्या श्रीगुरुदेव चळवळीतून घडलेले दादा आपल्या चाणाक्ष दृष्टीने पारखलेले, साधा ग्रामीण भागातला कार्यकर्ता, प्रबोधनकार अमोल मिटकरी, आपणच ज्यांना विधान परिषद सदस्य आणि पक्षप्रवक्ता करून त्यांच्या गुणांचा सन्मान केला. आमदार अमोल मिटकरी यांनीच तुमची भेट आम्हाला घडवून आणली.

आपल्या उपमुख्यमंत्री बंगल्यात आपण दिलेली सकाळची आठची वेळ. आपण खुर्चीत विराजमान. आपला पहिला प्रश्न, आपण नाश्ता केला का? दादा, एवढी माणुसकी आपल्यात होती. गुरुकुंज आश्रमातून म्हणजे अमरावती जिल्हा येथून सकाळी निघालेली मंडळी उपाशी असतील. दादा, आपला धाक, आल्याबरोबर तिथल्या व्यवस्थापकांनी आमच्या नाश्त्याची व्यवस्था केली होती. गुरुदेव सेवा मंडळाचे ज्येष्ठ प्रचारक आचार्य हरिभाऊ वेरूळकर, प्रबोधनकार नामदेव गव्हाळे, स्वतः मी, श्रीगुरुदेव अध्यात्म गुरुकुलचे रविदादा मानव, नागपूर श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे अशोक यावले, सोबतीला राजकीय विश्लेषक अविनाश काकडे आम्हा सर्वांचा सर्वप्रथम आस्थेने आपण परिचय करून घेतला. नंतर आपण राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या श्रीगुरुदेव सेवा मंडळाची व्याप्ती समजून घेतली. मी म्हणालो, दादा, आपणास वेळ तर होणार नाही? आपण हसत म्हणाला, कधी तरी आपल्यासारखी गावखेड्यापर्यंत लोकजागरण करणारी मंडळी भेटतात. त्यांच्याकडन खूप काही शिकता येतं. मग मी आपल्या भेटीचा उद्देश सांगत म्हणालो, "अमरावती येथील संत गाडगेबाबा विद्यापीठात, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज अध्यासन निर्माण व्हावे यासाठी शासन अनुदानाची गरज आहे." दादा, आपण त्वरित संत गाडगे बाबा विद्यापीठाचे तत्कालीन प्रभारी कुलगुरू डॉ. प्रमोद येवले यांना फोन करून अध्यासनासंबधी सर्व माहिती घेतली. आम्ही दिलेल्या निवेदनावर आपण हिरवा शेरा मारला.

अजितदादा, या साऱ्या आठवणी आणि डोळ्यात अश्रूंच्या धारा आहेत. दादा, ती भेट, तो आपला स्मित हास्य करणारा प्रसन्न चेहरा आणि भाषेचा वेगळा बाज माझ्या हृदयात कोरला आहे. तो सांभाळत मी माझ्यातला सेवाभाव जपणार आहे.

**ज्ञानेश्वर दुर्गादास रक्षक**/९८२३९६६२९२

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/





### दादांची एक्झिट मनाला चटका लावणारी

# सह्याद्री गहिवरतोय, महाराष्ट्र रडतोय...

## ६ वेळा उपमुख्यमंत्री राहिलेल्या अजितदादांची वाटचाल व आठवणी

**महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले आहे. बुधवार, १८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८.४५ वाजता बारामती विमानतळावर लँडिंग करताना हा अपघात झाला. त्यांच्यासोबत विमानात असलेल्या सर्वांचा मृत्यू झाला. अजित पवारांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणावर मोठी पोकळी निर्माण झाली आहे. एखाद्या नेत्याच्या निधनानंतर सह्याद्री रडतोय तर महाराष्ट्र गहिवरतोय, असा नेता पुन्हा होणे नाही...**

### बारामतीत शिक्षण घेतले, काका शरद यांना घाबरायचे

अजित पवार यांचा जन्म २२ जुलै १९५९ रोजी अहमदनगर जिल्ह्यातील देवळाली प्रवरा येथे झाला होता. ते शरद पवार यांचे मोठे भाऊ अनंतराव पवार यांचे सुपुत्र होत. अजित यांचे वडील चित्रपटसृष्टीशी संबंधित होते आणि मुंबईतील व्ही. शांताराम यांच्या राजकमल स्टुडिओमध्ये काम करत होते. पवारांचे आजोबा, गोविंदराव पवार, बारामती सहकारी व्यापारात काम करत होते आणि त्यांच्या आजी शेतीची देखभाल करत होत्या. अजित यांच्या मोठ्या भावाचे नाव श्रीनिवास आहे. श्रीनिवास कृषी आणि ऑटोमोबाइलशी संबंधित मोठे व्यावसायिक आहेत. असे म्हटले जाते की अजित आपल्या महत्त्वाच्या निर्णयांमध्ये मोठ्या भावाचा सल्ला घेत असत. त्यांनी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी हायस्कूल, बारामती येथून आपले प्राथमिक शिक्षण घेतले. कॉलेजमध्ये असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. अजित यांनी महाराष्ट्रातील कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठातून पदवी संपादन केली आहे. अजित सुरुवातीला शरद पवारांचे खासगी सचिव होते. एका वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत बालपणाचा उल्लेख करताना अजित म्हणाले होते, मी सुरुवातीपासूनच माझ्या काकांना घाबरत होतो, पण आम्हा भावंडांमध्ये नेहमीच प्रेम होते. मला वाटते की पक्ष आणि कुटुंब वेगळे ठेवले पाहिजेत. अजित यांनी महाराष्ट्राचे माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांच्या बहीण सुनेत्रा पवार यांच्याशी विवाह केला आहे. त्यांना जय पवार आणि पार्थ पवार अशी दोन मुले आहेत. सुप्रिया सुळे या अजित यांच्या चुलत बहीण आहेत.

### अजित पवारांचा राजकारणात प्रवेश

अजित पवारांनी सहकार, शेती व ग्रामीण प्रश्नांमधून राजकारणात सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी आपले चुलते शरद पवारांच्या नेतृत्वात बारामती परिसरात संघटनात्मक कामातून आपल्या नेतृत्वाची चुनूक दाखवली. त्यामुळे लवकरच राज्य पातळीवर एक प्रभावी नेता म्हणून त्यांचा उदय झाला. अजित पवार १९८२ मध्ये पुण्यातील एका सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर निवडून आले. यामुळे त्यांच्या सक्रिय राजकीय कारकिर्दीची सुरुवात झाली. त्यांचे काका शरद पवार यांच्या निगराणीखाली त्यांनी झपाट्याने प्रगती केली. अजित पवार पहिल्यांदा १९९१ मध्ये बारामती येथून लोकसभेचे खासदार झाले, परंतु त्यानंतर त्यांनी शरद पवारांसाठी ही जागा सोडली. त्याच वर्षी ते बारामती येथून आमदार झाले आणि त्यानंतर १९९५, १९९९, २००४, २००९, २०१४, २०१९ आणि २०२४ मध्ये सलग विजयी झाले. त्यांनी सिंचन, वित्त, कृषी आणि ग्रामीण विकास अशी महत्त्वाची खाती सांभाळली. त्यांनी महाराष्ट्राचे अनेक वेळा उपमुख्यमंत्री म्हणून काम केले आणि डिसेंबर २०२४ पासून देवेंद्र फडणवीस सरकारमध्ये पुन्हा काम केले. ते नियमितपणे सार्वजनिक सभा घेत असत आणि त्यांच्या जलद निर्णय घेण्याबद्दल प्रसिद्ध होते. अजित पवार यांचे १९८५ साली महाराष्ट्राचे माजी मंत्री पद्मसिंह पाटील यांच्या कन्या सुनेत्रा पवार यांच्याशी लग्न झाले. त्यांना जय आणि पार्थ ही दोन मुले आहेत. पार्थ राजकारणातही सक्रिय आहे.

### संस्थात्मक व सामाजिक भूमिका

अजित पवारांनी १९९१ पासून आतापर्यंत उपमुख्यमंत्री, वित्त नियोजन, ऊर्जा, जलसंपदा, ग्रामविकास आदी आदी विविध पदे भूषवली. ते बारामती विद्या प्रतिष्ठानचे विश्वस्त होते, त्यांनी वसंतदादा शुगर इन्स्टिट्युट पुणे, रयत शिक्षण संस्था सातारा, पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन, महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशन, म हाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन, महानंद व महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघ आदी विविध संस्थांवर ते अध्यक्ष ते सदस्य म्हणून कार्यरत होते. या सर्व संस्थांवर त्यांनी आपल्या कामाची छापही पाडली होती.

### शरद पवारांसाठी लोकसभा जागा सोडली

अजित पवारांनी १९८२ मध्ये राजकारणात प्रवेश केला. तेव्हा ते एका सहकारी साखर कारखान्याच्या मंडळावर निवडून आले होते. त्यानंतर १९९१ मध्ये ते पुणे जिल्हा सहकारी बँकेचे (पीडीसी) अध्यक्ष बनले आणि १६ वर्षे या पदावर राहिले. १९९३ मध्ये ते पहिल्यांदा बारामतीमधून खासदार झाले. पोटनिवडणूक झाली, तेव्हा त्यांनी काका शरद पवारांसाठी जागा सोडली. येथूनच निवडून शरद पवार पी.व्ही. नरसिंह राव यांच्या सरकारमध्ये संरक्षण मंत्री बनले. १९९६ ते २००४ पर्यंत शरद पवार बारामतीमधून खासदार राहिले. १९९५ मध्ये अजित पवार बारामती विधानसभा मतदारसंघातून आमदार झाले. त्यानंतर १९९९, २००४, २००९ आणि २०१४ मध्येही ते याच मतदारसंघातून आमदार म्हणून निवडून आले. १९९९ मध्ये विलासराव देशमुख यांच्या सरकारमध्ये त्यांना जलसंपदा विभागात कॅबिनेट मंत्री बनवण्यात आले. २००४ मध्ये जेव्हा राष्ट्रवादी काँग्रेसला ७१ जागा मिळाल्या, तेव्हा शरद पवारांनी काँग्रेसला (६९ जागा) सरकार स्थापन करण्याची संधी दिली. शरद पवारांच्या या निर्णयामुळे अजित पवार नाराज झाले होते. अजित पवारांच्या सहकाऱ्यांचे असे मत होते की, हे त्यांना बाजूला सारण्यासाठी केले जात आहे. त्यांचे काका त्यांना मुख्यमंत्री होण्यापासून रोखण्यासाठी हे सर्व करत आहेत. 'अजित पवारांनी त्यांना नेहमीच पितृतुल्य मानले आहे. पक्षात असताना त्यांनी जे काही निर्णय घेतले, ते शरद पवारांच्या इच्छेनेच घेतले.' अजित पवार आणि शरद पवार एकाच राजकीय घराण्यातून आले असले तरी त्यांच्या राजकारणात खूप फरक आहे. शरद पवार कधीही स्पष्ट बोलत नाहीत, तर अजित यांना एखाद्या गोष्टीला नाही म्हणायचे असेल तर ते कधीही बोलण्यास चुकत नाहीत.

### त्यांचा पहाटेचा शपथविधी

२२ नोव्हेंबर २०१९, संध्याकाळी ४ वाजताची वेळ. काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे (एनसीपी) सर्व दिग्गज नेते नेहरू सेंटर मुंबईत एकेक करून पोहोचत होते. भाजप आणि शिवसेनेची युती तुटल्यानंतर महाराष्ट्रात गेल्या चार आठवड्यांपासून हे निश्चित झाले नव्हते की सरकार कोण बनवणार आणि कोणासोबत मिळून बनवणार. या दृष्टीने ही बैठक अत्यंत महत्त्वाची होती. सेंटर टेबलवर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार आणि त्यांच्या शेजारी त्यांचे पुतणे अजित पवार एक फाईल घेऊन बसले होते. त्यांच्या हावभावांवरून ते मीटिंगला कंटाळले असावेत असे वाटत होते. तेवढ्यात अजित यांच्या मोबाईलवर एक मेसेज आला. ते वॉशरूमला जाण्याच्या बहाण्याने बाहेर गेले आणि सुमारे १० मिनिटे फोनवर बोलत राहिले. परत आल्यावर त्यांचा अंदाज आणि चेहऱ्यावरील भाव बदलले होते. बैठकीत उपस्थित असलेल्या कोणालाही दुसऱ्या दिवशी सकाळी काय होणार आहे याचा अंदाज नव्हता. २२ नोव्हेंबर २०१९ रोजी महाविकास आघाडीच्या बैठकीत उद्धव ठाकरे पाच वर्षे सरकार चालवतील असे ठरले. दुसऱ्या दिवशी २३ नोव्हेंबर रोजी पहाटे ६:३० वाजता शरद पवार एका फोन कॉलने जागे झाले. फोनवर कोणीतरी घाबरून म्हणाले, 'मी नुकताच राजभवनातून परतलो आहे, तुम्ही एकदा न्यूज चॅनल बघा.' हा फोन शरद पवारांच्या पक्षाच्या सदस्याचा होता. शरद यांना काहीतरी शंका आली, फोन ठेवताच त्यांनी लगेच वर्तमानपत्र पाहिले. एका इंग्रजी दैनिकाने छापले होते की 'पुढील पाच वर्षे उद्धव सर्वसंमतीने मुख्यमंत्री असतील'. पुढच्याच क्षणी त्यांनी दूरदर्शनवर वृत्तवाहिन्या तपासल्या तेव्हा पाहिले की हेडलाइन होती - देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतील. अजित पवार महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री असतील. शरद पवार यांना समजायला वेळ लागला नाही. त्यांनी लगेच उद्धव ठाकरे यांना फोन लावला. २ डिसेंबर २०१९ रोजी एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत शरद पवार यांनी सांगितले होते की, 'मी सर्वात आधी उद्धव ठाकरे यांना फोन केला आणि म्हटले, हे जे काही घडले आहे ते योग्य नाही. आपल्याला ते दुरुस्त करावे लागेल. आपण जे ठरवले आहे तेच होईल.' तिन्ही पक्षांच्या (काँग्रेस, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस) चर्चेला काही अंत नाही. गेल्या एका महिन्यापासून फक्त चर्चाच सुरू आहे, जी कुठेही पोहोचणार नाही. राज्याला एक स्थिर सरकार हवे आहे, म्हणूनच मी हे पाऊल उचलले आहे.

### प्रतिभा पवारांमुळे अजितदादा परतले

अजित पवार यांच्या मनधरणीची जबाबदारी चुलत बहीण सुप्रिया यांना देण्यात आली. सुरुवातीला सुप्रियांना वाटले की अजितदादा ऐकणार नाहीत. म्हणून त्यांनी त्यांच्या आई प्रतिभा पवार यांच्याशी बोलणे करून दिले. प्रतिभा पवार यांना अजित यांनी नेहमीच आईप्रमाणेच मानले. अजित दादांना प्रतिभा पवारांचे म्हणणे समजले आणि ते राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये परतले. असे मानले जाते की शरद पवारांच्या दबावामुळे बंडखोर आमदारांनी आपले मन बदलले होते, त्यामुळे अजित यांनाही परत फिरावे लागले. अशा प्रकारे शपथ घेतल्यानंतर अवघ्या ८० तासांतच सरकार कोसळले. २०१९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमधून बाहेर पडून भाजपमध्ये सामील झाल्यानंतर अजित पवारांना 'घर फोडणारे' म्हटले गेले. अजित पवारांनी काही काळापूर्वी एका मुलाखतीत सांगितले होते की, 'आम्ही भाजपमध्ये सामील होणार आहोत, हे शरद पवारांना माहीत होते.' नंतर ते त्यांच्या शब्दावरून फिरले.२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत अजित पवारांनी त्यांची बहीण सुप्रिया सुळे यांच्या विरोधात पत्नी सुनेत्रा यांना निवडणुकीत उभे केले होते, पण सुनेत्रा हरल्या. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत अजित पवारांनी त्यांची बहीण सुप्रिया सुळे यांच्या विरोधात पत्नी सुनेत्रा यांना निवडणुकीत उभे केले होते, पण सुनेत्रा हरल्या. राजदीप सरदेसाई यांनी त्यांच्या **'२०२०: द इलेक्शन दॅट सरप्राइज्ड इंडिया'** या पुस्तकात याचा उल्लेख करताना लिहिले आहे की, २०१९ मध्ये जेव्हा भाजपने अजित पवारांना आपल्या बाजूने घेतले, तेव्हा त्यांनी हे वचन घेतले की तुम्ही लोकसभा निवडणुकीत पत्नी सुनेत्रा पवार यांना सुप्रिया सुळे यांच्या विरोधात उभे कराल. अजित यांनी एका मराठी चॅनलला दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते, 'बहिणीच्या विरोधात पत्नीला उभे करणे ही एक चूक होती. सुप्रियांच्या विरोधात लढवण्याचा निर्णय पक्षाच्या संसदीय मंडळाचा होता. आता मला वाटते की तो चुकीचा निर्णय होता.'

### त्यांच्यावर सर्वात मोठ्या घोटाळ्याचा आरोप

१९९९ ते २००९ पर्यंत अजितदादा जलसंधारण मंत्री होते. सिंचनासाठी धरणे बांधण्याच्या योजनेत मोठा घोटाळा झाल्याचा आरोप करण्यात आला. अजित पवार यांच्यावर सुमारे ७० हजार कोटी रुपयांच्या गैरव्यवहाराचा आरोप करण्यात आला. २०१४ च्या निवडणूक प्रचारादरम्यान फडणवीस यांनी अजित पवारांना भ्रष्ट म्हटले होते आणि शोले चित्रपटातील 'चक्की पिसिंग-पिसिंग' हा संवाद वापरून त्यांच्यावर टीका केली होती. अजित पवार यांनी नुकत्याच एका मराठी वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत घोटाळ्याच्या प्रश्नावर म्हटले होते, 'महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीचा खर्च ४२ हजार कोटी रुपये होता. ७० हजार कोटी कुठून येणार? हे सर्व बदनामी करण्याचे षडयंत्र आहे.' बॉम्बे उच्च न्यायालयाने २२ ऑगस्ट २०१९ रोजी महाराष्ट्र सहकारी क्षेत्रातील साखर कारखाने फसवणुकीने विकल्याच्या आरोपांची चौकशी करण्याचे आदेश दिले आणि ते कवडीमोल भावाने विकले गेले असे म्हटले, त्यानंतर पोलिसांनी तक्रार नोंदवून प्रकरणाचा तपास सुरू केला आणि त्याचा क्लोजर रिपोर्ट सादर करण्यात आला आहे. २०२१ मध्ये ईडीने क्लोजर रिपोर्टला विरोध केला होता आणि जुलै २०२१ मध्ये, या घोटाळ्याच्या संदर्भात जरंडेश्वर साखर कारखान्याची मालमत्ताही जप्त केली होती, ज्यात अजित पवार कधीकाळी संचालक होते. घोटाळ्याच्या आरोपानंतर अजित यांनी त्यांचा मुलगा पार्थ पवारला सांगितले होते की, शेती करणे राजकारणापेक्षा अधिक फायदेशीर आहे. तर २०१९ मध्ये त्यांनी त्यांचा मुलगा पार्थला मावळमधून लोकसभा निवडणूक लढवली होती, जिथे ते हरले होते.

### सुप्रिया सुळेंचे मोठे विधान

१७ एप्रिल २०२३. शरद पवारांच्या कन्या सुप्रिया सुळे म्हणाल्या की, १५ दिवसांत महाराष्ट्राच्या राजकारणात दोन मोठे स्फोट होतील. त्यानंतर बरोबर १० दिवसांनी, म्हणजेच २७ एप्रिल रोजी शरद पवार म्हणाले की, भाकरी योग्य वेळी फिरवली नाही तर ती करपते. भाकरी फिरवण्याची वेळ आली आहे. या संकेतांच्या नंतर २ मे २०२३ रोजी शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (छउझ) अध्यक्षपद सोडण्याची घोषणा केली. अजित पवार म्हणाले- नवीन चेहऱ्यांना पुढे आणणे ही राष्ट्रवादी काँग्रेसची परंपरा राहिली आहे. अजित नीट आनंद साजरा करू शकले नाहीत तोच ४ दिवसांनी शरद पवारांनी राजीनामा मागे घेतला. अजित पवारांनी पुन्हा एकदा आपला मार्ग बदलण्याचा विचार केला. ३० जून २०२३. अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन वेगवेगळ्या बैठका बोलावल्या. दुसऱ्या बैठकीत आमदारांसोबत अजित पवारांच्या बहीण सुप्रिया सुळेही उपस्थित होत्या, मात्र त्यांना याची कल्पना नव्हती. शरद पवार त्यावेळी महाराष्ट्राबाहेर होते. एका पत्रकाराने विचारले की अजित पवार बैठक बोलावताहेत आणि तुम्ही इथे आहात, तेव्हा शरद पवार म्हणाले होते की अजित पवार विरोधी पक्षनेते आहेत, त्यामुळे त्यांना आमदारांची बैठक बोलावण्याचा अधिकार आहे.' या वक्तव्यानंतर बरोबर दोन दिवसांनी अजित पवारांनी पुन्हा एकदा पक्षाविरुद्ध बंड केले. अजित पवार आपल्या ३० समर्थक आमदारांसह शिंदे सरकारमध्ये सामील झाले. २ जुलै रोजी अजित पवारांनी महाराष्ट्र सरकारमध्ये सामील होऊन पाचव्यांदा उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. छगन भुजबळ यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसच्या ९ आमदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. २०१९ मध्ये अजित पवारांनी देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली होती. सध्या ते दोघेही उपमुख्यमंत्रिपदावर आहेत. ९ जुलै २०२३. शरद पवारांनी एका पत्रकार परिषदेला संबोधित करताना म्हटले की, असे कसे होऊ शकते की, ज्याने पक्ष स्थापन केला, त्याच पक्षाकडून त्याची ओळख, त्याचे निवडणूक चिन्ह हिरावून घेतले जावे. ६ फेब्रुवारी २०२४ रोजी अजित पवारांना राष्ट्रवादी काँग्रेसचे निवडणूक चिन्ह 'घड्याळ' मिळाले होते आणि शरद पवारांना 'तुतारी वाजवणारा माणूस' हे निवडणूक चिन्ह मिळाले होते. या निर्णयावर शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड म्हणाले होते की, हे होणारच होते, आम्हाला आधीच माहीत होते. आज त्यांनी (अजितदादांनी) शरद पवारांचा राजकीय गळा घोटला आहे. २ मे २०२३ रोजी शरद पवारांनी आपल्या भाषणात म्हटले होते- आता माझे वय झाले आहे, आता नवीन पिढीने सत्ता सांभाळावी. २ मे २०२३ रोजी शरद पवारांनी आपल्या भाषणात म्हटले होते- आता माझे वय झाले आहे, आता नवीन पिढीने सत्ता सांभाळावी.

### कुटुंबाची एकत्र दिवाळी

२०२३ पर्यंत बारामतीमध्ये कुटुंब एकत्र दिवाळी साजरी करत असे ३५ डेज या पुस्तकानुसार, जेव्हा अजित पवार पक्षातून बाहेर पडले तेव्हा सुप्रिया त्यांना समजावण्यासाठी पोहोचल्या होत्या. अजित पवार यांच्या समर्थकांचे मत आहे की सुप्रिया सुरुवातीपासूनच अजित यांच्या प्रचारक राहिल्या आहेत. दोघांनी कधीही एकमेकांना लक्ष्य केले नाही. राजकीय मतभेद कितीही असले तरी, शरद पवार यांचे संपूर्ण कुटुंब बारामतीमध्ये एकत्रच दिवाळी साजरी करते. या वर्षीचे माहीत नाही पण २०१९ असो वा २०२३, यात कोणताही फरक पडलेला नाही. या वर्षी अजित पवारांनी त्यांच्या काटेवाडी गावात दिवाळी साजरी केली, तर शरद पवारांनी गोविंदबाग निवासस्थानी दिवाळी समारंभाचे आयोजन केले. यापूर्वी अजित काका शरद यांच्या घरीच दिवाळी साजरी करत होते. अजित जेव्हा राष्ट्रवादी काँग्रेसमधून वेगळे झाले, तेव्हा बहीण सुप्रिया म्हणाल्या होत्या की, आपल्यात कितीही मतभेद असले तरी आपण कुटुंबात राजकारण येऊ देणार नाही.

---

- * २013 मध्ये एका कार्यक्रमादरम्यान ते म्हणाले होते - जर धरणात पाणी नसेल तर काय मुतून करून भरायचे? तथापि, नंतर त्यांनी यासाठी माफी मागितली.
- * १७ एप्रिल २014 रोजी त्यांनी निवडणूक प्रचारादरम्यान म्हटले होते, जर सुप्रिया सुळे यांना मत दिले नाही तर गावकऱ्यांचे पाणी बंद करू.
- * १५ ऑगस्ट २०२४ रोजी NI ला दिलेल्या एका मुलाखतीत ते म्हणाले होते की, बहिणीविरुद्ध पत्नीला लढवून चूक केली, असे करायला नको होते.
- * लोकसभा निवडणुकीत पत्नीचा पराभव झाल्यानंतर पत्नीला राज्यसभा खासदार केले.
- * शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारधारेवर चालण्यावर अजितदादा कायम होते ठाम.
- * नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत त्यांनी भाजपालाही अंगावर घेतले.
- * पहिले राजकीय बंड फसल्यानंतर दुसऱ्या बंडात अजितदादा यशस्वी होत उपमुख्यमंत्री झाले.
- * महाराष्ट्र सरकारमध्ये लोक ७५ वर्षांच्या वयात निवृत्त होतात. पण हा माणूस (शरद पवार) ८० वर्षांचा झाल्यावरही निवृत्त होत नाही. हे काय चालले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/






## एक घाव, दोन तुकडे अशी दादांच्या कामाची पध्दत होती

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाले त्याचे वृत्त समजताच धक्का बसला. लहान बहीण म्हणून मला ते बोलत असत. ''काय ग प्रणिती'' असे म्हणायचे. मतदारसंघासाठी मला त्यांनी खास निधी दिला होता. प्रत्येक कार्यकर्त्यांच्या मनात, हृदयात दादांनी स्थान निर्माण केले होते. ''एक घाव दोन तुकडे'' अशी दादांच्या कामाची विशिष्ट पध्दत होती.

**- खासदार प्रणिती शिंदे**

## दिलदार नेता हरपला...

२० टक्के राजकारण ८० टक्के समाजकारण ही अजितदादा पवार यांची विकासाविषयीची भूमिका असायची. शिक्षण, सहकार, विकास या विषयीचे ते मार्गदर्शक होते. सर्वसामान्यांचे हित जोपासणारा, कुशल राजकारणी व दिलदार नेता हरपला.

**- खा.धैर्यशील मोहिते पाटील**

## आपल्यातला माणूस हरपला

पवार व मोहिते पाटील घराण्याचे गेल्या तीन पिढ्यांचे संबंध आहेत. हे संबंध आम्ही कधी तुटू दिले नाही. राजकारणात कमी जास्त होत असते. परंतु पवार व मोहिते पाटील परिवाराने कधीच वितुष्ठ येऊ दिले नाही. अजितदादांच्या निधनाने महाराष्ट्राचे अपरिमित नुकसान झाले आहे. आपल्यातील माणूस हरपला आहे. ही पोकळी भरुन निघणे कठीण आहे.

**- आ.रणजितसिंह मोहिते पाटील**

## सर्वसामान्यांचे हित जोपासणारा नेता

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकी संदर्भात माझी व अजितदादांची बारामतीत भेट झाली. त्या भेटीत त्यांनी खा.धैर्यशील मोहिते पाटील व माझ्यावर पूर्ण विश्वास दाखविला. विचाराने आम्ही वेगळे असू. परंतु आमच्यात कधीच अंतर पडले नाही. असा कर्तृत्ववान, सर्वसामान्यांचे हित जोपासणारा नेता पुन्हा होणे नाही. अजितदादांना महाराष्ट्र कधीच विसरणार नाही.

**-आमदार उत्तमराव जानकर**

## असा नेता होणे नाही

राज्याच्या प्रशासनावर पकड असलेले एक धाडसी, अभ्यासू अन् कणखर नेतृत्व हरपले. ही राजकीय पोकळी कधीही भरुन निघणार नाही. विकासपुरूष, युगपुरूष अजितदादांसारखा असा नेता पुन्हा होणे नाही. जनतेची विकासकामे करताना प्रशासनात त्यांचा आदरयुक्त धाक होता, यामुळे अनेक विकासकामे गतीने होत होती. पण आज अचानक आलेल्या या वाईट बातमीने अतिव दुःख झाले.

**- आमदार देवेंद्र कोठे, शहर मध्य विधानसभा मतदार संघ**

## जवळ घेऊन विचारपूस करणारा आदर्श नेता

अजितदादांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. आमच्यासारख्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांना जवळ घेऊन विचारपूस करणारा आदर्श नेता काळाच्या पडद्याआड झाला; याचे खूप दुःख वाटते आहे. मी पहिल्यांदा विधिमंडळात गेल्यानंतर माझे आपुलकीने स्वागत करणारे अजितदादा पवार आज हयात नाहीत. संपूर्ण करमाळा माढा मतदारसंघाच्या वतीने आम्ही अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पित करतो.

**-आमदार नारायण पाटील, करमाळा विधानसभा मतदारसंघ.**

## अधिकाऱ्यांनी केली होती कडक सूचना

श्री विठ्ठल व रुक्मिणी हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत आहेत. यामुळे विठ्ठल मंदिर अतिशय देखणे व सुंदर झाले पाहिजे, अशी कडक सूचना उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी अधिकाऱ्यांना केली होती. मंदिराचे जतन व संवर्धनासाठी ७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. १२५ कोटीच्या दर्शन मंडपासाठी देखील मंजुरी मिळाली आहे. वारकऱ्यांची तळमळीने काळजी घेणारा एक नेता हरपला आहे .

**-ह.भ.प.गहिनीनाथ औसेकर,**
**श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे सहअध्यक्ष**

## सर्वांचा आधारस्तंभ हरपला

महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धडाडीचं नेतृत्व आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बारामती इथं झालेल्या विमान अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला; हे ऐकून धक्काच बसला. या अपघातात विमानातील वैमानिकांसह इतर सहकाऱ्यांचाही मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आणि या घटनेवर विश्वास ठेवणं शक्य वाटत नव्हतं. मात्र विविध वाहिन्यांवर बातम्या पाहिल्या आणि आम्ही तातडीने बारामतीकडे रवाना झालो आहोत. सोलापूर जिल्ह्याकडे जास्त लक्ष होते; त्यांच्यामुळे जिल्ह्यातील अनेक विकासाची कामे मार्गी लागली आहेत. सोलापूरचाच नाहीतर राष्ट्रवादीसह अवघ्या राज्याचा आधारस्तंभ गेल्याचे दुःख होत आहे.

**- बळीरामकाका साठे, माजी जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस**

## विकासाभिमुख दूरदृष्टी असलेला नेता गमावला

बारामती येथे महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजितदादा पवार यांच्या विमानाला अपघात झाला आणि त्यात त्यांचे दुदैवी अपघाती निधन झाले. दादाची प्रशासनावरची पकड व निर्णयक्षमता, पहाटेपासून कामाचा झपाटा, महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयाची भौगोलिक व आर्थिक प्रश्नांची जाण असणारे, मिश्किल पण स्पष्ट स्वभाव यामुळे लोकप्रिय असणारे लोकनेते होते. कार्यकर्त्यांना बळ देणारे नेतृत्व आज आपल्यातून निघून गेले. महाराष्ट्राने एक दूरदृष्टी असलेला नेता गमावला आहे.

**- राजू राठी, धवल शहा (चेंबर ऑफ कॉमर्स)**

## अतिशय दुर्दैवी घटना

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे अकाली निधन मनाला वेदना देणारी आणि काळजाला चटका लावून जाणारी दुर्दैवी घटना आहे. अजितदादा आपल्यातून इतक्या लवकर निघून जातील, असे स्वप्नातही वाटले नव्हते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या खांद्याला खांदा लावून उपमुख्यमंत्री अजितदादा हे राज्यातील विविध विकासाची कामे करत होते. परखड विचार, स्पष्टवक्तेपणा आणि निर्भीडपणे, रोखठोक मत मांडण्याची त्यांची शैली सर्वश्रुत होती. त्यांच्या जाण्याने राज्याची मोठी हानी झाली आहे

**- रोहिणी तडवळकर, शहराध्यक्षा, भाजपा, सोलापूर**

## प्रशासनाला मार्गदर्शक असणारा अनुभवी नेता...

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार विकासात्मक आणि कलात्मक दृष्टी असलेले अनुभवी नेतृत्व होते. समाजकारण, राजकारण आणि प्रशासनाला मार्गदर्शक ठरणारा एक अभ्यासू अनुभवी कणखर नेता हरपला आहे. सोलापूर महापालिका आवारातील इंद्रभुवन या वास्तूची सूक्ष्म पाहणी केली होती. उत्कृष्ट वास्तू कशी असावी? यांची अभ्यासपूर्ण माहिती त्यांना होती. इंद्रभुवन वास्तू नूतनीकरणातील काही त्रुटीही त्यांनी सुचित केल्या होत्या. उजनी-सोलापूर समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण करा. सोलापूर शहराला पाणीपुरवठा सुरळीत ठेवावा, अशा स्पष्ट सूचना त्यांनी दिल्या होत्या.

**- आशिष लोकरे, महापालिका उपायुक्त**

## क्रीडा क्षेत्राला भरभरून हात देणारे व्यक्तिमत्व

सोलापूर, धाराशिव , लातूर , कोल्हापूर सातारा जिल्ह्यातील तरुणांना पिंपरी चिंचवड, चाकण, भोसरी येथील औद्योगिक वसाहत निर्माण करून मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध करून दिला. पिंपरी चिंचवडसारखे अतिशय नियोजनबद्ध शहर उभा करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. कार्यकर्त्यांना बळ देणारे नेतृत्व आज आपल्यातून निघून गेले. महाराष्ट्राने एक दूरदृष्टी असलेला नेता गमावला आहे. विदर्भ मराठवाड्यात बरोबर पश्चिम महाराष्ट्रामध्ये ही जे पाण्याचे योग्य नियोजन झालं आहे त्या पाठीमागे त्यांचेच नियोजन होते. जनतेची विकासकामे करताना प्रशासनात त्यांचा आदरयुक्त धाक होता. क्रीडा क्षेत्राला ही अतिशय भरभरून हात देणारे व्यक्तिमत्व अतिशय दूरदर्शी अभ्यासू नेतृत्वाला महाराष्ट्र मुकला.

**- प्रा सचिन गायकवाड, सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य**

## वडिलधाऱ्यांप्रमाणे आधार, मित्रासारखी आपुलकी

अजितदादा यांच्या मनात प्रत्येकासाठी मोठ्या भावासारखी ममत्व, वडिलधाऱ्यांप्रमाणे आधार आणि मित्रासारखी आपुलकी होती. मी जिथेही असलो, कितीही गर्दी असली, त्यांनी नेहमी मला नावाने हाक मारुन माझ्याशी जुळलेलं मनोगते दाखवले हे प्रेमाचे छोटे परंतु जिव्हाळ्याचे क्षण आता आयुष्यभर स्मरणात राहतील. त्यांच्या निधनाने एक मोठा भावाचा छत्रछाया हरपल्यासारखा वाटतो, आणि हे दुःख शब्दांत सांगता येत नाही.

**- बसवराज कोळी, मीडिया सेल अध्यक्ष सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

## आमचा बाप माणूस गेला

महाराष्ट्राच्या राजकारणातील एक चाणक्य, दूरदृष्टी असलेला आणि विकासाची घोडदौड अविरत सुरू ठेवणारा नेता काळाच्या पडद्याआड गेला आहे. प्रभाग क्रमांक २२ च्या विकासासाठी त्यांनी कोट्यवधी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. विकासकामांच्या बाबतीत त्यांनी कधीही नकार दिला नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या रुपाने आम्ही केवळ एक नेता नाही, तर आमचा बाप माणूस गमावला आहे.

**- नगरसेवक किसन जाधव**

## अतिशय धक्कादायक दिवस

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आदरणीय अजितदादा यांना असं भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्याचा दिवस येईल, असं वाटलं नव्हतं. अतिशय धक्कादायक दिवस आजचा अजित प्रेमीसाठी समर्पित.

**- जुबेर बागवान,**
**कार्याध्यक्ष सोलापूर शहर राष्ट्रवादी**

## शब्दाला जागणारा स्पष्ट वक्ता

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे अभ्यासू, सर्वसामान्यांच्या प्रश्नांची जाण असणारे अतिशय स्पष्टवक्ते होते. कामानिमित्त त्यांना अनेकदा भेटण्याचा योग आला. लोकांची कामे करीत असताना त्यांनी कधीही पक्षाचा विचार केला नाही. अश्या एका दिलदार व्यक्तीमत्वाला आज महाराष्ट्र मुकला आहे. पवार कुटुंबासह महाराष्ट्र राज्यातील जनतेला या दुःखातून सावरण्याची ईश्वर बळ देवो.

**-माजी आमदार राम सातपुते**

## लाडक्या बहिणी पोरक्या झाल्या

महाराष्ट्राला काय ग्रहण आहे माहित नाही. यापूर्वी महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री गोपीनाथ मुंडे यांचे अपघाती निधन झाले होते. आता उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाची बातमी ऐकून धक्का बसला. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे पक्षविरहित नेतृत्व होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गळ्यात गळा घालून चांगल्या पध्दतीने त्यांनी राज्यकारभार पाहिला. लाडकी बहीण योजनेचे श्रेय अजितददांना जाते. अजित दादाच्या निधनामुळे आज लाडक्या बहिणी पोरक्या झाल्या आहेत. त्यांच्या अकाली निधनाने राजकीय, सामाजिक, आर्थिक, विविध क्षेत्रात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.

**-जगदीश पाटील, माजी नगरसेवक**

## विश्वासाचं प्रतीक होते

राजकारणात मोकळेपणाने, ढाकळ्या शब्दांत आणि ठाम भूमिकेत बोलणाऱ्या नेतृत्वाचं असं अचानक जाणं मनाला चटका लावणारं आहे. प्रशासनावर असलेली मजबूत पकड, निर्णयक्षम नेतृत्व आणि मिश्किल पण स्पष्ट स्वभावामुळे अजितदादा केवळ नेते नव्हते, तर अनेकांसाठी विश्वासाचं प्रतीक होते. त्यांच्या उपस्थितीने राजकारणात वेगळीच ऊर्जा जाणवायची. आज ती ऊर्जा हरपल्याची जाणीव होतेय.

**- नागेश घाडगे, प्रहार विद्यार्थी शहराध्यक्ष**


अजितदादांसमवेत माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील.




उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याशी चर्चा करताना खा. धैर्यशिल मोहिते-पाटील.


अजितदादांकडून शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार स्विकाराताना जलतरणपटू ऋतिका श्रीराम.


पद्मशाली संस्थेचे अध्यक्ष सुरेश फलमारी, सरचिटणीस संतोष सोमा, नागबाबू कुडक्याल, राजेंद्र गाजूल.

## कर्तबगार नेता हरपला

महाराष्ट्रातील सर्वसामान्य जनतेची नाळ माहित असलेला नेता म्हणजे अजितदादा होय. अतिशय दृष्टा, स्पष्टपणे आपली मते मांडणारा, धाडसी व कर्तबगार नेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जायचे. माझे व त्यांचे वैयक्तिक चांगले संबंध होते. महाराष्ट्राच्या राजकारणातील एक कर्तबगार नेता हरपला आहे. ही पोकळी कधीच भरुन येणार नाही.

**- ॲड.आर.जी. रुपनवर, माजी आमदार**

## दिलदार व्यक्तीमत्व

अजितदादा पवार महाराष्ट्र राज्याचे दिलदार व्यक्तीमत्व होते. माझा नेता, माझा गुरु, माझं सर्वस्व हरपल, मी पोरका झालो.

**- रुपेशकुमार भोसले, शहरअध्यक्ष, व्हीजेएनटी सेल**

## लोकनेता हरपला

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे निधन मनाला वेदना देणारी आहे. परखड विचार, स्पष्टवक्तेपणा आणि निर्भीडपणे रोखठोक मत मांडण्याची त्यांची शैली सर्वश्रुत होती. तळागाळातील सामान्य माणसाशी त्यांची नाळ घट्ट जोडलेली होती. धाराशिव जिल्ह्यावर अजितदादांचे विशेष लक्ष आणि प्रेम होते. धाराशिव जिल्ह्यासह संपूर्ण राज्याने एक दूरदृष्टी असलेला लोकनेता गमावला.

**- डॉ.प्रतापसिंह पाटील, कळंब, जि. धाराशिव**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सोलापुरातून श्रध्दांजली...

## राज्याचे कर्तत्ववान नेतृत्व हरपले

सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास महाराष्ट्राचा 'दादा' गेल्याची वार्ता ऐकताच अवघा महाराष्ट्र सुन्न झाला. प्रत्येकाला आपल्या घरचा माणूस गेल्याचेच जणू दुःख झाले. कारण अजितदादा हे कोणत्याही पक्षाचा माणूस कामासाठी त्यांच्याकडे गेला तरी त्यांचे काम करीत होते; प्रत्येकजण आपले काम दादांकडूनच होईल, या आशेने त्यांच्याकडे पाहायचे. त्यांचा स्पष्टवक्तेपणा सर्वांना आवडायचा. दादांना एखादे विकासाचे काम सांगितले की, सकाळी ६ वाजता ते बोलवायचे; आपल्याला वेळ लागला तरी सकाळी ६ वाजता त्यांच्या पीएंचा फोन यायचा. एकंदरीत, अजितदादांच्या जाण्याने महाराष्ट्राचे फार मोठे नुकसान झाले असून, एक कर्तत्ववान नेता हरपला आहे.

**- आ.विजयकुमार देशमुख, शहर उत्तर विधानसभा मतदार संघ**

## एक अनुभवी आणि प्रभावी नेता गमावला

अजित पवार हे दिलदार आणि सर्वसामान्यांशी आपुलकीने वागणारे व्यक्तिमत्त्व होते. एक धाडसी, स्पष्टवक्ते आणि कुशल प्रशासक म्हणून त्यांची संपूर्ण महाराष्ट्रात ओळख होती. राजकारणात त्यांनी नेहमीच ठाम भूमिका घेतली आणि निर्णयक्षम नेतृत्वाचे दर्शन घडवले. विकासकामे, प्रशासनावर पकड आणि जनतेच्या प्रश्नांबाबतची त्यांची तळमळ नेहमीच उल्लेखनीय राहिली. अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राने एक अनुभवी आणि प्रभावी नेता गमावला आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरून न निघणारी आहे. त्यांच्या कुटुंबीयांना हे अपार दुःख सहन करण्याची शक्ती ईश्वर देवो, अशी प्रार्थना करतो.

**- आमदार सुभाष देशमुख, दक्षिण सोलापूर विधानसभा मतदार संघ**

## खरा लोकसेवक हरपला

आज महाराष्ट्राचे दादा हरपले. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुर्देवी निधन झाले. ही घटना निश्चित दुखद,धक्कादायी आणि मन सुन्न करणारी अशी आहे.जनतेच्या प्रश्नासाठी पहाटे पाच वाजल्या पासून तळमळीने काम करणारे खरे लोकसेवक होते. राज्याच्या जडणघडणीत त्यांनी दिलेले योगदान महाराष्ट्र कायम स्मरणात ठेवेल. दादांचे अकाली जाणे हे त्यांच्या कुटुंबियांसाठी, संपुर्ण महाराष्ट्रासाठी आणि आम्हा सर्वांसाठी धक्कादायक आहे. प्रशासनावर जबरदस्त पकड आणि महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासाचा ध्यास असलेले धडाडीचे नेते ,अशी त्यांची ओळख होती. महाराष्ट्राच्या इतिहासात सर्वाधिक वेळा उपमुख्यमंत्रीपद भूषविण्याचा विक्रम त्यांनी नोंदविलेला होता. महाराष्ट्राच्या राजकारणात त्यांनी आपली प्रभावी कार्यपध्दतीची छाप सोडली. त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्राने एक कणखर, शिस्तबध्द, वक्तशीर आणि कार्यतत्पर नेतृत्व गमाविले आहे. ही पोकळी कधीही भरुन निघणारी नाही. त्यांचे कुटुंब तसेच संपुर्ण महाराष्ट्रातील नागरिकांना या दुखातून सावरण्याचे बळ लाभो हिच विठ्ठल,रखुमाई आणि दामाजीपंतांच्या चरणी प्रार्थना.

**- समाधान आवताडे, आमदार, पंढरपूर विधानसभा मतदारसंघ**

## मदतीसाठी सदैव तत्पर असणारा नेता

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पाटील यांचे विमान अपघातात दुर्देवी निधन झाले. एक वर्षापासून आपण दादांच्या सहवासात आहे. आमदार झाल्या पासून असा कोणताही आठवडा दादांना भेटल्या शिवाय गेलेला नाही. मागच्या आठवड्यात देखील दादांची भेट झाली. जिल्हा परिषद आणि पंचायतसमिती निवडणूकीचा प्रचार सुरु होण्यापूर्वी दादांशी भेट झाली. निवडणूकीत आपल्या पाठिशी खंबीरपणे उभा असल्याचा विश्वास दादांनी दिलेला होता. दादांच्या सोबत अनेक आठवणी आहेत. कोणत्या आठवणी सांगाव्या कळत नाही. दादाना श्रध्दांजली वाहण्यासाठी तोंडातून शब्दच फुटतच नाही. विठ्ठल सहकारी साखर कारखान्याला मदतीसाठी दादा सदैव तत्पर असत. दादांना श्रध्दांजली वाहावी लागेल अशी आयुष्यात वेळ यईल असे कधीही वाटले नाही.

**- अभिजीत पाटील, आमदार, माढा विधानसभा**

## थोरल्या भावाप्रमाणे प्रेम दिले

राज्याचे नेते तसेच आपल्या सगळ्यांचे नेते मा.अजितदादा पवार यांचे आज सकाळी विमान अपघातात बारामती येथे दुर्देवी निधन झाले. प्रचाराची सभा सुरु असताना जेव्हा ही बातमी कळाली त्यावेळी क्षणभर वाटले की ही खोटी बातमी ठरावी. पण नियतीच्या पुढे कुणाचेच काही चालत नाही म्हणतात. अजित दादांच्या जाण्याने एक राजकीय नेता तर आपल्यातून गेलाच आहे परंतु व्यक्तीशः ज्यांनी थोरल्या भावासारखे प्रेम आपणाला दिले असे एक मार्गदर्शक असे ज्येष्ठ सहकारी आपल्यातून आज गेलेले आहेत. अजित दादांच्या जाण्याने महाराष्ट्राचे, देशाचे नुकसान झालेलच आहे पण त्याच बरोबर आपल्या सगळ्यांना वाटते की, आपल्या कुटुंबातीलच एखादा व्यक्ती गेला आहे. कारण दादांचं नेतृत्व हे अतिशय कष्टातून उभे राहिलेले होते. सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणा मध्ये आम्ही जी एक तरुणाची फळी १९९० नंतर या जिल्ह्यात तयार झाली त्याच्या मध्ये अजितदादांचे खूप मोठे योगदान आहे. त्या कालखंडा मध्ये अजितदादांनी आम्हाला खूप ताकद दिली.विश्वास दिला. राजकारण कसं करावयाचे याचे अनेक धडे आमच्या जिल्ह्यात आमच्या बरोबर आमचे अजून काही तीन,चार सहकारी आहेत त्यांना दिले. जरी व्यक्तीशः आपले आणि राष्ट्रवादी काँग्रेस मधून आपण बाजूला गेल्या नंतर सुध्दा दहा, पंधरा वर्षे दादांनी खूप प्रेम दिले. विचारामध्ये अंतर पडले असले तरी प्रेमात अंतर पडू दिले नाही. अगदी कालच्या विधानसभेच्या वेळी सुध्दा आपणाला स्वतः व्यक्तीशः बोलावून सोलापूर जिल्ह्यात काय परिस्थिती होणार, तुझी भूमिका काय असणार ऐवढेच नाही तर तू काय भूमिका घ्यावी असा सल्ला देखील दादांनी मला दिल्याचे प्रशांत परिचारकांनी सांगितले. त्यामुळे अजितदादांच्या जाण्याने आपल्या सर्वांचे खूपच नुकसान झालेले आहे. महाराष्ट्रातील तरुण पिढीला एक आदर्शव्रत असं नेतृत्व दादांचे होते त्यांच्या जाण्याने ती खूप मोठी पोकळी निर्माण झालेली आहे. खरं म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवी, एकनाथराव शिंदे आणि दादा या तिघांचे एकत्र येणे म्हणजे पुढच्या पंचवीस वर्षाच्या महाराष्ट्राच्या औद्योगीकरण, राजकारण,अर्थकारण समाजकारणाचा एक मजबुत पाया तयार करण्याचे काम हे तिघेजण करीत होते. पण त्यातील एक दुवा आज निखळलाय आणि सगळ्यांनाच आज दुःख होते आहे की राजकारण मध्ये वैचारिक मतभेद असू शकतात पण त्या वैचारिक मतभेदांच्या पलिकडे जाऊन माणूसपण जपणारा आपला नेता किंवा मोठा भाऊ आपल्यातून गेल्याचे दुःख आपल्या सगळ्यांना आहे. पवार कुटुंबियांवरती तर खूप मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. रुक्मिणी पांडुरंगाने हे दुःख त्यांना पेलण्याचे सामर्थ्य द्यावे अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या प्रति याठिकाणी आपण संवेदना व्यक्त करतो आणि अजितदादांना आदरांजली अर्पित करतो.

**- प्रशांत परिचारक, माजी आमदार.**

## राज्याचं स्पष्टवक्ते आणि अभ्यास असणारं नेतृत्व हरपलं

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने एक स्पष्टवक्ते आणि अभ्यासपूर्ण नेतृत्व हरपले असून महाराष्ट्राचे मोठं नुकसान झालं आहे. अजितदादा आपल्यातून निघून गेले आहेत, ही गोष्ट मन अजूनही स्वीकारायला तयार नाही. मनाला वेदना देणारी आणि मनाला चटका लावून जाणारी अतिशय दुर्दैवी घटना महाराष्ट्रात घडली आहे. हे खरंतर कोणाच्या स्वप्नातही वाटलं नसेल, अजितदादा एवढ्या लवकर आपल्यातून जातील. अजितदादा गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणाचे नेतृत्व करत होते, अतिशय परखड स्पष्टवक्तेपणा आणि प्रशासनावर असलेली त्यांची पकड असलेला नेता होता. बारीक गोष्टीचा अभ्यास करून बोलण्याची सवय होती, परखड स्पष्टपणा आणि निर्भीडपणे, रोखठोकपणे बोलणारा नेता राज्याने गमावला.

**-चेतनसिंह केदार सावंत, जिल्हाध्यक्ष, भाजपा**

## राज्याचा विकास पुरुष आमचा बाप माणूस हरपला

राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांचे सकाळी दुःख निधन झाले. बारामती येथे विमान अपघातात त्यांची प्राणज्योत मालवली. मात्र त्यांच्या जाण्याने राज्यात पोकळी निर्माण झाली आहे. राज्याचा विकास पुरुष आमचा बाप माणूस हरपला. अशा शब्दात प्रतिक्रिया व्यक्त करताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रवक्ते उमेश पाटील यांनी धाय मोकलून रडू कोसळले. दरम्यान, सकाळी पावणे नऊ वाजता ही घटना कळल्यानंतर पायाखालची जमीन सरकली. उमेश पाटील हे आपल्या कुटुंबीयांसमोर एकच शोकमग्न अवस्थेत दिसून आले. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार परखड, वक्तशीर, स्पष्टवक्ता तसेच प्रशासनावर पकड असणारे प्रमुख नेते होते. त्यांच्या अकाली निधनाने राजकीय, सामाजिक, आर्थिक, अशा विविध क्षेत्रात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. अजित



पवार यांच्या आत्म्यास शांती लाभो हीच प्रार्थना ओम शांती.

**- राष्ट्रीय काँग्रेस पार्टीचे प्रवक्ते उमेश पाटील**

## राजकीय, सामाजिक, प्रशासकीय क्षेत्रात मोठी पोकळी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाने महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. हा धक्का केवळ त्यांच्या कुटुंबीयांसाठीच नव्हे तर सर्वसामान्य जनतेसाठी आणि लोकशाही मूल्यांवर विश्वास ठेवणाऱ्या सर्व राजकीय कार्यकर्त्यांसाठी अत्यंत दुःखद आहे. आमच्यात जरी वैचारिक मतभिन्नता असली तरी जीवलग, सन्मानपूर्वक आणि लोकशाही परंपरेला साजेसे राजकीय नाते होते. श्रमिक, कष्टकरी, शेतकरी, वंचित व दुर्बल घटकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली, ही बाब महाराष्ट्राच्या राजकारणात कायम स्मरणात राहील. आडम परिवारासह मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीच्या वतीने स्व.अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

**-नरसय्या आडम मास्तर, 'माकपा'चे माजी आमदार तथा कामगार नेते**

## 'दादा' माणूस गेल्याचे अतिव दुःख

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा विमान अपघातात दुर्देवी मृत्यू झाला; ही वार्ता ऐकून धक्काच बसला. जवळपास ४ ते ५ दशके राजकारणात एक वेगळी ओळख असलेल्या अजितदादांची अचानक झालेली एक्झिट अवघ्या महाराष्ट्रासाठी वेदनादायी आहे. चाकोरीबध्द कामाने राज्यातील अबालवृध्दांत त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली होती. दादा मंत्रिपदावर कार्यरत असताना कोणत्याही बाबतीत भेदभाव न करता सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या जाण्याने राजकीय क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली. राज्याच्या प्रशासनावर कंट्रोल असलेला नेता गेल्याचे खूप दुःख झाले.

**- नेताजी खंडागळे, अध्यक्ष सह्याद्री फाऊंडेशन**

## अफाट निर्णयक्षमता, जबरदस्त पकड

स्व.यशवंतराव चव्हाण नेहमी म्हणायचे, राजकारण्यांनी नाही तर प्रशासनानी हो म्हणायला शिकलं पाहिजे. अजितदादा पवार हे याच पठडीतील होते. एखादं काम होणार असेल तर 'हो' नसेल तर 'नाही', असे स्पष्टच सांगायचे. अफाट निर्णयक्षमता व प्रशासनावर जबरदस्त पकड असलेले राजकीय व्यक्तीमत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जायचे. त्यांच्या कुठल्याही भाषणात जातीपातीचा कधीच उल्लेख नसायचा. स्व.विलासराव देशमुख, स्व.गोपीनाथ मुंडे, स्व.आर.आर. पाटील यांसारख्या नेत्यांची उणीव होती. आता अजितदादा पवार यांचे अपघाती निधन झाले. अजितदादांसारखा राजकारणी पुन्हा होणे नाही. त्यांची पोकळी कधीही भरुन न निघणारी आहे. स्व.अजितदादांना भावपूर्ण श्रध्दांजली!

**-विद्या लोलगे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या प्रदेश नेत्या.**

## २८ जानेवारी हा दिवस महाराष्ट्रासाठी काळा उगवला

बुधवार दि.२८ जानेवारी रोजी सकाळ सकाळी दादांच्या अपघाती मृत्यूची अतिशय दुःखद घटना घडली. गेल्या ३५ वर्षांमध्ये महाराष्ट्राची रात्रंदिवस कष्ट करून सेवा करणारे एक प्रभावी नेतृत्व आज हरपले. स्पष्ट वक्तेपणा होणारे काम होणार, न होणारे काम होत नाही असे स्पष्ट तोंडावर सांगणारे नेते होते. मताची बेरीज वजाबाकी न करता राज्याचे कल्याण करण्याची मनोवृत्ती, बोलण्यात कडवटपणा परंतु अंतकरणात मायाळूपणा असलेले, भविष्याचा वेध घेणारे नेतृत्व आपल्यातून निघून गेले. निश्चितपणे महाराष्ट्रासाठी फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे. राजकारणात एवढा सरळ वागणारा माणूस यापूर्वी झाला नाही आणि पुढेही होणार नाही. आमच्या कुटुंबाचे व दादांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. आमच्या सर्व भावंडांना ते त्यांच्या नावानिशी ओळखत होते. संकटकाळी त्यांनी आम्हाला मदतीचा हात दिला आहे. त्यामुळे व्यक्तिगत माझ्या कुटुंबाची देखील ही मोठी हानी आहे. अशा या दूरदृष्टी असणाऱ्या नेत्याला सांगोला तालुक्यातील जनतेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली.....!

**- ॲड.शहाजीबापू पाटील, माजी आमदार, सांगोला विधानसभा.**

## संपूर्ण देशात स्पष्ट वक्ता हरपला

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणूनच नव्हे, तर संपूर्ण देशात स्पष्ट वक्ता, पारदर्शक आणि नेटका कारभार करणारे दूरदृष्टीचे नेतृत्व म्हणून ज्यांची ओळख होती असे दादा आज आपल्यातून निघून गेले. साळुंखे पाटील कुटुंबीय आणि पवार कुटुंबीय यांचे गेल्या तीन पिढ्यांचे ऋणानुबंध होते. त्या नात्याला केवळ राजकारणाची सीमा नव्हती, तर आपुलकी, विश्वास आणि मार्गदर्शनाची घट्ट वीण होती. माझ्या राजकीय जीवनात, माझ्या यशस्वी वाटचालीत दादांचे योगदान अतिशय म ोलाचे राहिले. वेळोवेळी दिलेले मार्गदर्शन, पाठीवर टाकलेला विश्वास आणि कठीण प्रसंगी दिलेला आधार हे आयुष्यभर विसरता येणार नाही. दादांच्या जाण्याने मन अक्षरशः सुन्न झाले आहे. आज एक मार्गदर्शक, एक आधारस्तंभ हरपल्याचे मोठे दुःख मला व आमच्या संपूर्ण कुटुंबीयांना झाले आहे. ईश्वर त्यांच्या पवित्र आत्म्यास चिरशांती देवो, हीच पांडुरंगाच्या चरणी विनम्र प्रार्थना.!

**-दिपकआबा साळुंखे-पाटील, माजी आमदार, सांगोला.**

## अजित पवार स्पष्टवक्ता नेता

राज्याचे उप मुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनाने सर्वत्र शोककाळा पसरली आहे. वक्तशीर कामात चोखंदळ प्रचंड कामाची उरक स्पष्टवक्ता कोणत्याही कार्यकर्त्याला झुलवत न ठेवणारा नेता आज आमच्यातून हरपला आहे. त्यांच्या निधनाने महाराष्ट्र पोरका झाला असून सर्वत्र शोककळा पसरली आहे. खरंच आमच्यातून दादा माणूस कायमचा निघून गेला..

**- दिनेश शिंदे**

## शब्दा प्रमाणे चालणारे नेते अजितदादा पवार

राज्याचे धडाडीचे उपमुख्यमंत्री आणि शब्दा प्रमाणे चालणारे नेते अजितदादा पवार यांचे विमान अपघातामध्ये दुःखद निधन झाले. देशमुख आणि पवार कुटुंबीयांचे एक राजकारणापलीकडचे नाते आहे हे सर्व महाराष्ट्राला माहित आहे. त्यांच्या जाण्याने संपूर्ण महाराष्ट्रावरती दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्या दुःखामध्ये शेतकरी कामगार पक्ष, पुरोगामी युवक संघटना, सांगोला मतदार संघ आणि देशमुख कुटुंबीय सहभागी आहोत. आम्हा सर्वांच्या वतीने अजित दादांना भावपूर्ण श्रद्धांजली....!

**- आ.डॉ. बाबासाहेब देशमुख, सांगोला विधानसभा सदस्य**

## आपल्यातला माणूस गेला

अजित दादांच्या निधनानंतर संपूर्ण राज्यावर शोक पसरला आहे. आदरणीय पवार साहेबांच्या आणि आमच्या चार पिढींचा जुना ऋणानुबंध आजही कायम आहे. कधीही वैयक्तिक पातळीवर जाऊन नातं तोडलेलं नाही. हे नातं कायम जपलं. आजच्या घटनेनंतर बोलण्यासाठी शब्द नाहीत. आपल्यातला माणूस गेला. श्रद्धांजली अर्पण करतो.

**- रणजीतसिंह मोहिते-पाटील, आमदार**

## अतिशय ताकतीच नेतृत्व

अतिशय ताकतीच नेतृत्व म्हणून महाराष्ट्रात अजित पवार यांनी त्यांच्या कार्यकाळात काम केलेलं आहे. संपूर्ण महाराष्ट्र हळहळला आहे. महाराष्ट्रच धुरंधर नेतृत्व या महाराष्ट्राने गमावलेले आहे. अशी भावना जनतेची आहे. या घटनेने महाराष्ट्र सुन्न झालेला आहे.

**-अमोल शिंदे, जिल्हाप्रमुख शिवसेना**

## अत्यंत दुर्दैवी व दुःखद वार्ता

महाराष्ट्र राज्याचे उप मुख्यमंत्री व महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष अजितदादा पवार आपल्यातून निघून गेले. क्रीडा, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्राचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणातील व समाजकारणातील सर्व बाबतीत धडक निर्णय घेण्याची तडफ असणारा स्पष्टवक्ता नेता, सर्वसामान्यांना आपला वाटणारा व्यक्ती मा. ना. अजितदादा पवार साहेब आज आपल्यातून निघून गेले, पूर्ण समाजकारण, क्रीडाक्षेत्र व राजकारण या सर्व क्षेत्रांची अपरिमित न भरून येणारी हानी झाली आहे. अशा या उत्तुंग नेतृत्वास भावपूर्ण श्रद्धांजली

**-प्रा. डॉ. चंद्रजीत जाधव, सरचिटणीस महाराष्ट्र खो-खो असोसिएशन**

## सामान्य कार्यकर्त्याला केंद्रबिंदू मानणारे

सामान्य कार्यकर्त्याला केंद्र बिंदू मानणारे, वक्तशीर नेता, स्पष्ट वक्ता, धाडशी नेतृत्व, सोलापूरला सदैव साथ देणारे, शेतकऱ्याच्या प्रश्नाला न्याय देणारा नेता, मागास वर्गी, दलित, दुर्लक्षित, अल्पसंख्यांक प्रश्नाचा त्वरीत अंमल बजावणी करणारा नेता, आम्हाला अर्ध्यावर सोडून गेले, हे क्षण कार्यकर्त्यांना असाह्य वेदना देणारे आहे.

**-सिद्धारूढ निंबाळे**

## अजितदादांनी प्रत्येक वेळी मदतीचा हात दिला

सोलापूर : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाची बातमी समजली. मोठा धक्का बसला. विश्वास वाटला नाही. ते माझे जवळचे चांगले राजकीय मित्र होते. पक्ष नव्हता तरी अजित दादांनी मला मदत केली. मित्रत्वाचे नाते जपले. प्रत्येक वेळी मदतीचा हात दिला. ''अजित पवारांशिवाय तुम्हाला कोणीही आमदार करू शकत नाही'' असे ते एकदा मला आवर्जून म्हणाले होते अशी आठवण सांगत माजी आमदार दिलीप माने यांनी शोक भावना व्यक्त केली. अजितदादांच्या आठवणी मी कधी विसरू शकणार नाही. आमचे जिव्हाळ्याचे संबंध होते. सर्वसाम ान्यांना समजून घेणारे ते नेतृत्व होतं. ही पोकळी कुणीही भरून काढणार नाही. प्रत्येकाला चुकलं तर माफही ते करत होते. तसा नेता आता होणे नाही.

**- माजी आ. दिलीप माने**

## मन सुन्न करणारी सकाळ

आजची सकाळ मन सुन्न करणारी आहे. राजकारणात स्पष्टवक्तेपणा, मिश्किल शैली आणि प्रशासनावरची घट्ट पकड यांचा दुर्मिळ संगम असलेले अजितदादा अचानक आपल्यातून निघून जाणे अजूनही मनाला पटत नाही. ठाम भूमिका, बेधडक बोलणं आणि जनतेशी थेट नातं यामुळे ते केवळ नेते नव्हते, तर लोकांच्या मनात घर केलेले व्यक्तिमत्त्व होते. ही हानी भरून न निघणारी असून, घडलेली घटना अत्यंत वेदनादायी आहे. दादा, तुमची उणीव कायम जाणवत राहील.

**-धारीराज रमणशेट्टी**

## विरोधकांनाही आपलेसे करणारे नेतृत्व हरपले

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्र राज्यातील राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. शब्द सुचत नाहीत. अकरा वेळा अर्थमंत्री आणि पाच वेळा उपमुख्यमंत्री पद त्यांनी भूषविले होते. आता तरी कुठे महाराष्ट्र राज्य प्रगती आणि विकासाची वाटचाल करत होते. सोलापूर जिल्ह्यातही आयटी पार्क व इतर विकास कामे प्रगती पथावर होती. लाडकी बहीण योजना यशस्वी केली. ते स्वप्न अधुरे राहते की काय असे वाटते. पोटात एक आणि ओठातही एक असे विकासाभिमुख कर्तृत्ववान नेतृत्व अजित दादांचे होते. विरोधकांनाही आपलेसे करणारे नेतृत्व हरपले.

**- नगरसेवक शिवानंद पाटील**

## अत्यंत कार्यतत्पर नेता

बारामती येथे झालेल्या विमान अपघाताच्या दुर्घटनेत राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याची घटना अत्यंत वेदनादायक आहे. कायम आपल्या दिलखुलास स्वभावाने विरोधकांसह सर्वसामान्य नागरिकांची मनी जिंकणारे नेते म्हणून दादांची ओळख होती. प्रशासनावर पकड असलेला अत्यंत कार्यतत्पर नेता म्हणून अजितदादांची कार्यशैली सर्वांनाच प्रभावित करणारी होती. आज त्यांच्या निधनाने संपूर्ण राज्यभर शोककळा पसरली आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.

**- महेश साठे, सोलापूर लोकसभा शिवसेना संपर्क प्रमुख**

## मुस्लिम समाजासाठी अजित दादांनी खूप काही केलं

उपमुख्यमंत्री अजित पावरांच्या निधनानंतर सर्वच समाजाला जबरदस्त धक्का बसला आहे. सोलापूर मधील मुस्लिम समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती हाजी एमडी शेख आणि मौलानानी एकत्रित येऊन श्रद्धांजली अर्पण केली.मुस्लिम समाजासाठी अजित दादांनी मोलाचे काम केले.महाराष्ट्र राज्यातील तमाम मुस्लिम समाजाला अजित दादा नेहमी मदतीला येत होते.त्यांची जागा कोणही भरून काढणार नाही. हाजी एमडी शेख आणि मौलानानी अजित दादासाठी दुआ केली.त्यांच्या दुःखात महाराष्ट्र राज्यातील सर्व मुस्लिम समाज अजित दादांच्या कुटुंबासोबत पूर्णपणे पाठीशी आहे

**- मौलानानी**

## राज्याची मोठी हानी झाली

एक कणखर नेता, पक्षातील प्रत्येक कार्यकर्त्यांचा मान राखणारा नेता म्हणून उपमुख्यमंत्री अजितदादांची ख्याती होती. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सच्चा साथीदार, दिवसभर राज्याच्या हितासाठी झटणारा नेता गेल्याने राज्याची मोठी हानी झाली आहे. करतो, बघतो, सांगतो हे शब्द अजितदादांच्या डिक्शनरीत नव्हते; राजकारणातील वेगळे मार्ग असूनही अजितदादांनी विविध पक्षातील नेत्यांचे वैयक्तिक संबंध कधीही तुटू दिले नाहीत. या नेत्याच्या जाण्याने मोठी राजकीय पोकळी तयार झाली असून, ती कधीही भरून निघणारी नाही.

**- शशिकांत चव्हाण, जिल्हाध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, सोलापूर**

## दादांचे राज्यासाठीचे योगदान जनता कधीही विसरणार नाही

अजितदादांच्या निधनाची धक्कादायक बातमी सकाळी सव्वा नऊच्या सुमारास मला समजली. स्पष्ट वक्ते, उत्तम प्रशासक अजितदादा यांच्या निधनाने राज्याचे प्रचंड मोठे नुकसान झाले असून, राज्यातील जनता त्यांनी दिलेले योगदान कधीही विसरू शकणार नाही. सकाळीं सहा वाजता काम ाची सुरुवात करणारे, महाराष्ट्राच्या राजकारणात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केलेले अजितदादा यांची राज्यात अनेक वर्ष पोकळी जाणवत राहील.

**-शंकरराव वाघमारे, माजी जिल्हाध्यक्ष, सोलापूर**

## विचारपुष्प



देशाची शक्ती शासनात नसून जनमानसात असते. शासनाचे यश अथवा अपयश सामाजिक व्यवस्थेवर अवलंबून असते. जो समाज स्वावलंबन आणि स्वाभिमानाचे जीवन जगण्याची आकांक्षा ठेवत नाही, तो स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही स्वावलंबी बनू शकत नाही.

- **भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

# नियतीचे ‘घड्याळ’ चुकले

# दादा गेले



◆ **बारामती, २८ जानेवारी**

**अनिश्चितता ही जगात सर्वांत निश्चित बाब का मानली जाते, हे बुधवारच्या उगवतीनंतर दिसून आले. जीवन अनिश्चित असते, तर मृत्यूत निश्चितता. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा बारामती येथे विमान अपघातात मृत्यू झाला. काळ इतका क्रूर आणि अकल्पितपणे येईल, कुणालाही वाटले नाही. मात्र, अवघ्या महाराष्ट्राला चटका देताना नियतीचे ‘घड्याळ’ चुकले अन् दादा आपल्यातून गेले...**

## महत्त्वाचे

### गुंतवणूकदारांचा उत्साह दुणावला



**मुंबई** : भारतीय शेअर बाजारात सलग दुसऱ्या दिवशी गुंतवणूकदारांनी खरेदीचा उत्साह दाखवला. जागतिक बाजारातील सकारात्मक संकेत आणि देशांतर्गत गुंतवणुकीच्या जोरावर निर्देशांक ४८७ अंकांनी वाढून ८२,३४५ वर बंद झाला. त्याचप्रमाणे निफ्टी १६७ अंकांनी वाढून २५,३४३वर बंद झाला. मंगळवारी देखील बाजार तेजीसह बंद झाला होता. मात्र, बुधवारच्या वाढीने गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास अधिक उंचावला आहे. दिवसभरातील व्यवहारात संरक्षण क्षेत्रातील दिग्गज कंपनी भारत इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेडच्या शेअरने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. याउलट, एशियन पेण्ट्सच्या शेअरमध्ये सर्वाधिक घसरण नोंदविण्यात आली. मागील आठवड्यात शेअर बाजारात जागतिक अस्थिरतेमुळे सातत्याने घसरण झाली. मात्र, मंगळवारी भारत आणि युरोपियन युनियनमध्ये व्यापार करार निश्चित झाल्यानंतर बाजाराने उसळी घेतली, अन् तेजीचे सत्र परतले. ■

### १६,००० कर्मचाऱ्यांना अमेझॉन देणार नारळ

**नवी दिल्ली** : जगातील सर्वात मोठी ई-कॉमर्स कंपनी ॲमेझॉनने बुधवारी आणखी १६,००० कर्मचाऱ्यांची कपात करण्याची घोषणा केली आहे. ही गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये सुरू झालेल्या पुनर्रचना प्रक्रियेचा भाग आहे. त्यावेळी कंपनीने १४,००० पदे रद्द करण्याची घोषणा केली होती, पण आता एकूण कपातीचा आकडा वाढून ३०,००० झाला आहे. या नोकरकपातीचा उद्देश व्यवस्थापनाचे स्तर कमी करणे, जबाबदारी वाढवणे आणि कंपनीतील नोकरशाही (ब्युरोक्रेसी) संपवणे हा आहे. कंपनीला असे वाटते की तिच्या कर्मचाऱ्यांनी जलद निर्णय घ्यावेत आणि ग्राहकांसाठी नवीन शोध (इनोव्हेशन) करण्याची क्षमता वाढवावी. ■

### एअर इंडियाच्या विमानाचे आपात्कालीन लॅण्डिंग

**जयपूर** : एअर इंडियाच्या विमानाचे आपात्कालीन लॅण्डिंग जयपूर येथे सुरळीत झाले नाही. या विमानात पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री आणि राजस्थानचे काँग्रेस प्रभारी सुखजिंदर सिंग रंधावा प्रवास करत होते. दिल्लीहून जयपूरकडे जात असलेल्या एअर इंडियाच्या एआय- १७१९ विमानाने दुपारी १.05 वाजता उतरायचा प्रयत्न केला, परंतु धावपट्टीवरील अस्थिर परिस्थितीमुळे पहिल्या प्रयत्नात लॅण्डिंग अयशस्वी झाले. पायलटने धावपट्टीला स्पर्श केल्यानंतर लगेचच विमान हवेत उचलले आणि सुमारे १० मिनिटांची फेरी मारून दुसऱ्या प्रयत्नात विमान सुरक्षितपणे उतरले.

## बारामतीसह महाराष्ट्रावर शोककळा; राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर



जिल्हा परिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी मुंबई येथून जात असताना बुधवारी सकाळी ८ वाजून ४६ मिनिटांनी बारामती विमानतळाजवळ खासगी विमान कोसळून झालेल्या अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाले. त्यांच्यासह एकूण पाच जणांचा या अपघातात मृत्यू झाला. त्यांच्या अपघाती निधनाचे वृत्त कळताच महाराष्ट्र शोकसागरात बुडाला. दादा नावाने परिचित असलेले अजित पवार यांच्या निधनाने राजकीय क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि कार्यकर्त्यांना दादांच्या निधनाचे दुःख पचविणे कठीण झाले असून ते शोकमग्न झाले आहेत. गुरूवारी त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

अजित पवार यांच्या निधनामुळे केवळ भाजपाप्रणीत महायुती सरकारमध्येच नव्हे, तर त्यांनी नेतृत्व केलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीतही पोकळी निर्माण झाली. विमान अपघात हा केवळ एक अपघात होता आणि त्याचे राजकारण केले जाऊ नये, असे त्यांचे काका आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी सांगितले.



अपघातानंतर विमानाचा केवळ असा सांगाडा उरला

विमानातील ‘ब्लॅक बॉक्स’सापडल्यानंतर अपघाताचे कारण निश्चित करण्यासाठी त्याचे विश्लेषण केले जाईल, असे एका अधिकाऱ्याने सांगितले. ५ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकांसाठी पुणे जिल्ह्यात दिवसभरात चार सभांना संबोधित करण्यासाठी अजित पवार सकाळी मुंबई येथून रवाना झाले होते.

या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या इतरांमध्ये १५ हजार तासांच्या उड्डाणाचा अनुभव असलेले कॅप्टन सुमित कपूर, १५०० तासांच्या उड्डाणाचा अनुभव असलेल्या सह-वैमानिक शांभवी पाठक, वैयक्तिक सुरक्षा अधिकारी विदीप जाधव आणि एअर होस्टेस पिंकी माळी यांचा समावेश होता.

व्हीएसआर व्हेंचर्स प्रा. लि.द्वारे चालवले जाणारे १६ वर्षे जुने चार्टर्ड विमान, बारामती विमानतळावर दुसऱ्यांदा उतरण्याचा प्रयत्न करीत असताना कोसळले. (वृत्तसंस्था)

### अपघाताचा घटनाक्रम

- २८ जानेवारीला विमानाने सकाळी मुंबई येथून ८.१० ला उड्डान घेतले
- व्हीआय-एसएसके विमान प्रथम ०८.१८ वाजता बारामतीशी संपर्कात आले
- ८.४३ मिनिटांनी एअर ट्रॅफिक कंट्रोलरने धावपट्टी क्रमांक ११ वर उतरण्यास परवानगी दिली
- ८.४४ ला वैमानिकाने धावपट्टी दिसत नसल्याचे सांगितले
- त्यानंतर एटीसीने त्यांना घिरट्या मारण्यास सांगितले
- गो-अराऊंडनंतर विमानाला स्थितीबद्दल विचारण्यात आले आणि कर्मचाऱ्यांनी धावपट्टी ११ च्या अंतिम अप्रोचवर असल्याची माहिती दिली.
- विमानाला सकाळी ०८.४३ वाजता धावपट्टी ११ वर उतरण्याची परवानगी देण्यात आली. मात्र, त्यांनी लॅण्डिंग परवानगीची पुष्टी केली नाही.
- घिरट्या मारत असताना ८.४४ वाजता विमान अनियंत्रित होऊन कोसळले. विमानाचा मलबा धावपट्टी ११ च्या सुरुवातीच्या भागाच्या समोर, धावपट्टीच्या डाव्या बाजूला आढळला. ■

### खराब दृश्यमानतेमुळे विमान कोसळले : नायडू

◆ **पुणे, २८ जानेवारी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांना घेऊन जाणारे विमान कोसळले, त्यावेळी बारामती विमानतळावर दृश्यमानता खराब होती, अशी प्राथमिक माहिती असल्याचे नागरी उड्डयन मंत्री के. राम मोहन नायडू यांनी बुधवारी सांगितले. नागरी उड्डयन महासंचालनालय (डीजीसीए) आणि विमान अपघात तपास ब्युरो (एएआयबी) येथील पथके अपघाताची चौकशी करण्यासाठी दाखल झाली आहेत. विमान उतरवण्याचा प्रयत्न करीत असताना दृश्यमानता कमी होती, असे नायडू म्हणाले. ■

### स्फोटामुळे हतबल झाले

विमान चालकाने विमान धावपट्टीवर उतरण्याचा प्रयत्न केला पण त्यात यश न आल्याने पुन्हा विमान हवेत जात असताना अचानक खाली आले आणि धावपट्टीजवळ असलेल्या भागात कोसळले. विमान कोसळताच मोठास्फोट झाला. दरम्यान विमानतळावर उपस्थित दादांच्या कर्मचारी अधिकारी आणि कार्यकर्त्यांनी दुर्घटनेच्या ठिकाणी धाव घेतली. मात्र स्फोट मोठा असल्याने सर्वच हतबल झाले होते. दुर्घटनेच्या शेजारी असलेल्या गावाकऱ्यांनी अग्निशमनचे वाहन येत पर्यंत बादलीने पाणी टाकून आग विझवण्याचा प्रयत्न केला. परंतु या दरम्यान जागीच संपूर्ण विमान जाळून खाक झाले होते. अग्निशमन कर्मचाऱ्यांना मृतदेहांत दोन्ही हात अर्धवट जळालेले आढळले. त्या हातावर दादांची घड्याळ दिसताच दादांच्या मृतदेहांची ओळख पटल्याचे प्रत्यक्षदर्शनी सांगितले. ■

## आईला कळू नये म्हणून केबल तोडली

**● लेकाला भेटायला चालतच निघाल्या ● फार्महाऊसवरील मनाला चटका लावणारा प्रसंग**

◆ **बारामती, २८ जानेवारी**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे मुंबईहून बारामतीकडे येत असताना विमानतळाजवळ झालेल्या भीषण अपघातात दुःखद निधन झाले असून, या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला आहे. त्यातच आता अजित पवारांच्या फार्म हाऊसवरून मनाला चटका लावणारी माहिती समोर आली आहे. लेकाच्या निधनाची बातमी कळू नये म्हणून दादांच्या फार्म हाऊसवरील व्यवस्थापक संपत धायगुडे यांनी केबल वायर तोडून टाकली.

सकाळी सात वाजता नेहमीप्रमाणे अजितदादांच्या आई फार्म हाऊसवरती टीव्ही पाहत होत्या. त्यांना नाश्ता देण्याची तयारी करत होतो. त्यानंतर सकाळी साडेआठ वाजता अजितदादांच्या विमान अपघाताची बातमी



टीव्हीवर येत होती. आईंनी लगेच आम्हाला विचारले अरे दादांचा अपघात झालाय का? पण आईलाही वाटले त्यांना खरचटले असेल काही झाले नसेल.पुढे संपत धायगुडे सांगतात की, बारामतीत हॉस्पिटलमध्ये दादांना आणल्याची टीव्हीवरून बातमी आली. त्यावेळी आम्ही लगेच आईला पुढच्या बातम्या कळू नयेत, यासाठी बंगल्यावरील टीव्हीची केबल तोडली आणि टीव्ही बंद पडल्याचे सांगितले. त्यांचा मोबाईलही फ्लाईट मोडवर टाकून दिला. काही झाले नसल्याचे आम्ही त्यांना सांगत होतो. पण दादांना भेटून येऊ चला, असे म्हणून त्या निघाल्या होत्या. ड्रायव्हरने गाडी बंद पडल्याचेही सांगितले. पण त्यांनी ऐकले नाही. नाईलाजाने त्यांना आम्ही बारामती येथील बंगल्यावर घेऊन गेलो, अशी माहिती संपत धायगुडे यांनी दिली.

**विद्या प्रतिष्ठान येथील मैदानात होणार अंतिम संस्कार**

पक्षीय, शासकीय आणि कौटुंबिक कर्तव्यसह सामाजिक जबाबदारी म्हणून विद्या प्रतिष्ठान नावे शिक्षण कार्य उभे केले. या संस्थेत अजितदादा यांचे बारकाई ने लक्ष देत. त्याच विद्या प्रतिष्ठान येथील मैदानावर शासकीय इतमात अंत्यविधी केला जाणार आहे. (वृत्तसंस्था)

## वायुदलाने घेतला विमानतळाचा ताबा

### तातडीने इमर्जन्सी एटीसी कार्यान्वित

◆ **पुणे, २८ जानेवारी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर उद्या बारामतीत होणाऱ्या अंत्यसंस्कारासाठी देशभरातील अतिमहत्त्वाच्या व्यक्ती येणार आहेत. ही गंभीर परिस्थिती आणि हवाई सुरक्षेची गरज ओळखून महाराष्ट्र सरकारच्या तातडीच्या विनंतीनंतर भारतीय वायुसेनेने बारामती विमानतळाचा ताबा घेतला आहे.

पुण्यातील लोहेगाव वायुसेना तळावरून हवाई वाहतूक नियंत्रण तज्ज्ञांचे एक विशेष पथक तातडीने बारामतीकडे रवाना झाले आहे. या पथकाने आपल्यासोबत अत्यावश्यक तांत्रिक उपकरणे आणि संवाद यंत्रणा



संग्रहित

आणली असून, बारामती विमानतळावर इमर्जन्सी एअर ट्रॅफिक कंट्रोल सेवा सुरू केली आहे.

बारामतीमध्ये कायमस्वरूपी रडार किंवा आधुनिक एटीसी नसल्याने, वायुसेनेने आपली फिरती यंत्रणा बसवून विमानांच्या येण्या-जाण्यावर नियंत्रण स्थापित केले आहे. विमान आणि जमिनीवरील नियंत्रण कक्ष यांच्यात थेट संपर्क प्रस्थापित करण्यासाठी विशेष वारंवारतेची उपकरणे कार्यान्वित केली आहेत. उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि इतर अनेक मुख्यमंत्री विमानाने किंवा हेलिकॉप्टरने बारामतीत येणार आहेत. त्यांच्या सुरक्षित लँडिंगची जबाबदारी आता पूर्णपणे वायुसेनेकडे असणार आहे.

वायुसेनेचे हे पथक स्थानिक प्रशासन आणि नागरी हवाई उड्डाण विभागाच्या समन्वयाने काम करत आहे. बारामती विमानतळाचा परिसर आता एका लष्करी तळाप्रमाणे सुरक्षित करण्यात आला असून, प्रत्येक हालचालीवर वायुसेनेचे बारीक लक्ष आहे. (वृत्तसंस्था)

## धर्म बदलून आरक्षण मिळणार नाही

### सर्वोच्च न्यायालयाचा निर्देश

◆ **नवी दिल्ली, २८ जानेवारी**

धर्मांतर करून अल्पसंख्यक आरक्षणाचा लाभ घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या उमेदवारांना सर्वोच्च न्यायालयाने फटकारले आहे. अशा प्रकारच्या मागणीला न्यायालयाने थेट फेटाळून लावत, याला फसवणुकीचा नवा प्रकार असे कठोर शब्दांत संबोधले आहे.

वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये अल्पसंख्यक कोट्यातून प्रवेश मिळावा, यासाठी बौद्ध असल्याचा दावा करणाऱ्या दोन उमेदवारांच्या याचिकांवर सुनावणी करताना सर्वोच्च न्यायालयाने ही स्पष्ट भूमिका घेतली. हरयाणातील निखिल कुमार पुनिया आणि एकता या दोन उमेदवारांनी मेरठ येथील सुभारती मेडिकल कॉलेजमध्ये नीट-पीजी अभ्यासक्रमासाठी अल्पसंख्यक आरक्षणाअंतर्गत जागा मागितली होती. या कॉलेजमध्ये अल्पसंख्यकांसाठी आरक्षणाची तरतूद आहे.

उमेदवारांनी उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडून मिळालेली बौद्ध धर्म स्वीकारल्याची प्रमाणपत्रेही सादर केली होती. मात्र, लेखी परीक्षेपूर्वी दोघांनी स्वतःला सामान्य प्रवर्गातील उमेदवार म्हणून घोषित केले होते आणि ते हरयाणातील समृद्ध जाट समाजातून येतात. ही बाब समोर आल्यानंतर न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केली. सरन्यायाधीश सूर्य कांत यांच्या अध्यक्षतेखालील न्यायासनाने सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांच्या वकिलांना जाब विचारला. पुनिया हे आडनाव जाट समाजाशी संबंधित असताना अल्पसंख्यक दर्जा कसा काय मिळतो, असा थेट प्रश्न न्यायालयाने उपस्थित केला. वकिलांनी धर्मांतर हा घटनात्मक अधिकार असल्याचे सांगत बचाव करण्याचा प्रयत्न केला. मात्र, या युक्तिवादावर सरन्यायाधीशांनी तीव्र प्रतिक्रिया देत, हे फसवणुकीचे नवे स्वरूप आहे. तुम्ही खऱ्या अल्पसंख्यकांचे हक्क हिरावून घेत आहात, असे स्पष्ट शब्दांत सुनावले. (वृत्तसंस्था)

## आयएएस-आयपीएसच्या कॅडर वाटपाचे नियम बदलले

**नवी दिल्ली** : भारत सरकारने आयएएस आणि आयपीएस कॅडर वाटपासाठी २०१७ पासून सुरू असलेली झोन सिस्टीम व्यवस्था रद्द केली आहे. त्याऐवजी नवीन कॅडर वाटप धोरण २०२६ लागू करण्यात आले आहे.

यानुसार आता सायकल सिस्टीम द्वारे अधिकाऱ्यांच्या कॅडरचे वाटप केले जाईल. हे धोरण भारतीय प्रशासकीय सेवा (आयएएस), भारतीय पोलिस सेवा (आयपीएस) आणि भारतीय वन सेवा (आयएफएस) साठी निवडलेल्या उमेदवारांना लागू होईल. यूपीएससीने आतापर्यंत सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी एकूण २५ कॅडर तयार केले होते. यांना भौगोलिकदृष्ट्या पाच झोनमध्ये विभागले होते - उत्तर, पश्चिम, दक्षिण, मध्य आणि पूर्व. मुख्य परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर उमेदवार डीएएफ फॉर्म भरत असत, ज्यात त्यांना प्रथम झोन आणि नंतर राज्याची पसंती निवडण्याची संधी मिळत असे. एकदा ज्या राज्यात अधिकाऱ्याची नियुक्ती होते, त्याला कायमस्वरूपी त्याच राज्यात काम करावे लागते. यालाच कॅडर म्हणतात. जुन्या पद्धतीत, बहुतेक अव्वल उमेदवार एकच झोन निवडत असत, ज्यामुळे काही झोनला गुणवंत अधिकारी मिळत नव्हते. नवीन पद्धतीत रोटेशन लागू होईल

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
गुरुवार, २९ जानेवारी २०२६ | ९





# दादा
## पर्वाचा अस्त

**‘असा’ही योगायोग** ६६ वर्षे: ६ महिने: ६ दिवसांचे आयुष्य आणि ६ वेळा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री !

# अजित पवारांना घड्याळानेच दिली शेवटची ओळख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जानेवारी-**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि धडाडीचे नेते म्हणून ओळख असणारे अजित पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. बुधवारी सकाळी बारामतीत झालेल्या या भीषण दुर्घटनेत अजित पवारांसह एकूण पाच जणांचा मृत्यू झाला आहे.



या दुर्घटनेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विदीप जाधव, पिंकी माळी, कॅप्टन सुमित कपूर आणि कॅप्टन शांभवी पाठक यांचा मृत्यू झाला. सर्व मृतदेह अत्यंत जळालेल्या अवस्थेत आढळून आले. अजित पवार यांच्या मृतदेहाची ओळख त्यांच्या मनगटावरील घड्याळा मुळे पटली. राजकीय जीवनात ‘घड्याळ’ हेच चिन्ह घेऊन अजित पवारांचा संपूर्ण प्रवास झाला आणि त्याच घड्याळाने त्यांच्या आयुष्याची शेवटची ओळख पटवणे, हा नियतीचा अत्यंत क्रूर खेळ असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली आहे.

या अपघातानंतर अवघा महाराष्ट्र सुन्न झाला आहे. बारामतीपासून मुंबईपर्यंत, गावोगाव शोक व्यक्त केला जात आहे. निवडणूक प्रचारासाठी निघालेले अजित पवार परत येणार नाहीत, ही कल्पनाच कार्यकर्त्यांना आणि जनतेला पचवणं कठीण होत आहे. धडाडीचा, कडक शिस्तीचा आणि निर्णयक्षम नेता अचानक काळाच्या पडद्याआड गेला आणि महाराष्ट्राच्या राजकारणात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.

## घराघरातला ‘दादा’ आमचा...

सह्याद्रीचा कणा कोसळला, महाराष्ट्र आज रडतोय,
घराघरातला दादा आमचा, आज निरोप घेतोय...
नव्हती कुणाला कल्पना, काळ असा येईल,
वाघासारखा लोकनेता, पुन्हा कधी ना येईल...॥१॥

शब्दाचा तो पक्का होता, कामाचा धडाका,
प्रशासनाचा वाघ तो, ज्याचा बसला वचक मोठा...
पहाटेच्या कामाची ती, सवय आता सुटेल,
अजितदादांच्या शिस्तीचा, दरारा आता तुटेल...॥२॥

बारामतीची माती आज, आसवांनी भिजली,
राजकारणाची रणधुमाळी, आज पोरकी झाली...
जनतेच्या या कैवाऱ्याचे, प्राण हवेत विरले,
आठवणींचे डोंगर फक्त, आज मागे उरले...॥३॥

विमान ते नसे काळ तो, झडप घालून गेला,
महाराष्ट्राच्या भाग्याचा, एक तारा निखळला...
अजितदादा नाव तुमचे, काळजात कोरले,
तुमच्या विना हे राज्य आता, पोरके रे जाहले ॥४॥

भावपूर्ण श्रद्धांजली...
अजितदादा, तुमच्या स्मृतींना मानाचा मुजरा!

# शासकीय कार्यालयवरील राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जानेवारी-**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यभर शोककळा पसरली आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून दि.२८ जानेवारी ते दि.३० जानेवारी कालावधीत तीन दिवसांचा राजकीय दुखवटा पाळण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

या आदेशानुसार राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांवरील राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या कालावधीत कोणतेही अधिकृत मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात येऊ नयेत, असे स्पष्ट आदेश सोलापूरचे निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिले आहेत. बुधवारी २८ जानेवारी रोजी राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांना सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली होती.

सर्व संबंधित विभागांनी आदेशांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश देण्यात आलेले होते. जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी




यांनी संबंधित आदेश सर्व विभागांना कळविले असून, दुखवट्याच्या काळात शासकीय शिस्त आणि नियमांचे पालन करावे. राज्य शासनाने दिवंगत नेत्याला आदरांजली अर्पण करण्यासाठी शांतता आणि संयम राखावे, असे आवाहन करण्यात आले.



## अजित पवारांचे विमान चालवणारी पायलट शांभवी पाठक कोण?

शांभवी पाठक ही सहपायलट होती. शांभवी यांनी २०२० ते २०२२ या कालावधीत मुंबई विद्यापीठातून एरोनॉटिक्स, एव्हिएशन एरोस्पेस सायन्स अँड टेक्नॉलॉजी’ या विषयात बीएससी पदवी संपादन केली असून, त्यापूर्वी २०१८-१९ या काळात त्यांनी न्यूझीलंड इंटरनॅशनल कमर्शियल पायलट अकॅडमीतून विमानचालनाचे विशेष प्रशिक्षण पूर्ण केले होते. आपल्या याच शैक्षणिक कौशल्याच्या जोरावर त्या २०२२ पासून 'VSR Ventures' प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत 'फर्स्ट ऑफिसर' (वैमानिक) म्हणून कार्यरत राहून आपली व्यावसायिक सेवा देत होत्या. शांभवी यांनी आपले शिक्षण मुंबईतून पूर्ण केले असून त्यांचे वडील सैन्य दलात अधिकारी म्हणून कार्यरत होते. व्यावसायिक स्तरावर शांभवी यांनी फेब्रुवारी २०२२ मध्ये 'ए-३२०' (अ-३२०) विमानाचे जेट ओरिएंटेशन प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण केले होते, तर मार्च २०२२ मध्ये त्यांना स्पाईसजेटकडून 'एव्हिएशन सेक्युरिटी'चा परवानाही प्राप्त झाला होता. या तांत्रिक कौशल्यांच्या जोरावर त्या 'व्हीएसआर व्हेंचर्स' या कंपनीशी जोडल्या गेल्या होत्या, ज्याची अधिकृत माहिती त्यांनी स्वतःच्या लिंक्डइन प्रोफाइलवर नमूद केली आहे.

# ‘त्या’ कार्यकर्त्याने स्वतःच्या मुलाचे नाव ठेवले ‘अजितदादा’

## अजितदादा पवारांशी होता थेट संपर्क

**तभा वृत्तसेवा । श्रीनिवास गाजूल**
**सोलापूर, दि.२८ जानेवारी-**

अजितदादा पवार म्हणजे जणू ‘जीव की प्राण’ असे मानणाऱ्या सोलापूर शहरातील एका अजितदादाप्रेमीने स्वतःच्या मुलाच्या नामकरण समारंभात ‘अजितदादा’ असे नाव ठेवले. अजितदादा पवार यांच्यावरील प्रेमाखातर दिवस-रात्र, ऊन-वारा याची पर्वा न पाहता पक्षसंघटनेच्या कामासाठी ‘तो’ कार्यकर्ता स्वतःला अक्षरशः झोकून द्यायचा.

अजितदादांचेही ‘त्या’ कार्यकर्त्यावर विशेष प्रेम. ‘त्या’ कार्यकर्त्याचा अजितदादांशी थेट संपर्क होता. त्यामुळे पक्षसंघटनेतील पदाधिकारी, कार्यकर्ते ‘त्या’ कार्यकर्त्याला वचकून असायचे. अजितदादांनी ‘त्या’ कार्यकर्त्याला सोलापूर महानगरपालिकेच्या परिवहन समितीच्या सभापतीपदावर संधी दिली होती. ‘त्या’ कार्यकर्त्याचे नाव आहे; मल्लेश बडगू.


उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाची वार्ता कानी पडताच मल्लेश बडगू धाय मोकलून रडत होता. स्व.अजितदादा पवार यांच्याविषयीच्या आठवणींना उजाळा देताना मल्लेश बडगू यांनी सांगितले की, अजितदादा सोलापुरात मुक्कामी असताना पहाटे ५.१५ वाजता त्यांच्या रुमवर जावून मी सर्व वृत्तपत्रे द्यायचो. औषधांची गोळी घेण्यापुर्वी ते अंडा-आम्लेट खायचे. त्यांना पाणी गरम करुन द्यायचो. सन २००७ साली सोलापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या वेळी मुंबई येथील प्रदेश कार्यालयात निवड समितीच्या बैठकीत माझी उमेदवारी फायनल केली व निवडणूक खर्च पण देतो म्हणाले. सन २००९ साली आदरणीय खासदार श्री शरदचंद्रजी पवारसाहेब माढा लोकसभा मतदार संघातून खासदार झाल्यावर सोलापूर शहरातील संपर्क कार्यालयात मला शिपाई म्हणून काम करण्याची संधी दिली गेली. सन २०१२ साली मला मनपा निवडणुकीची उमेदवारी न देता मला परिवहन सभापती केले. मी परिवहन सभापती असताना दि ३१ मार्च २०१२ रोजी पोलिस प्रवास अनुदानपोटी ३९ लाख रुपये परिवहन विभागाला देण्यासाठी फोन करुन विनंती केली असता त्यांनी त्याचदिवशी परिवहन विभागाला पैसे दिले होते.





दि. २२ जुलै २०१२ रोजी अजितदादांचा वाढदिवसाच्या दिवशी मला मुलगा झाला. त्याचे नाव अजितदादा असेच ठेवले आहे. सध्या माझा मुलगा इयत्ता ८ वी मध्ये शिक्षण घेत आहे. सोलापुरातील रद्द झालेले एशियाटिक टेक्स्टाईल पार्क चालू करण्यासाठी आजपर्यंत मदत केलेली आहे. सोलापूरातील बंद पडलेले औद्योगिक बँक पुन्हा चालू करण्यासाठी तत्कालीन सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांना बैठक घेवून निर्णय घेणेबाबत सूचना केली होती. दि.१३ डिसेंबर २०२१ रोजी आदरणीस खासदार श्री शरदचंद्रजी पवारसाहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ‘आदरणीयसाहेब व सोलापूरचे ऋणानुबंध’ याविषयी मी एक व्हिडीओ तयार केला होता, सदर व्हिडीओचे उद्घाटन आदरणीय अजितदादा यांचे हस्ते मुंबई येथील प्रदेश कार्यालयात करण्यात आले होते.

## ‘ती’ भविष्यवाणी ठरली खरी




सोलापूर : एका दिवाळी अंकात महाराष्ट्राच्या कुंडलीचा अभ्यास मांडला होता. त्यामध्ये जानेवारी ते मार्च-२०२६ या मथळ्याखाली मांडण्यात आलेल्या भविष्यवाणीत मोठ्या रजकीय नेत्यांचा अपघाती मृत्यू असे भाकित वर्तवले होते. आजच्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अरपघाती निधनाबाबत हा दिवाळी अंकातील भविष्याच्या भाकिताचा फोटो सोशल मिडीयावर सर्वत्र व्हायरल होत आहे.



सोलापूर : पवार कुटुंबाचे सोलापूरशी जणू ऋणानुबंधाच्या गाठी. स्व. अजितदादा पवार यांच्याशी हितगुज करताना माजी महापौर जनार्दन कारमपुरी.

# इंद्रभुवनशी नातं; उपमुख्यमंत्री अजित पवार यांची गोड आठवण

## सूक्ष्म निरीक्षण, वारशाविषयी जिव्हाळा... महापालिकेत आठवणींना उजाळा

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. २८ जानेवारी -**

आज सकाळी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनाच्या दुःखद वृत्ताने संपूर्ण राज्य हादरले आहे. कर्तव्यदक्ष, स्पष्टवक्ते आणि विकासाभिमुख नेतृत्व हरपल्याची भावना सर्वत्र व्यक्त होत असताना, सोलापूर महानगरपालिकेच्या आवारातील ऐतिहासिक इंद्रभुवन इमारतीशी जोडलेल्या त्यांच्या आठवणी आज हृदयाला चटका लावणाऱ्या ठरत आहेत.

शनिवार, दि.३ फेब्रुवारी २०२४ दुपारची वेळ. सोलापूर महापालिका आवारात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची नेहमीप्रमाणेच ठाम आणि आत्मविश्वासपूर्ण एन्ट्री झाली होती. तत्कालीन महापालिका आयुक्त शीतल तेलीउगले यांनी त्यांचे स्वागत केले होते. इंद्रभुवन इमारतीतील मीटिंग हॉलमध्ये झालेल्या बैठकीत अजितदादांनी विविध विकासकामांचा आढावा घेतला. स्क्रीनवर सुरू असलेली सादरीकरणे बारकाईने पाहत, प्रत्येक मुद्द्यावर त्यांनी प्रश्न विचारले, सूचना केल्या. यानंतर त्यांनी सोलापूरच्या ऐतिहासिक वारशाची साक्ष देणाऱ्या इंद्रभुवन इमारतीची चारही बाजूंनी प्रत्यक्ष पाहणी केली. स्मार्ट सिटी योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या नूतनीकरणाकडे त्यांनी अत्यंत सूक्ष्म नजरेने लक्ष दिले. कुठेही मूळ वास्तुशैलीला धक्का बसू नये, याबाबत त्यांनी विशेष आग्रह धरला. काही लहानसहान त्रुटी निदर्शनास आणून देत, त्या दुरुस्त करण्याच्या स्पष्ट सूचना त्यांनी महापालिका आयुक्तांना दिल्या.

'' इंद्रभूवन ही केवळ इमारत नाही, हा सोलापूरचा इतिहास आहे'' अशा शब्दांत त्यांनी इंद्रभुवनच्या वारशाविषयीचा आपुलकीचा भाव व्यक्त केला होता. नूतनीकरणाचे काम अत्यंत उत्कृष्ट दर्जाचे झाल्याबद्दल समाधान व्यक्त करत त्यांनी महापालिकेच्या कामाचे मनापासून कौतुक केले होते.

त्यावेळी आयुक्त शीतल तेलीउगले यांनी उपमुख्यमंत्री यांना इंद्रभुवन इमारतीच्या नूतनीकरणाची सविस्तर माहिती दिली होती. बृहन्मुंबई महानगरपालिकेनंतर ऐतिहासिक वारसा लाभलेली सोलापूर महापालिका ही राज्यातील एकमेव महानगरपालिका असल्याचे त्यांनी सांगितले होते. मूळ सौंदर्य अबाधित ठेवूनच हे नूतनीकरण करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. या पाहणीवेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, तत्कालीन अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे, उपायुक्त आशिष लोकरे, तत्कालीन उपायुक्त मच्छिंद्र घोलप, सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले, माजी आमदार दीपक साळुंखेपाटील, माजी गटनेते किसन जाधव, नगर अभियंता सारिका आकूलवार, उपअभियंता युसुफ मुजावर यांच्यासह अनेक अधिकारी उपस्थित होते.



### ''मूळ सौंदर्य जपा'' सांगणारा तो आवाज कायमचा शांत झाला...

आज, त्याच इंद्रभुवनच्या दगडी भिंती, कमानी आणि ऐतिहासिक वास्तूत अजितदादा पवार यांच्या त्या भेटीच्या आठवणींना उजाळा मिळतो आहे. विकासाबरोबरच वारशाची जपणूक करणारा संवेदनशील नेता आज काळाच्या पडद्याआड गेला आहे, ही जाणीव सोलापूरकरांच्या मनात शोकभावना दाटून आणत आहेत. इंद्रभुवन आजही उभे आहे पण त्याकडे कलात्मक दृष्टीने पाहणारी ती नजर, सूक्ष्म निरीक्षण करणारा तो अनुभव, आणि ''मूळ सौंदर्य जपा'' सांगणारा तो आवाज आज कायमचा शांत झाला आहे अशा भावना व्यक्त होत आहेत.

### अजितदादांकडे विकास अन् कलात्मक दूरदृष्टी होती : उपायुक्त लोकरे

इंद्रभुवन वास्तूच्या पाहणी वेळीच्या आठवणी सांगताना महापालिका उपायुक्त आशिष लोकरे म्हणाले, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी सोलापूर महापालिका आवारातील इंद्रभुवन या वास्तूची सूक्ष्म पाहणी केली होती. पूर्ण निरीक्षण केले होते. उत्कृष्ट वास्तू कशी असावी ? यांची अभ्यासपूर्ण माहिती अजितदादांना होती. त्याच माध्यमातून त्यांनी इंद्रभुवन वास्तू नूतनीकरणातील काही त्रुटीही सुचित केल्या होत्या. विविध विकास कामांचा आढावा घेत असतानाच त्यावेळी त्यांनी निधीची गरज असेल तर कधीही सांगा, मी मागे पडणार नाही. सोलापूर शहरातील विकास कामे मार्गी लागली पाहिजेत. उजनी - सोलापूर समांतर जलवाहिनीचे काम पूर्ण करा. सोलापूर शहराला पाणीपुरवठा सुरळीत ठेवावा. अशा स्पष्ट सूचनाही अजितदादांनी त्यावेळी दिल्या होत्या, अशी भावनिक आठवणही उपायुक्त आशिष लोकरे यांनी सांगितली.



भांडे गल्लीत कडकडीत बंद ठेवण्यात आला होता.



चौका-चौकात श्रद्धांजली वाहण्यात आली. टिळक चौकात टिपलेले छायाचित्र.



शासकीय कार्यालयात सुट्टी जाहीर केल्यानंतर कार्यालयात शुकशुकाट पसरला



शहरातील सर्व शाळांना सुट्टी देण्यात आल्यामुळे विद्यार्थी घरी परतताना. छायाचित्रे : केवल तिवारी



### श्री मार्कंडेय मंदिराला भेट

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सोलापूर दौऱ्याप्रसंगी पद्मशाली समाजाचे कुलदैवत श्रीमार्कंडेय मंदिराला भेट दिली होती. त्यावेळी अजितदादा पवार यांच्याशी संवाद साधताना माजी नगरसेवक प्रा.श्रीनिवास कोंडी.




# सोलापूर महापालिकेतील राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर

## मनपा प्रशासनाकडून सुटी जाहीर

**सोलापूर, दि. २८ जानेवारी-**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्याने सोलापूर महापालिकेला आज बुधवार दि. २८ जानेवारी रोजी सुट्टी जाहीर करण्यात आली. तीन दिवसांचा दुखवटा पाळण्यात येणार आहे, तसे कार्यालयीन परिपत्रक महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी काढले आहे. दरम्यान, महापालिकेतील राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकविण्यात आला होता.

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे दि. २८ जानेवारी २०२६ रोजी विमान अपघातात निधन झाले आहे. उक्त संदर्भीय संदेशानुसार महाराष्ट्र राज्यात दि. २८ ते ३० जानेवारी २०२६ या तीन दिवसांचा दुखवटा पाळण्यात येणार असल्याने सर्व राज्य शासकीय कार्यालयातील राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर करण्याच्या व दि. २८ जानेवारी २०२६ रोजी सर्व राज्य शासकीय कार्यालयांना सुट्टी जाहीर करण्याच्या सूचना प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त सुचनेनुसार दि. २८ जानेवारी २०२६ ते ३० जानेवारी २०२६ या कालावधीत सोलापूर महानगरपालिकेतील राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकविण्यात यावे. या कालावधीत कोणतेही अधिकृत मनोरंजनाचे कार्यक्रम घेण्यात येऊ नयेत. तसेच दि. २८ जानेवारी २०२६ रोजी सर्व विभाग/कार्यालयांना सुट्टी जाहीर करण्यात येत आहे, असे महापालिका उपायुक्त आशिष लोकरे यांनी कार्यालयीन परिपत्रकात म्हटले आहे.

# उपमुख्यमंत्री पवार यांच्या निधनामुळे जिल्हा परिषद, पंचायत समितीचा प्रचार थांबला

## नेत्यांच्या सभांसह आजचेही नियोजित कार्यक्रम रद्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जानेवारी-**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं विमान अपघातात निधन झाल्याची दुःखद बातमी पसरल्याने सर्वत्र दुखवटा व्यक्त केला जातोय. राज्यात सर्वत्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या रणधुमाळीत ही अपघाती घटना घडल्यानं राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस पक्ष, शिवसेना पक्षासह महायुतीतील सर्वपक्षीय नेत्यांनी अनेक नियोजित कार्यक्रम रद्द केले आहेत.


अजितदादांचे अपघाती निधन झाल्याची दुःखद घटना समजल्यानं राज्यातील सर्वच ठिकाणी पदयात्रा, कॉर्नर सभा, नागरिकांच्या भेटीगाठीचे कार्यक्रम रद्द करण्यात आले आहेत. शहर जिल्ह्यातील काही ठिकाणी शोकसभांचे आयोजन करण्यात आले होते.

अजितदादांच्या निधनाने राज्याच्या प्रशासनावर पकड असलेले एक धाडसी, अभ्यासू अन् कणखर नेतृत्व हरवल्याची भावना व्यक्त करून, ही राजकीय पोकळी कधीही भरून निघणार नाही, अशा शब्दात अनेक नेत्यांनी आपल्या संवेदना व्यक्त झाल्या.

जिल्हा परिषद निवडणुकीसाठी शिवसेना प्रचारार्थ दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग येथे बुधवारी सायंकाळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या दुःखद घटनेमुळे शिवसेना आणि मित्रपक्षाचे या भागातील सर्व नियोजीत कार्यक्रम रद्द करण्यात आल्याचेही बोरामणी गटाचे उमेदवार धनेश अचलारे यांनी सांगितले.

### सोलापुरातही काही ठिकाणी बंद

उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याने सोलापूर शहरातील सर्व शाळांना सकाळी ११ नंतर सुट्टी देण्यात आली. सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट कार्यालयात दिवसभर शुकशुकाट दिसून आला. येथील अनेक कार्यकर्ते-पदाधिकारी बारामतीकडे रवाना झाले. सोलापूर महानगरपालिकेतील राष्ट्रीय ध्वज उतरवण्यात आला. सुट्टी जाहीर झाल्याने शासकीय कार्यालयात शुकशुकाट दिसून आला. दरम्यान, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे चौका-चौकात श्रद्धांजली वाहण्यात आली तर टिळक चौक, भांडे गल्लीत कडकडीत बंद ठेवण्यात आला. यासह शहरातील इतरही काही ठिकाणी बंद पाळून कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.



### मुख्यमंत्री फडणवीस, बावनकुळे यांच्याही सभा रद्द

जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी सोलापूर जिल्ह्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या विविध ठिकाणी सभांचे आयोजन केले होते. मात्र उपमुख्यमंत्री अजितदादांच्या निधनाची वार्ता येताच या सर्व सभा रद्द करण्यात आल्याची माहिती भाजपा जिल्हाध्यक्ष शशिकांत चव्हाण यांनी दिली. इतकेच नाहीतर ३ दिवस कसलेही कार्यक्रम पक्षाकडून केले जाणार नसून, वरिष्ठांचे आदेश आल्यावरच निवडणूक प्रचारयंत्रणा कामाला लागणार असल्याचेही चव्हाण यांनी स्पष्ट केले.



# अजितदादांच्या अंत्यदर्शनासाठी असंख्य कार्यकर्ते-पदाधिकारी बारामतीकडे रवाना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जानेवारी-**

आजचा मंगळवारचा दिवस मोठी दुःखद बातमी घेऊन आला. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान सकाळी ८:१५ ते ८:३० वाजेदरम्यान बारामती विमानतळाजवळ उतरण्याच्या तयारीत असताना शेजारच्या शेतात कोसळले. या भीषण विमान अपघातात काळाने महाराष्ट्राचा एक करारी, कामाचा मोठा झपाटा असलेला, रोखठोक भूमिका घेणारा नेता हिरावला. विशेष म्हणजे सोलापूर, धाराशिव जिल्ह्यावर विशेष लक्ष असलेला नेता गेल्याने त्यांचे अखेरचे दर्शन घ्यावे म्हणून दोन्ही जिल्ह्यातील हजारो कार्यकर्ते-पदाधिकारी बारामतीला गेले आहेत.

सकाळी अजितदादांच्या विमानाचा मोठा स्फोट झाला. दादांच्या मृत्यूने महाराष्ट्राला, पवार कुटुंबियांना कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना मोठा धक्का बसला. आज दिवसभरात त्यांच्या चार सभा होत्या. जिल्हा परिषद निवडणुकीसाठी त्यांची धावपळ सुरू होती. महानगरपालिका निवडणुकीतही त्यांनी मोठी धावपळ केली होती. उपमुख्यमंत्री अजित पवार हे सकाळी सुमारे ७ वाजता आपल्या सुरक्षा पथकासह आणि कर्मचाऱ्यांसोबत ८ आसनी चार्टर्ड विमानाने मुंबईहून रवाना झाले होते. हे विमान बारामतीकडे येत होते. या विमानात अजितदादा, त्यांचे दोन सहाय्यक, दोन पायलट आणि इतर दोघे होते.

हे विमान कोसळल्यानंतर एकामागून एक स्फोट ऐकू आले. अजितदादा हे कामासाठी वाघ माणूस मानले जायचे. भल्या पहाटे उठून ते कामाला सुरुवात करायचे. सकाळीच एखाद्या बसस्थानकाला, उद्यानाला अथवा सार्वजनिक ठिकाणी भेट देऊन तिथली व्यवस्था ते पाहात आणि प्रशासनाला योग्य निर्देश देत. त्यामुळे प्रशासनात त्यांचा आदरयुक्त धाक होता. पण आज अचानक आलेल्या या वाईट बातमीने प्रशासनातील अनेक अधिकाऱ्यांना दुःख आवरता आले नाही. बारामती तालुक्यात होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचारासाठी अजित पवार यांचा दौरा नियोजित होता. जिल्हा परिषद/पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक प्रचार सभा स्थळे व वेळाही ठरल्या होत्या.

मात्र अचानक काळानेच त्यांच्यावर घाला घातल्याने अवघा महाराष्ट्र हळहळला. सोलापूरसह धाराशिव जिल्ह्यात त्यांचे असंख्य कार्यकर्ते-पदाधिकारी होते. सकाळी त्यांच्या निधनाची वार्ता ऐकताच अनेकांनी दुःख व्यक्त केले; काहींनी तर टाहोही फोडून आपल्या भावना व्यक्त केल्या. एकंदरीत, या लाडक्या नेत्यांचे अखेरचे दर्शन घ्यावे म्हणून असंख्य कार्यकर्ते-पदाधिकारी बारामतीकडे रवाना झाले आहेत.

## सर्व नियोजित कार्यक्रम रद्द

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जानेवारी-**

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान अपघातात दुर्दैवी निधन झाले. महाराष्ट्र राज्याच्या प्रशासनावर पकड असलेले एक धाडसी, अभ्यासू अन् कणखर नेतृत्व हरपले, अशा भावना धनेश अचलारे, अप्पा धनके, पुरुषोत्तम वाडकर, शहाजहान शेख, बालाजी ढेकळे, संतोष भोजने, रणजित चौगुले यांनी व्यक्त केल्या. दरम्यान, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी शिवसेना उमेदवाराच्या प्रचारार्थ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग येथे सभेचे आयोजनअ करण्यात आले होते. परंतु अजितदादा पवार यांच्या निधनामुळे सर्व नियोजित कार्यक्रम रद्द करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

# सर्वसामान्यांचे हित जोपासणारा नेता : खा धैर्यशील मोहिते-पाटील



**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२८ जानेवारी-**

अजितदादा म्हणजे सर्वसामान्यांचे हित जोपासणारा नेता होय . या नेतृत्वाने नेहमीच दूरदृष्टी ठेवून महाराष्ट्राच्या विकासात मोलाचे योगदान दिले आहे असे मत खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनी व्यक्त केले.

तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकांच्या संदर्भात बुधवारी सकाळी शिवरत्न बंगला येथे प्रचाराचा शुभारंभ राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते करण्यात येणार होता. परंतु दुर्दैवाने सकाळी ९ वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमानाला अपघात झाल्याची बातमी समोर आली. त्यामुळे प्रचार शुभारंभ रद्द करून अजित पवार यांच्या श्रद्धांजलीची सभा घेण्यात आली. या सभेस राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, आ. उत्तमराव जानकर,



कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते पाटील, अर्जुनसिंह मोहिते-पाटील, सयाजीराजे मोहिते पाटील, व्हा.चेअरमन शंकरराव माने-देशमुख, दत्तात्रय

भिलारे, ॲड. प्रकाश पाटील, रामचंद्र सावंत-पाटील, वैष्णवीदेवी मोहिते-पाटील, राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष रवींद्र पाटील, तालुकाध्यक्ष देवीदास ढोपे यांच्यासह जिल्हा परिषद व पंचायत समिती उमेदवार उपस्थित होते. प्रारंभी प्रा. हरिभाऊ मगर यांनी श्रद्धांजली अर्पण करुन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला. रिपाइंचे नंदकुमार केंगार, डॉ. शिवाजीराव पिसाळ, लक्ष्मण पवार, अजित बोरकर , संग्रामसिंह जहागिरदार, ॲड. प्रकाश पाटील आदींनी आपले मनोगत व्यक्त करून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आदरांजली अर्पण केली.

आ उत्तमराव जानकर म्हणाले, अजित पवार यांच्या अपघाती निधनाने महाराष्ट्राच्या विकासाचा कणा मोडला आहे. ते एक अभ्यासू दूरदृष्टीचे नेते होते. आपल्या ५० वर्षाच्या राजकीय, सामाजिक, सहकार, शिक्षण, उद्योग, सांस्कृतिक कारकिर्दीत त्यांनी महाराष्ट्राला एका उंचीवर नेऊन ठेवले होते. त्यांच्या निधनाने भरुन न येणारी पोकळी निर्माण झाली आहे.

# माढावासीयांनी अजितदादांना वाहिली भावपूर्ण श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा,**
**माढा,दि.२८ जानेवारी-**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बारामती जवळ विमान अपघातात मृत्यू झाल्याची बातमी कळताच संपूर्ण महाराष्ट्र सह देशभर हळहळ व्यक्त करण्यात आली अजित पवार यांचा मृत्यू हा महाराष्ट्राच्या राजकारण व समाजकारणासाठी न भरून येणारी पोकळी निर्माण करणारी घटना बुधवारी सकाळी घडली.

माढा शहर व परिसराच्या वतीने माढा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात राजकारणातील सर्वपक्षीय तसेच सामाजिक क्षेत्र व्यापारी व्यावसायिक शेतकरी यांच्या वतीने अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. महाराष्ट्राचे दादा गेले दादा परत या म्हणत अनेकांनी भावुक



भावना व्यक्त केल्या. यावेळी सर्व क्षेत्रात कार्यरत असलेले नागरिक उपस्थित होते.अनेकांना आपले अश्रू अनावर होऊन हळहळ व्यक्त होत होती. यावेळी माजी आमदार धनाजीराव साठे, नगराध्यक्षा ॲड. मिनल साठे, उपनगराध्यक्षा कल्पना जगदाळे, दादासाहेब साठे, शिवाजीराव सावंत, आनंदराव कानडे, पृथ्वीराज सावंत, ऋतुराज सावंत, गुरुराज कानडे, समर्थ भांगे, शंभुराजे चवरे, गणेश साठे, मुन्ना साठे, शंभू साठे, गंगाराम पवार, शहाजी चवरे, दिनेश जगदाळे,महेश चवरे, रवी सरवदे, देविदास खरात, किरण पवार, दत्तात्रय अंबुरे, संतोष जुगदार, माढा नगरपंचायतचे, नगरसेवक नगरसेविका यांसह अनेक माढावासीय व परिसरातील गावचे नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी आमदार धनाजीराव साठे यांनी भावुक होऊन श्रध्दांजली वाहिली.



# माळशिरस व्यापारी संघटनेतर्फे अजितदादांना आदरांजली

## व्यापारपेठ, दुकाने ठेवली बंद

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.२८ जानेवारी-**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आज सकाळी विमान अपघातात निधन झाले. माळशिरस राष्ट्रवादी काँग्रेस व माळशिरस व्यापारी संघटना यांच्यावतीने माळशिरस शहरातील व्यापाऱ्यांनी आपली दुकाने बंद ठेवून अजितदादाना आदरांजली वाहिली तसेच गणेश चौकात अजितदादांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून शोक सभा घेण्यात आली. यामध्ये अनेकांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

यावेळी माजी सरपंच तुकाराम देशमुख, राष्ट्रवादी माळशिरस तालुका अध्यक्ष शिवाजी देशमुख, मारुती देशमुख, महादेवदेशमुख, बाळासाहेब सरगर, नगरसेवक रघुनाथ चव्हाण, शामराव बंडगर, व्यापारी संघटना अध्यक्ष प्रफुल्ल शहा, दत्तू ढेकळे, सुहास थोरात, वैभव देशमाने, भिमराव शेंडगे, अमीर पठाण, सर्जेराव जानकर, कुमार गायकवाड, अमित दोशी, अजित तरडे, आकाश सावंत, ॲड. प्रभाकर कुलकर्णी, ॲड. भैय्या वाघमोडे यांच्यासह व्यापारी, नागरिक उपस्थित होते.



**अकलूज : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या विमान अपघाताची बातमी समजताच अकलूज व परिसरात शोककळा पसरली. व्यापाऱ्यांनी आपले व्यवहार बंद ठेवून श्रद्धांजली वाहिली. जिल्हा परिषद पंचायत समितीचे प्रचार व सभा रद्द करण्यात आल्या. माळशिरस पंचायत समिती जिल्हा परिषदमध्ये सर्वजण भाजपच्या विरोधात एकत्र आले होते व त्यांची प्रचार सभा शुभारंभ होणार होता परंतु अजित पवारांच्या निधनाचे वृत्त समजतात त्यांना श्रद्धांजली वाहून सर्व कार्यक्रम रद्द करण्यात आले.**



## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे माढ्यात कडकडीत बंद

**माढा : उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे विमान दुर्घटनेत निधन झाल्याने माढा शहरात सर्व दुकाने व बाजारपेठ बंद ठेवून कडकडीत बंद पाळण्यात आला.**

# अजितदादांना सर्वपक्षीय आदरांजली

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि.२८ जानेवारी-**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अजितदादा पवार यांच्या निधनाने संपूर्ण महाराष्ट्रावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनानंतर मोडनिंब (ता.माढा) शहरात नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने बंद पाळून आदरांजली वाहण्यात आली.व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने दुकाने बंद ठेवली, तर शाळांनाही सुट्टी देण्यात आली.

जमलेल्या सर्वपक्षीय पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांच्या डोळ्यांत पाणी होते. सर्वच पक्षांच्या नेत्यांनी श्रद्धांजली वाहिली. दादांच्या निधनानंतर मोडनिंब शहरात शोक व्यक्त करण्यासाठी नागरिकांनी स्वयं स्फूर्तीने बंद पाळला. शहरातील बाजारपेठा, दुकाने तसेच दैनंदिन व्यवहार पूर्णतः बंद ठेवण्यात आले होते. व्यापारी वर्गाने बंदमध्ये सहभाग नोंदवला, तर शाळांना सुट्टी देण्यात आली.नागरिकांनी एकत्र येत दादांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.



# पिलीव येथे व्यवहार बंद ठेवून श्रद्धांजली

**पिलीव, दि.२८ जानेवारी-**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आज सकाळी ८:४५ वाजता लॅंडिंग दरम्यान झालेल्या भीषण अपघातात निधन झाल्याची वार्ता समजताच पिलीव अक्षरश शोककळा पसरली. पिलीव येथील व्यापाऱ्यांनी स्वयंस्फूर्तीने ताबडतोब आपले सर्व व्यवहार दुपारी चार वाजेपर्यंत बंद ठेवुन आपलया भावना व्यक्त श्रद्धांजली वाहिली. याठिकाणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली वाहिली. अजितदादा पवार यांच्या निधनाची वार्ता समजताच येथील रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील व रमेश खलीपे ज्युनिअर कॉलेज मध्ये त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली तसेच शाळेला सुट्टी देण्यात आली.तसेच पिलीव परिसरातील सर्व जिल्ह्य परिषद शाळांमध्ये श्रद्धांजली अर्पण करून शाळांना सुट्टी देण्यात आली.

# वेळापूरमध्ये सर्व व्यवहार बंद; ग्रामस्थांकडून श्रद्धांजली

**वेळापूर, दि.२८ जानेवारी-**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आज सकाळी सुमारे ९:१५ वाजता बारामतीकडे येत असताना विमान लॅंडिंगदरम्यान अपघातात निधन झाले. या घटनेमुळे वेळापूर येथे व्यापारी व नागरिकांनी स्वयंस्फूर्तीने सर्व दुकाने व व्यवसाय बंद ठेवून आपल्या भावना व्यक्त केल्या. वेळापूर ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामस्थांच्या वतीने श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी वेळापूर ग्रामपंचायतीचे सरपंच रजनीश बनसोडे यांनी, महाराष्ट्राने एक अनुभवी व प्रभावी नेतृत्व गमावले आहे. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना, असे भावनिक शब्दांत श्रद्धांजली व्यक्त केली. अमोल मंडलिक, रणजीत सरवदे, प्रदीप सरवदे, दिलीप जगदाळे, दीपक माने, धनाजी धांडोरे, अवी मुंगूसकर, दीपक जाधव, सुभाष माने, सुरेश जाधव, मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. संपूर्ण वेळापूरमध्ये शोकमय वातावरण असून नागरिकांनी शांततेत व संयमाने आपली आदरांजली व्यक्त केली.





# सांगोल्यात शाळा, व्यवहार बंद ठेवून दादांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२८ जानेवारी -**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे बारामती विमानतळाजवळ बुधवारी दि.२८ जानेवारी रोजी सकाळी घडलेल्या भीषण विमान अपघातात मृत्यू झाला. त्यांच्या अकाली निधनाने संपूर्ण राज्यात हळहळ व्यक्त होत असून महाराष्ट्र राज्याची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे.

त्यांचे मूळगाव असलेल्या बारामती प्रमाणे सांगोला तालुक्यातील नागरिक शोकसागरात बुडाले आहेत. सांगोला शहरातील व तालुक्यातील नागरिकांनी शाळा व व्यवहार बंद ठेवून तसेच सोशल मीडियाद्वारे अजित दादांना श्रद्धांजली अर्पण केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या अपघाती दुःखद निधनाबद्दल राज्यात शासकीय दुःखवटा जाहीर केला. त्या दुःखामध्ये सामील होण्यासाठी सांगोला शहरातील व तालुक्यातील व्यापारी बंधूंनी आपले सर्व व्यवहार बंद ठेवून दुःखामध्ये सामील झाले. तसेच शाळा ही बंद ठेवण्यात आल्या होत्या.

सांगोला येथील श्री अंबिकादेवी यात्रा व प्रदर्शन समिती यांच्या वतीने बुधवार दि.२८ जानेवारी रोजी आयोजित करण्यात आलेला शेतकरी प्रदर्शन व विविध स्पर्धांच्या बक्षीस वितरण समारंभ व शोभेचे दारू काम या दुर्दैवी घटनेमुळे रद्द करण्यात आला.

# अजितदादांच्या अकाली मृत्यूमुळे बार्शीत शोकाकुल वातावरण

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२८ जानेवारी-**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याची बातमी समजताच शहरभर शोकाकुल वातावरण झाले. विविध भागात आणि चौकाचौकात अजितदादांच्या निधनाच्या बातमीची चर्चाच सर्वत्र सुरु होती.

उपमुख्यमंत्री असताना अजित पवार हे अनेक वेळा बार्शीत विविध राजकीय आणि विकास कामाच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी आले होते. आमदार दिलीप सोपल यांच्यासह माजी आमदार राजेंद्र राऊत, माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, भाजपचे नेते राजेंद्र मिरगणे यांच्याशी त्यांचे घनिष्ठ आणि जिव्हाळ्याचे संबंध होते. अजितदादांचा वक्तशीरपणा, स्पष्टवक्तेपणा आणि सडेतोड वृत्तीमुळे ते बार्शीत देखील प्रसिद्ध होते. विशेष म्हणजे सध्याच्या तरुणांना अजित पवार यांचे खूप मोठे आकर्षण होते. त्यांच्या आकस्मिक निधनाची बातमी समजतात अनेकांना अश्रू आवरता



आले नाहीत. अजित पवार यांचा प्रशासकीय अधिकाऱ्यांवर देखील मोठा वचक होता.

अजितदादा यांचे आणि माझे संबंध १९९१ पासून आजपर्यंत होते. त्यांनी विकासाकडे बघत बार्शीला कधीच निधी कमी पडू दिला नाही. इतरांपेक्षा काहीतरी वेगळं करण्याचा दृष्टिकोन अजितदादा ठेवून असत. जातीच्या पलीकडे जाऊन ते नेहमीच राजकारण करत होते, अशी भावना आमदार दिलीप सोपल यांनी व्यक्त केली. त्यांची पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत काम करण्याची पद्धत निश्चितच वाखाणण्याजोगी होती. मी विरोधी पक्षाचा आमदार असताना देखील त्यांनी मला कधीच दुजाभाव न करता सढळ हाताने बार्शी विधानसभा मतदारसंघासाठी त्यांनी निधी दिल्याची भावना माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी व्यक्त केली. महाराष्ट्राचे कधीही न भरुन निघणारे नुकसान झाल्याची भावना ही राऊत यांनी व्यक्त केली. त्यांनी राजकारणात नेहमीच सहकार्य केल्यामुळेच आपण ठाम राहिलो अशी सद्गदित भावना माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले यांनी व्यक्त केली. सर्व शाळांना सुट्टी दिली होती. तीन दिवसाचा शासकीय दुःखवटा असल्याने नगरपालिकेवरील तिरंगा झेंडा देखील अर्ध्यावर ठेवण्यात आला आहे. तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा प्रचार आज सर्वांनी बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता.

CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



क्रेडाई प्रॉपर्टी एक्स्पोचे भूमिपूजन

सोलापूर : नॉर्थकोट मैदान येथे होणाऱ्या क्रेडाई प्रॉपर्टी एक्स्पो २५-२६चे भूमिपूजन झाले. यावेळी डावीकडून दक्ष पटेल, अभय सुराणा, अभिनव साळुंखे, आनंद पाटील, संतोष सुरवसे, किशोर चांडक, केदार बिराजदार, प्रदीप पिंपरकर, गुरुराज येल्लटी, शशिकांत जिद्दीमनी, मिलिंद लोळगे, सिध्देश्वर जोकारे व अन्य.



## महत्त्वाचे...

## जिल्हा परिषद ६८ गटासाठी २७१ तर १३६ गणांसाठी ४८५ जण रिंगणात

**पंढरपुरात सर्वाधिक तर उत्तर सोलापूर तालुक्यात सर्वात कमी उमेदवार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२८ जानेवारी-**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी येत्या ५ फेब्रुवारी रोजी मतदान होत असून, ७ फेब्रुवारीला मतमोजणी होणार आहे. या निवडणुकीने जिल्ह्यातील राजकीय वातावरण पूर्णतः ढवळून निघाले असून प्रत्येक तालुक्यात वेगवेगळी राजकीय समीकरणे आकाराला आली आहेत. पारंपरिक राजकीय पक्षांसोबतच स्थानिक आघाड्या, गटतट आणि अपक्ष उमेदवार मोठ्या संख्येने निवडणूक रिंगणात उतरल्याने ही निवडणूक अत्यंत चुरशीची ठरणार आहे. जिल्हा परिषदेच्या ६८ गटांसाठी २७१ उमेदवार, तर पंचायत समितीच्या १३६ गणांसाठी ४८५ उमेदवार असे एकूण ७५६ उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले आहेत.

ग्रामीण सत्तेच्या या महत्त्वाच्या निवडणुकीत भाजप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार व अजित पवार गट), शिवसेना (उद्धव ठाकरे व शिंदे गट) यांच्यासह विविध स्थानिक आघाड्यांनी स्वतंत्र रणनीती आखल्या आहेत. बार्शी तालुक्यात सहा जिल्हा परिषद गटांसाठी १६ उमेदवार तर पंचायत समितीच्या १२ गणांसाठी ३६ उमेदवार असे एकूण ५२ उमेदवार रिंगणात आहेत.

माढा तालुक्यात सात झेडपी गटांसाठी २० आणि १४ पंचायत समिती गणांसाठी ५० असे ७० उमेदवार निवडणूक लढवत आहेत. करमाळा तालुक्यात सहा गटांसाठी २० तर १२ गणांसाठी ४६ असे ६६ उमेदवार असून येथे पक्षीय लढतींसोबतच गटांतर्गत संघर्षही दिसून येत आहे. सांगोला तालुक्यात सात झेडपी गटांसाठी तब्बल ४१ तर १४ गणांसाठी ५४ असे ९५ उमेदवार रिंगणात उतरले असून जिल्ह्यातील सर्वाधिक चुरस सांगोल्यात पाहायला मिळत आहे. अक्कलकोट तालुक्यात सहा गटांसाठी १८ आणि १२ गणांसाठी ३५ असे ५३ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. येथे भाजप आणि शिवसेना शिंदे गटात लढत होत आहे.



दक्षिण सोलापूर तालुक्यात सहा गटांसाठी २८ तर १२ गणांसाठी ५२ असे ८० उमेदवार असून येथे बहुरंगी लढती होणार आहेत. उत्तर सोलापूर तालुक्यात तीन झेडपी गटांसाठी १४ आणि सहा गणांसाठी २२ असे ३६ उमेदवार आहेत.

मोहोळ तालुक्यात जिल्हा परिषदेसाठी २५ तर पंचायत समितीसाठी ४१ असे ६६ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. पंढरपूर तालुक्यात आठ झेडपी गटांसाठी ४६ तर १६ गणांसाठी ७० असे ११६ उमेदवार रिंगणात असून वारकरी संप्रदायाच्या प्रभावामुळे येथील राजकीय गणिते वेगळी ठरणार आहेत. मंगळवेढा तालुक्यात चार गटांसाठी १३ तर आठ गणांसाठी २५ असे ३८ उमेदवार, तर माळशिरस तालुक्यात नऊ गटांसाठी ३० आणि १८ गणांसाठी ५४ असे ८४ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. एकूणच जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक ही केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक न राहता, आगामी विधानसभा व लोकसभा निवडणुकांची रंगीत तालीम ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे. ५ फेब्रुवारीच्या मतदानानंतर मतदारांनी कुणाच्या बाजूने कौल दिला, याची उत्सुकता संपूर्ण जिल्ह्याला लागून राहणार असून ७ फेब्रुवारीला सोलापूर जिल्ह्याच्या राजकारणाची नवी दिशा स्पष्ट होणार आहे.




## आजी-माजी सैनिक यांच्या तर्फे नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष यांचा सन्मान

**सांगोला, दि.२८ जानेवारी -**

आजी माजी सैनिक कल्याणकारी संस्था, सांगोला यांच्या वतीने प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून सांगोला नगर परिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष आनंद माने, उपनगराध्यक्ष नितीन इंगोले, गटनेते प्रशांत धनवजीर तसेच विरोधी पक्षनेते इंजि.रमेश जाधव यांचा सत्कार करण्यात आला. तसेच मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी हे स्वातंत्र्य आणि प्रजासत्ताक दिन कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिका सर्व आजी माजी सैनिकांच्या घरोघरी पोहोचवून हे कार्य मोठ्या निष्ठेने आणि जबाबदारपणे पार पाडतात. याबद्दल त्यांचाही सन्मान याप्रसंगी करण्यात आला. यावेळी आजी-माजी सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माघी यात्रेसाठी लाखोंच्या संख्येने वारकरी दाखल





**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि.२८ जानेवारी -**

माघी यात्रेच्या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी राज्याच्या विविध भागातून रेल्वे, एसटी आणि खासगी वाहनांमधून लाखोंच्या संख्येने भाविक येथे दाखल झालेले आहेत. विठ्ठल रुक्मिणीच्या पदस्पर्श दर्शनासाठी भाविकांना सुमारे दहा ते बारा तासांचा कालावधी लागत आहे. माघी यात्रे निमित्त विठ्ठलरुक्मिणी मंदिरावर आकर्षक रोषणाई देखील करण्यात आली आहे.

राज्याच्या विविध भागातून संतांच्या लहानमोठ्या दिंड्याचे पंढरीनगरीत आगमन होवू लागलेले आहे. विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शनाची रांग बुधवारी (ता.२८) सकाळी गोपाळपूर रस्त्यावरील सर्व शेवटच्या पत्राशेड मध्ये गेली होती. मुखदर्शनासाठी देखील भाविकांची रांग लागलेली दिसत आहे. माघी यात्रेतील मुख्य एकादशीचा सोहळा गुरुवारी (ता.२९) रोजी संपन्न होत आहे. या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी राज्याच्या विविध भागातून आलेल्या भाविकांमुळे सध्या पंढरीनगरीतील विठ्ठल मंदिर परिसर, प्रदक्षिणा मार्ग, चंद्रभागा वाळवंट, स्टेशन रस्ता आणि पासष्ठ एकर परिसर फुलून गेलेला दिसत आहे.

### शहरातील मठ, धर्मशाळांमधुन वारकऱ्यांची लगबग

येथील गजानन महाराज मठ, संत तनपुरे महाराज मठ, कैकाडी महाराज मठातून तसेच मंदिर समितीचे सुमारे तीनशे खोल्यांचे भव्य भक्तनिवास, या बरोबरच मंदिर समितीच्या वेदांत, व्हिडीओकॉन तसेच रेल्वेस्टेशन जवळील भक्तनिवास ( पर्यटक निवास ) या मधुन देखील भाविकांची वर्दळ वाढल्याचे दिसत आहे.

### छोट्या मोठ्या व्यावसायिकांची दुकाने सज्ज

यात्रेसाठी येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर तसेच प्रदक्षिणा मागार्वर छोट्या मोठ्या व्यावसायीकांनी आपली दुकाने थाटलेली दिसत आहेत. गेले एक दोन दिवस रात्रभर् मेहनत घेवून आपल्या दुकानांमधून आकर्षक पध्दतीने त्यांनी मालाची मांडणी केलेली दिसत आहे. या मध्ये प्रासादिक वस्तु, फोटोफ्रेम, देवतांच्या ताब्या पितळेच्या मुर्ती, तुळशीच्या माळा, विविध धामिर्क ग्रंथ, सी.डी कॅसेट आदी दुकानांचा समावेश आहे. ही सर्व दुकाने विक्रीसाठी सज्ज झालेली आहेत.

### ६५ एकरात राहुट्यांची गर्दी

चंद्रभागा नदीच्या पैलतिरावर वसविलेल्या पासष्ठ एकर परिसरात काही दिंड्या सध्या मुक्कामासाठी दाखल झालेल्या आहेत. त्यामुळे या परिसरात राहूट्या उभारण्याच्या कामात वारकरी व्यस्त दिसत आहे.

### पोलिसांचा मोठा बंदोबस्त

शहरात विठ्ठल मंदिर, वाळवंट, पत्राशेड, पदस्पर्श दर्शन रांग, मुखदर्शन रांग, पासष्ठ एकर परिसर, प्रदक्षिणा मार्ग आदी गर्दीच्या ठिकाणी मोठा पोलिस बंदोबस्त लावण्यात आलेला आहे.

### चंद्रभागेच्या वाळवंटात धार्मिक कार्यक्रम

चंद्रभागेच्या पात्रात येथील बंधाऱ्यामधुन पाणी सोडल्यामुळे पुरेसा पाणी साठा नदीपात्रात उपलब्ध झालेला आहे. त्यामुळे भाविकांना चंद्रभागा स्नानाची पर्वणी आनंदाने लुटता येत आहे. वाळवंटा मध्ये भाविकांचे स्नाना नंतरचे पुजा, हरिपाठ वाचनाचे दैनंदिन नित्य कार्यक्रम सुरु आहेत. या बरोबरच वाळंटात महाराज मंडळींच्या विविध फडावर सुरु असलेल्या भजन, कीर्तन तसेच प्रवचनाच्या कार्यक्रमा मध्ये वारकरी भाविक सहभागी होताना दिसत आहेत.

# वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी 'माऊली स्कॉड'

**सहा. पोलीस अधीक्षक डगळे यांचे प्रतिपादन**

**१ हजार ३८६ पोलीस अधिकारी व कर्मचारी, होमगार्ड सज्ज**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.२८ जानेवारी -**

माघ शुद्ध एकादशी २९ जानेवारी २०२६ रोजी असून, या माघ यात्रा कालावधीत पंढरपुरात श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येतात. वारी कालावधीत येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षेसाठी तसेच वारी निर्विघ्नपणे पार पडण्यासाठी पोलीस यंत्रणा सज्ज असल्याची माहिती सहा.पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांनी दिली. वारकरी भाविकांना संरक्षण देण्यासाठी तसेच चोरी रोखण्यासाठी माऊली स्कॉड स्थापन करण्यात आले असून, यामध्ये वारकरी व नागरिकांच्या वेशात पोलीस अधिकारी तैनात



करण्यात आले असल्याचेही त्यांनी सांगितले.

माघ वारीत पोलीस प्रशासनाने वारकरी तसेच स्थानिक नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले असून, सुरक्षेसाठी व वाहतुक नियत्रंणासाठी १ हजार ३८६ पोलीस अधिकारी व कर्मचारी होमगार्ड यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामध्ये ०२पोलीस उपअधिक्षक, १७ पोलीस निरिक्षिक, ७९ सहाय्यक पोलीस निरिक्षक व पोलीस उपनिरिक्षक, ६८८ पोलीस कर्मचारी व ६०० होमगार्ड तसेच आरसीपी, क्युआरटी, बीडीएस पथके, कार्ट पथके नियुक्त करण्यात आली आहेत. वारी कालावधीत गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी नदीपात्र, भक्ती सागर (६५ एकर), महाव्दार, महाव्दार घाट, पत्राशेड यासह आदी ठिकाणी वॉच टॉवर उभारण्यात आले आहेत. ड्रोन द्वारे व १६२ सीसीटीव्ही कॅमेरॅच्या माध्यमातून देखील लक्ष ठेवले जाणार आहे. वारकऱ्यांच्या मदतीसाठी तीर्थक्षेत्र पोलीस मदत केंद्रे सुरु करण्यात आली आहेत. वारी कालावधीत वाहतुकीची कोंडी होऊ नये भाविकांना वाहुकीचा कोणताही अडथळा येऊ नये यासाठी १० गामा पेट्रोलिंग व ९ ठिकाणी डायव्हरशन पॉईट सुरु करण्यात आले आहे. त्याचबरोबर खाजगी वाहनधारकांच्या वाहनांना थांबण्यासाठी शहरात व शहराबाहेर १३ ठिकाणी वाहनतळ व्यवस्था करण्यात आली आहे. वारकरी भाविकांनी सुरक्षेसाठी तसेच वारी सुरक्षित पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन सहाकार्य करावे असे, आवाहनही सहा.पोलीस अधीक्षक डगळे यांनी केले आहे.

# सोपल स्कूलमध्ये पलक वाघेच्या हस्ते ध्वजारोहण



**पांगरी, दि.२८ जानेवारी-**

प्रजासत्ताक दिनानिमित्त स्व. शोभाताई सोपल इंग्लिश स्कूल पांगरी येथे कराटेमध्ये मर्दानी खेळात राज्यस्तरीय प्रथम क्रमांक पटकावणारी विद्यार्थीनी पलक वाघे हिच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. प्रशालेतील चिमुकल्यांनी कवायत सादरीकरण केले. पलक वाघे, समर्थ सांगळे.सोलापूर जिल्हा स्तरीय शाळेत अष्टे डू आखाडा स्पर्धेत प्रविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे राजेंद्र वाघे, बिभीषण सांगळे, मेजर अजित मुंढे व अध्यक्ष बिभिशन गरड उपस्थित होते. प्रास्ताविक प्रशालेचे संस्थापक विनायक गरड यांनी केले. सूत्रसंचालन शिक्षिका सना शेख यांनी केले. प्रिन्सिपल सविता चांदणे यांनी आभार मानले.

# सर्वाधिकवेळा राज्याचे उपमुख्यमंत्रीपद; महापुजेसाठी मात्र दोन वेळाच उपस्थिती

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२८ जानेवारी-**

राज्याचे उपमुख्यमंत्रीपद अजित पवारांनी सर्वात जास्ती वेळा भूषविले आहे. एकीकडे सर्वात अधिकवेळा उपमुख्यमंत्रीपद भूषविण्याचा त्यांच्या नावावर विक्रम झालेला असताना दुसरीकडे उपमुख्यमंत्री म्हणून विठ्ठलाच्या शासकीय महापुजेसाठी केवळ दोन वेळाच त्यांना संधी मिळाली आहे. मात्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून आषाढी यात्रेच्या वेळी विठ्ठलाच्या शासकीय महापुजेसाठी येण्याचे दादांचे स्वप्न अखेर स्वप्नच राहिले आहे. कारण विमान अपघातात मंगळवारी (ता.२८) दादांचा दुर्देवी मृत्यु झाला.

राज्याचे आराध्य दैवत आणि गोरगरीबांचा बालाजी म्हणून विठ्ठलाची सर्वदूर खात्यी आहे. दरवर्षी पंढरपूरात चार मोठ्या यात्रा भरत असतात. त्या चार यात्रांमध्ये आषाढी आणि कार्तिकी यात्रेला विशेष महत्व आहे. आषाढी यात्रेच्या वेळी देहू,आळंदीसह राज्याच्या विविध भागातून विविध संतांचे पालखी सोहळे पंढरपूरात विठ्ठलाच्या भेटीसाठी येत असतात. त्यामुळे आषाढी यात्रेच्या वेळी पंढरपूरात लाखोंच्या संख्येने वारकऱ्यांची मांदियाळी असते. आषाढी यात्रेच्या वेळी राज्याचे प्रतिनिधी म्हणून मुख्यमंत्र्यांच्या हस्ते विठ्ठलाची शासकीय महापुजा करण्याची परंपरा आहे. मात्र राज्यात मनोहर जोशी मुख्यमंत्री असताना युती शासनाच्या वेळी राज्यात भाजपासाठी खास उपमुख्यमंत्रीपद निर्माण केले गेले. तेव्हा पासून आषाढी यात्रेच्या वेळी मुख्यमंत्री तर कार्तिकी यात्रेच्या वेळी उपमुख्यमंत्री राज्याचे प्रतिनिधी म्हणून विठ्ठलाच्या महापुजेसाठी येण्याची प्रथा सुरु झाली आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळात त्यांचा मित्रपक्ष असलेली शिवसेना त्यांच्या बरोबर सत्तेत सहभागी झालेली होती. मात्र त्यावेळी भाजपासाठी उपमुख्यमंत्रीपद तयार करण्यात आलेले नव्हते. त्यावेळी सुरुवातीला एकनाथ खडसे यांची महसूलमंत्रीपदी त्या नंतरच्या काळात चंद्रकांत पाटील यांची या पदावर वर्णी लावण्यात आली होती. त्यामुळे त्या टर्म मध्ये उपमुख्यमंत्र्यां ऐवजी महसूल मंत्र्यांना कार्तिकी एकादशीच्या शासकीय महापुजेसाठी उपस्थित राहण्याचा मान देण्यात आलेला होता. दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री म्हणून २020 आणि २०२१ मध्ये अजित पवारांनी विठ्ठलाच्या शासकीय महापुजेसाठी हजेरी लावलेली होती. त्या नंतर २०१४ मध्ये एकनाथ खडसे हे महसूल मंत्रीपदावर होते. त्यावेळी महसूल मंत्र्यांना हा पुजेचा मान देण्यात आलेला होता. त्या नंतर महसूल मंत्री पदावरुन खडसेंना पायउतार व्हायला लागल्यामुळे चंद्रकांत पाटील यांच्या गळ्यात महसूल मंत्रीपदाची माळ पडली. त्यामुळे २०१५ पासून ते २०१९ पर्यंत सलग पाच वेळेला त्यांना पंढरपूरात येवून कार्तिकी एकादशीच्या शासकीय महापुजेसाठी उपस्थित राहण्याची संधी मिळाली. दरम्यान अजित पवारांना उपमुख्यमंत्री म्हणून केवळ २020 आणि २०२१ असे दोन वेळेलाच कार्तिकी यात्रेच्यावेळी विठ्ठलाची शासकीय महापुजा करण्याची संधी मिळाली. अजितदादांना अनेक वेळा मुख्यमंत्रीपदाने हुलकावणी दिली. त्यामुळेच अजितदादांचे राज्याचा मुख्यमंत्री म्हणून आषाढी यात्रेच्या वेळी विठुरायाच्या शासकीय महापुजेसाठी उपस्थित राहण्याचे स्वप्न हे अखेर स्वप्नच ठरले.





### कार्तिकीच्या महापुजेसाठीची यांची राहिली उपस्थिती

लक्ष्मण ढोबळे (पालकमंत्री २०१२).दिलीप सोपल (पालकमंत्री २०१३), एकनाथ खडसे (महसूलमंत्री २०१४ आणि २०१५). चंद्रकांत पाटील (महसूलमंत्री २०१६, २०१७, २०१८ आणि २०१९). अजित पवार (२०२० आणि २०२१). देवेंद्र फडणवीस (उपमुख्यमंत्री असताना २०२२ आणि २०२३), चंद्रकांत पुलकुंडवार ( विभागीय आयुक्त पुणे आचारसंहितेमुळे २०२४) त्या नंतर एकनाथ शिंदे (उपमुख्यमंत्री २०२५)

केवळ देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांना राज्याचे मुख्यमंत्रीपद तसेच उपमुख्यमंत्रीपद भूषविण्याची संधी प्राप्त झालेली आहे. त्यामुळे या दोन जणांनाच आषाढीच्यावेळी मुख्यमंत्री म्हणून आणि कार्तिकी यात्रेच्या वेळी उपमुख्यमंत्री म्हणून विठ्ठल रखुमाईच्या शासकीय महापुजेसाठी उपस्थित राहण्याची संधी मिळाली.

### दोन वेळेला शासकीय महापुजेची संधी दादांनी गमावली.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर २०१२ मध्ये सिंचन प्रकरणाचे आरोप झाल्यामुळे त्यांनी अचानक राजीनामा दिला होता. त्यामुळे त्यांना २०१२ मध्ये श्री विठ्ठलाच्या शासकीय महापुजेसाठी येता आले नाही. त्याच प्रमाणे २०१३ मध्ये गोहत्या बंदी कायद्यासाठी वारकरी मंडळींना तर दुष्काळी परिस्थिती मध्ये उजनी धरणा मध्ये लघुशंका करायची का ? या दादांच्या वादग्रस्त विधानामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटनेने घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे २०१३ मध्ये देखील कार्तिकी एकादशी निमित्त श्री विठ्ठलाची शासकीय महापुजेची संधी गमवावी लागली होती. त्यामुळे २०१२ मध्ये तत्कालीन पालकमंत्री लक्ष्मणराव ढोबळे यांनी तर २०१३ तत्कालीन पालकमंत्री दिलीप सोपल यांनी विठ्ठलाची शासकीय महापुजा केली होती.

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## मुलीवर अत्याचार करणाऱ्या पित्यास २० वर्षे सक्तमजूरी

**सोलापूर, दि. २८ जानेवारी-**
पोटच्या अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम बापास विशेष न्यायाधीश बी एन सुरवसे यांनी २० वर्षे सक्त मजुरी आणि वीस हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. याबाबत सोलापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. यातील पीडिता ही अल्पवयीन असून १५ जानेवारी २०२० रोजी घरी असताना नराधम पित्याने तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केला त्यानंतर त्या नराधम बापाने पिडीतेला घडलेली घटना कोणालाही न सांगण्याबाबत दमदाटी केली होती त्यानंतर दोन-तीन दिवसानंतर पिडीतेची बहीण ही घराबाहेर गेली असता त्या नराधम बापाने पुन्हा पीडितेवर अत्याचार केला असा प्रकार त्या नराधम बापाने वारंवार पिडीते सोबत केला एके दिवशी पिडीतेच्या बहिणीने हा प्रकार पाहिला आणि तिच्या आईला सांगितला त्यावरून सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात नराधम बापा विरुद्ध बालक लैंगिक अत्याचाराच्या कलमासह बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला. सोलापूर तालुका पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक देवडे यांनी आरोपी नराधम बापास अटक करून तपास केला व न्यायालयात दोषारोपपत्र पाठवले या खटल्याची सुनावणी विशेष न्यायाधीश बी एन सुरवसे यांच्यासमोर झाली या प्रकरणी सात साक्षीदारांच्या साक्षी वैद्यकीय पुरावा ग्राह्य धरून विशेष न्यायाधीश सुरवसे यांनी आरोपी बापास वीस वर्षे सक्त मजुरी आणि वीस हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली तसेच दंड न भरल्यास एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्यात आली. या प्रकरणी सरकारच्या वतीने एडवोकेट शितल डोके यांनी तर आरोपीच्या वतीने एडवोकेट झुरळे यांनी काम पाहिले कोर्ट पैरवी म्हणून महिला कर्मचारी जमादार व काळे यांनी काम पाहिले



### ▶▶ महत्वाचे...

### शिवसेना गटनेतेपदी अमोल शिंदे यांची निवड

**सोलापूर, दि. २८ जानेवारी -**
महानगरपालिकेतील राजकीय हालचालींना वेग आला असून, शिवसेनेच्या (शिंदे गट) गटनेतेपदी अमोल बाळासाहेब शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. शिवसेनेचे मुख्यनेते आणि राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेना मध्यवर्ती कार्यालयाकडून यासंदर्भात अधिकृत पत्र प्रसिद्ध करण्यात आले आहे. शिवसेनेचे सचिव संजय भाऊराव मोरे यांच्या स्वाक्षरीने हे पत्र सोलापूरचे शहरप्रमुख सचिन मोहन चव्हाण यांना पाठवण्यात आले आहे.



### आदिवासी कोळी समाजाचा एक फेब्रुवारीला वधू-वर मेळावा

**सोलापूर, दि.२७ जानेवारी-**
बटगेरी सामाजिक प्रतिष्ठान संचलित आदिवासी कोळी समाजाचा १४वा राज्य व राष्ट्रीय वधू-वर परिचय मेळावा रविवार १ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते दुपारी ५ वाजेपर्यंत मुळे सभागृह हरिभाई देवकरण प्रशाला प्रांगण येथे आयोजित केला आहे, अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष शंकर बटगेरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. या मेळाव्यात समाजाच्या इयत्ता १० वी १२ वी मध्ये विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या मेळाव्यात आदिवासी कोळी समाजासह समाजाच्या इतर सर्व पोटजातीच्या समाजबांधवांची प्रथम वधु-वर नोंदणी तसेच घटस्फोटीत यांचीही नोंदणी करण्यात येवून सेवा देण्यात येईल. या पत्रकार परिषदेला संस्थेचे सचिव नागनाथ दोरणाळे, खजिनदार शिवलिंग कोळी, शिवपुत्र जमादार, विश्वनाथ बिदरकोटे, हनुमंत मोतीबने, मनीष कोळी उपस्थित होते.

### सारेगामा कार्यक्रमाचे १ फेब्रुवारीला आयोजन

**सोलापूर, दि.२७ जानेवारी-**
गायक, लेखक, दिग्दर्शक अश्रफ खान यांचा सारेगाना या नावाने तिसरा गाण्यांचा कार्यक्रम १ फेब्रुवारीला सायंकाळी ६ वाजता हुतात्मा स्मृती मंदिर येथे आयोजिल्याची माहिती अश्रफ खान व विवेक कन्ना यांनी पत्रकार परिषदेत दिली. यामध्ये भारतीय चित्रपट संगीतकार आर. डी. बर्मन यांनी संगीतबद्ध केलेले युगलगीत सादर होतील. या शोमध्ये सायली साठे, रेणुका म्हमाणे, स्मिता, चैताली क्षीरसागर, प्रतिमा बेनगी, अश्रफ खान, विवेक कन्ना, अविनाश चिल्ला, बसवराज कोळकुरे, केशव गणपा, गुरु हिबारे, नागोजी संगमनाथ, राजेश कुलकर्णी, अतुल जम्मा, अनिल पतंगे, धनराज थळंगे, सुधाकर मिरजकर, सुहास माने हे आपली कला सादर करतील. यावेळी स्मिता, आरोही जम दार, केशव गणपा आदी उपस्थित होते.

### सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणूक

# विविध राजकीय पक्षांच्या ११६ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त

### १९० अपक्षांचे डिपॉझिट सरकारी तिजोरीत

### सुमारे ६२ टक्के अपक्ष तर ३८ टक्के राजकीय पक्ष उमेदवारांचे प्रमाण

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. २८ जानेवारी-**
सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत किमान आवश्यक मते न मिळाल्याने एकूण ३०६ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे.

दरम्यान, निवडणूक विभागाकडून प्राप्त झालेल्या आकडेवारीनुसार डिपॉझिट जप्त झालेल्या ३०६ उमेदवारांपैकी तब्बल १९० उमेदवार अपक्ष असून हे प्रमाण सुमारे ६२ टक्के आहे. तर विविध राजकीय पक्षांचे मिळून ११६ उमेदवारांचे (३८ टक्के) डिपॉझिट जप्त झाले आहे. सोलापूर महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान तर १६ जानेवारी रोजी मतमोजणी झाली होती. या निवडणुकीत एकूण ५६४ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार एकूण वैध मतांच्या १/६ पेक्षा कमी मतदान पडलेल्या उमेदवारांचे डिपॉझिट (अनामत रक्कम) जप्त होते. त्यानुसार एकूण ३०६ उमेदवारांच्या डिपॉझिट जप्त झाले आहे. राजकीय पक्षांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) १९, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार गट) १४, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे २९, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) १६ आणि शिवसेना (शिंदे गट) १४ उमेदवारांचे डिपॉझिट जप्त झाले आहे. तसेच बहुजन समाज पार्टीचे २० व वंचित बहुजन आघाडीचे १९ उमेदवार आहेत. याशिवाय आम आदमी पार्टी (११), रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले (६), समाजवादी पार्टी (५) तसेच इतर लहान पक्षांचे उमेदवारही डिपॉझिट जप्त झालेल्यांच्या यादीत आहेत. काही पक्षांचे एक ते दोन उमेदवारच रिंगणात उतरले होते, त्यांचेही डिपॉझिट जप्त झाले आहे.

दरम्यान, या आकडेवारीवरून अपक्ष उमेदवारांची संख्या मोठी असल्याने मतविभाजनाचा मोठा फटका बसल्याचे दिसून येते. तसेच राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, शिवसेना, बीएसपी व वंचित बहुजन आघाडी यांचे प्रमाण तुलनेने जास्त असल्याचे चित्र आहे. वाढती उमेदवारी आणि मतांचे विभाजन याचा थेट परिणाम डिपॉझिट जप्त होण्याच्या संख्येवर झाल्याचे या निकालांवरून स्पष्ट होते. यामध्ये माजी महापौर मनोहर सपाटे, ॲड. यू.एन.बेरीया, माजी नगरसेवक बबलू गायकवाड, मधुकर आठवले, रमेश व्हटकर, रियाज खरादी यांच्यासह अन्य उमेदवारांचा समावेश आहे.

### पक्षनिहाय डिपॉझिट जप्त उमेदवार संख्या

| पक्षाचे नाव | उमेदवारांची संख्या |
|---|---|
| अपक्ष | १९० |
| नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) | १९ |
| राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट | १४ |
| भारतीय राष्ट्रीय काँग्रेस | २९ |
| शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) | १६ |
| शिवसेना (शिंदे गट/शिवसेना) | १४ |
| बहुजन समाज पार्टी | २० |
| वंचित बहुजन आघाडी | १९ |
| आम आदमी पार्टी | ११ |
| रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) | ६ |
| भारतीय जनता पार्टी | २ |

| | |
|---|---|
| महाराष्ट्र नवनिर्माण सेना | २ |
| समाजवादी पार्टी | ५ |
| राष्ट्रीय समाज पक्ष | ३ |
| जनविकास क्रांती सेना | ३ |
| ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहाद-उल-मुस्लिमीन | २ |
| जनहित सेवा पक्ष | ३ |
| महाराष्ट्र विकास आघाडी | १ |
| बहुजन मुक्ती पार्टी | १ |
| हिंदुस्तान जनता पार्टी | १ |
| राष्ट्रीय जनमंच (सेक्युलर) | २ |
| प्रहार जनशक्ती पक्ष | २ |
| इतर पक्ष | २ |
| एकूण | ३०६ जणांची डिपॉझिट जप्त झाली आहे. |

## निराळे वस्ती ते शिवाजी महाराज चौक रस्त्याची दुरवस्था धोकादायक

### खडड्मय रस्त्यावरुन जाताना नागरिक पडतात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जानेवारी-**
निराळे वस्ती ते छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याची चाळण झाली असून रस्त्यावर मोठमोठे खड्डे व प्रचंड धूळ पसरली आहे. बुधवारी सकाळच्या सुमारास या खड्डेमय रस्त्यावरून जात असताना एका वृद्ध व्यक्तीचा अपघात होऊन ते रस्त्यावर पडल्याची घटना घडली. सुदैवाने मोठी जीवितहानी टळली असली तरी या घटनेमुळे नागरिकांमध्ये संताप आहे.

निराळे वस्ती ते छत्रपती शिवाजी महाराज चौकाकडे जाणाऱ्या मुख्य रस्ता अतिशय खड्डेमय झाला आहे त्यामुळे आता नागरिकांना तसेच वाहनधारकांना येथून ये जा करणे अवघड झाले आहे. येथील खड्ड्यामुळे वयोवृद्ध नागरिकांचा तोल जाऊन खाली पडण्याच्या घटना घडत आहेत. यामुळे जीविताला धोका होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.त्यामुळे वाहनधारकांसह परिसरातील रहिवासी त्रस्त झाले आहेत. या



रस्त्यावरून दररोज हजारो वाहनांची ये-जा होत असते. संबंधित रस्त्यावर पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू असल्याने रस्ता अधिकच खराब झाला असून काम अर्धवट अवस्थेत असल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. त्यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. महापालिका प्रशासन व या प्रभागातील नगरसेवकांनी तातडीने लक्ष घालून रस्त्याचे काम तसेच पाईपलाईनचे काम त्वरीत पूर्ण करावे. रस्त्याची दुरुस्ती करून धूळ नियंत्रणाची उपाययोजना करावी, अन्यथा भविष्यात गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी जोरदार मागणी वाहनधारक व नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## विद्यापीठाच्या धोरण निश्चितीमुळे शैक्षणिक गुणवत्ता वाढीस मदत होईल : कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर

### सोलापूर विद्यापीठाच्या धोरण पुस्तिकेचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जानेवारी-**
विद्यापीठाच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठी आणि जागतिक दर्जाची गुणवत्ता गाठण्यासाठी स्पष्ट धोरणांची आवश्यकता असते. हेच उद्दिष्ट समोर ठेवून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाने तयार केलेल्या धोरण पुस्तिकेचे प्रकाशन कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांच्या हस्ते पार पडले. या प्रसंगी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर म्हणाले की, कोणत्याही संस्थेची प्रगती ही त्या संस्थेच्या धोरणांवर अवलंबून असते. विद्यापीठाचा विकास साधताना आपण विद्यार्थी हाच केंद्रबिंदू मानला आहे. विद्यार्थ्यांना केवळ पदवी न देता त्यांना जागतिक स्पर्धेत टिकण्यासाठी सक्षम करणे हे ध्येय आहे धोरण निश्चितीमुळे विद्यापीठाच्या सर्वांगीण गुणवत्ता वाढीस मोठी मदत होणार




असल्याचे प्रतिपादन यावेळी कुलगुरूंनी केले. कुलगुरू महानवर म्हणाले की, आगामी काळात विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानासाठी इंडस्ट्रियल व्हिजिट म्हणजेच औद्योगिक भेटींचे मोठ्या प्रमाणावर आयोजन केले जाईल. यामुळे उद्योगांना नेमके कसे म नुष्यबळ हवे आहे, याचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळेल. यावेळी आयक्यूएसी संचालक डॉ. गौतम कांबळे यांनी प्रस्ताविक केले यावेळी आयक्यूएसीच्या माध्यमातून विद्यापीठाचा दर्जा उंचावण्यासाठी ही धोरण पुस्तिका मार्गदर्शक ठरेल, विद्यापीठाने तयार केलेली ही धोरण पुस्तिका म्हणजे केवळ एक दस्तऐवज नसून, ती भविष्यातील प्रगतीची 'ब्लू प्रिंट' आहे. याम ध्ये संशोधन, क्रीडा, सांस्कृतिक कार्य आणि पायाभूत सुविधांच्या विकासाबाबतही निश्चित दिशा ठरवण्यात आली आहे. असे डॉ. गौतम कांबळे यांनी नमुद केले. यावेळी प्र. कुलगुरु लक्ष्मीकांत दामा, प्र. कुलसचिव अतुल लकडे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे नियंत्रक डॉ. श्रीकांत आंधारे यांच्यासह विद्यापीठातील सर्व संकुलांचे संचालक उपस्थित होते.

## आरोग्य, स्वच्छतेसंबंधित कामे अत्यंत दर्जेदार टिकाऊ पद्धतीनेच पूर्ण करा : डॉ. ओम्बासे



### सोलापूर महानगरपालिकेच्या सार्वजनिक शौचालय दुरुस्ती कामांची आयुक्तांकडून प्रत्यक्ष पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ जानेवारी-**
सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती करताना गुणवत्तेवर कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. नागरिकांच्या आरोग्य व स्वच्छतेशी संबंधित कामे अत्यंत दर्जेदार व टिकाऊ पद्धतीनेच पूर्ण करावीत, अशा स्पष्ट सूचना आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी दिल्या.

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध भागांतील सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती व नूतनीकरणाची कामे हाती घेण्यात आली असून काही ठिकाणी ही कामे पूर्ण झाली आहेत, तर काही ठिकाणी सध्या प्रगतीपथावर आहेत. या पार्श्वभूमीवर आज महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी संबंधित ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, सहायक आयुक्त शशिकांत भोसले, सार्वजनिक आरोग्य कार्यकरी अभियंता व्यकटेश चौबे, मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, विभागीय अधिकारी सुनीता हिबारे, जावेद पानगल यांच्यासह मुख आरोग्य निरीक्षक, आरोग्य निरीक्षक उपस्थिती होते.

या पाहणीदरम्यान आयुक्त डॉ. ओम्बासे यांनी दुरुस्ती पूर्ण झालेल्या तसेच सुरू असलेल्या सार्वजनिक शौचालयांची पाहणी करून कामाच्या गुणवत्तेबाबत सविस्तर आढावा घेतला. काम दर्जेदार झाले आहे की निकृष्ट दर्जाचे आहे, वापरात नागरिकांना अडचणी येत आहेत का, स्वच्छता, पाणीपुरवठा, प्रकाशव्यवस्था तसेच देखभाल याबाबत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली.

यावेळी आयुक्तांनी परिसरातील नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या, सूचना व अपेक्षा जाणून घेतल्या. नागरिकांनी काही ठिकाणी झालेल्या कामाबाबत समाधान व्यक्त केले, तर काही ठिकाणी अजून सुधारणा आवश्यक असल्याच्या सूचना दिल्या. नागरिकांच्या सूचनांची दखल घेत आयुक्तांनी संबंधित ठेकेदार व विभागीय अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सुधारणा तातडीने करण्याचे निर्देश दिले. शहर स्वच्छ, सुंदर व आरोग्यदायी ठेवण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असून सार्वजनिक सुविधांची गुणवत्ता सुधारण्यासाठी अशा प्रकारच्या प्रत्यक्ष पाहणी नियमि तपणे करण्यात येणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

## एस.टी. डेपो नियंत्रण कक्षांच्या निष्क्रिय संपर्क क्रमांकामुळे प्रवासी त्रस्त



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २८ जानेवारी-**
एस.टी. प्रवाशांना बसची वेळ, विलंब, रद्दीकरण अथवा पुढील गाडीची माहिती मिळावी यासाठी प्रत्येक डेपो व नियंत्रण कक्षामध्ये अधिकृत संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात आलेले असतात. मात्र, सोलापूर एस.टी. डेपो व नियंत्रण कक्षातील अधिकृत संपर्क क्रमांक अनेकदा अकार्यक्षम असल्याचे आढळून येत आहे.

अनेक वेळा हा बंद आहे किंवा आऊट ऑफ ऑर्डर आहे असा संदेश मिळतो किंवा कॉलला कोणताही प्रतिसाद मिळत नाही. या तुटलेल्या व निष्क्रिय संपर्क व्यवस्थेमुळे प्रवाशांना कोणताही विश्वासार्ह माहितीस्त्रोत उपलब्ध राहत नाही. याचा गंभीर परिणाम ज्येष्ठ नागरिक, महिला, विद्यार्थी, कामगार तसेच आपत्कालीन प्रवास करणाऱ्या प्रवाशांवर होत असून, ही बाब एस.टी. महामंडळाच्या सेवा-विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करणारी व सार्वजनिक हिताला बाधा आणणारी आहे. यावर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (MSRTC) सोलापूर विभाग यांनी तातडीने कार्यवाही करण्याच्या मागणीसाठी सुराज्य अभियान यांच्या वतीने नागेश जाधव, (नियंत्रक विभाग) यांना निवेदन देण्यात आले. याकडे दुर्लक्ष झाल्यास सोलापूर जिल्ह्यात एस.टी. डेपो नियंत्रण प्रणालीच्या निष्क्रियतेविरोधात तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा सुराज्य अभियानने दिला आहे. सुराज्य अभियानने ही गंभीर समस्या सोलापूर विभाग नियंत्रक यांच्यासमोर ठोसपणे मांडली. यावेळी सुराज्य अभियानचे राजेंद्र पलनाटी, दत्तात्रय पलमारी गोपीचंद व्हनमारे, किशोर जगताप हे उपस्थित होते.

### सुराज्य अभियानच्या या आहेत प्रमुख मागण्या

**१.** सर्व डेपोतील अधिकृत लँडलाइन क्रमांक तातडीने दुरुस्त करून ते २४ तास कार्यरत ठेवा. **२.** प्रत्येक डेपो व नियंत्रण कक्षासाठी एक स्थिर लँडलाइन व एक अधिकृत मोबाईल क्रमांक (बॅकअप) नियुक्त करावा. सर्व कार्यरत संपर्क क्रमांकांची सत्यापित व अद्ययावत यादी MSRTC च्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करा. **३.** ही यादी डेपोतील सूचना फलकावर स्पष्टपणे दिसेल अशा स्वरूपात प्रदर्शित करा. **४.** निष्क्रिय क्रमांक किंवा कॉलला प्रतिसाद न देणे ही सेवा-त्रुटी मानून संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांची प्रशासकीय जबाबदारी निश्चित करावी. **५.** संपर्क प्रणालीची गुणवत्ता राखण्यासाठी तिमाही पडताळणी (Quarterly Verification) सक्तीची करावी. **६.** जिल्हानिहाय आपत्कालीन हेल्पलाइन प्रतिदिन २४ तास कार्यक्षम ठेवून तिची माहिती व्यापकपणे प्रसिद्ध करावी. **७.** नियंत्रण कक्षातील सेवा-गुणवत्ता सुनिश्चित करण्यासाठी कॉल रेकॉर्डिंग व मॉनिटरिंग प्रणाली लागू करावी. **८.** सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत पारदर्शकता, विश्वासार्हता व प्रवाशी-हिताचे संरक्षण अत्यंत आवश्यक आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी - १३४०

**आतां शरीरें बहुतें । देखोनि न भेद हो चित्तें ।**
**जे मन बुध्यादि भूतें । एकेंचि येथें ।।**

मायेमुळे अण्डज, स्वेदज, उद्भिज, आणि जारज कसे निर्माण होतात, याचे स्पष्टीकरण भगवंत करीत आहेत. आकाश आणि वायू यांच्या संपर्काने गर्भाला पोषक असा रस वाढला असता त्यातुन अण्डज तयार होतो. तमोगुण, रजोगुण यांना पोटात घालुन पाणी आणि अग्नी यांच्या अधिक्याचा उठाव झाला असता स्वदेज निर्माण होतो. पाणी आणि पृथ्वी यांच्या उत्कर्षाने आणि तमोगुणाने स्थिर असा उद्भिज तयार होतो. पांच कर्मेंद्रिये पाच ज्ञानेंद्रिये परस्पर साह्य करणारी होऊन मन बुध्दी इत्यादीकांनी सज्ज झाली म्हणजे जारज तयार होतो. हे सर्व निर्माण करणारी माया, संभ्रम निर्माण करणे, विविध संकल्प करणे इत्यादी प्रकारचे कार्य सहज करीत असते.



या मायेचा नाश होणे अत्यंत अवघड आहे. पण ही माया मात्र कशाचाही नाश करू शकते. मायेचा नाश हा केवळ एका ब्रम्हज्ञानानेच होवु शकतो असे भगवंत म्हणाले. मायेने जो विश्वाचा पसारा मांडला आहे त्याला माझी सत्ता साहय झाली असल्याचेही ते म्हणाले. हा पसारा माझ्यापासून व मायेपासून झाला असल्याने मी विश्वाचा पिता व माया माता झाली आहे. अर्जुना या विश्वाचा पसारा मी आणि मायेने जरी मांडला असला व यांत वेगवेगळे जीव दिसत असले तरी तु मात्र या जीवनांत वेग-वेगळे समजु नको. त्यांच्यात भेद पाहु नको. ही शरीरे वेगळे दिसत आहेत, म्हणून तुझ्या अंत:करणात भेद येऊ देवू नकोस. कारण की या सर्व शरीरात मन-बुध्दी-अहंकार आणि पंचमहाभुते ही या जगातील आठ तत्वे समावलेली आहेत. हे सांगतांना भगवंत म्हणाले,

**आतां शरीरें बहुतें । देखोनि न भेद हो चित्तें ।**
**जे मन बुध्यादि भूतें । एकेंचि येथें ।।**

एका शरीरात भिन्न अवयव दिसत असले तरी ते सर्व एका शरीराचेच असतात, त्याप्रमाणे या जगात वेगवेगळे शरीर, जीव दिसत असले तरी ते सर्व एकाच परम पित्याने निर्माण केले आहेत, हे लक्षात असु दे. एकाच वृक्षाच्या ठिकाणी काही फांद्या उंच, काही फांद्या खुज्या, काही सरळ, काही वाकड्या दिसत असल्या व त्या एकमेकापासुन भिन्न दिसत असल्या तरीही त्या सर्व एकाच बीजापासुन आलेल्या असल्याने त्याला भिन्न समजणे योग्य होणार नाही. अग्नी आणि ज्वाला किंवा समुद्र आणि लाटा जसे एकच आहेत, तसे मी आणि हे चराचर एकच आहे. मला या चराचरापासुन कोणत्याही परिस्थितीत वेगळे समजु नकोस, असे भगवंत अर्जुनाला म्हणाले. अर्जुनाने भिन्नत्व पाहु नये, म्हणुन चाललेले भगवंताचे हे बोलणे माऊली आपणाला खुप स्पष्टीकरण करून सांगत आहेत. त्याचे कारण असे की अर्जुन एखाद्यावेळेस क्वचीतच भिन्नत्व पाहत असेल पण आपण तर पावलो पावली भिन्नत्व पाहतो. असे भिन्नत्व पाहणे आपल्या दृष्टीने योग्य नसल्याने, आपणांमध्ये समदृष्टी निर्माण होऊन, आपणाला चोहीकडे समानता दिसावी असा माऊलींचा हेतु आहे. आपले श्रोते ज्या दिवशी सर्वत्र समत्व पाहतील व समत्व अनुभवतील तेव्हा खऱ्या अर्थाने सर्वांबरोबर आपणालाही आनंद होईल असेही माऊली म्हणतात. माऊलींची ही अपेक्षा पुर्ण करण्यासाठी व आत्मानंदी होण्यासाठी आपणही सर्व जीवंत समत्व पाहु या. अशा समत्व पाहण्याने अनेक समस्या आपोआप मिटणार आहेत हे लक्षात असू द्यावे. जय जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

**वार : गुरुवार,**
**दि. २९ जानेवारी २०२६**
**विक्रम संवत् २०८२ । शके -१९४७**
**संवत्सर - विश्वावसु**
**मास - माघ. शु. अष्टमी**
**ऋतु - हेमंत ।**
**नक्षत्र- रोहिणी (०७३१)**
**योग - ऐंद्र (२०.२७)**
**करण - बव (२४.३२)**
**राहू काल : गुरुवार : दु. १.३० ते ३.००**

**दिनविशेष : १७८०: जेम्स ऑगस्टस हिकी यांनी कलकत्ता जनरल ॲडव्हर्टायझर या नावाने एक साप्ताहिक सुरू केले. पुढे याचे वर्तमानपत्रात रुपांतर झाले.**
*** १८६१: कॅन्सास हे अमेरिकेचे ३४ वे राज्य बनले.**
*** १८८६: कार्ल बेंझ यांना जगातील पहिल्या इंजिनवर चालणार्या मोटरगाडीचे पेटंट मिळाले.**

# शहरात प्रजासत्ताक दिनानिमित्त संस्कृतीचे दर्शन घडवणारे संचलन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २८ जानेवारी-**

**सोलापूर शहर परिसरात ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त विविध शाळा, महाविद्यालय, संस्था, संघटनांतर्फे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रजासत्ताक दिनाचे निमित्त साधून विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतावर आधारित संगीतमय कवायतीचे आयोजन करण्यात आले होते. शहरात ठिकठिकाणी एकता, अखंडता आणि संविधानाचा गौरव करण्यात आला. यावेळी शौर्य आणि संस्कृतीचे दर्शन घडवणारे संचलन करण्यात आले.**

## बटरफ्लाय इंग्लिश मीडियम स्कूल

बटरफ्लाय इंग्लिश मिडीअम स्कूल मध्ये प्रजासत्ताक दिन साजरा झाला संस्थेचे अध्यक्ष ॲड. एस. आर. पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. याप्रसंगी संस्थेचे खजिनदार शंकर पाटील, विश्वस्त राजेंद्र मायनाळ, कॉलेज ऑफ आर्किटेक्चरचे प्राचार्य निरंजन संगावार, प्रशालेच्या माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका डॉ. रश्मी कुंभार, पाथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका रश्मी पूर्वत उपस्थित होते. शालेतील विविध क्रीडा स्पर्धेत नैपुण्य मिळवलेल्या व शासकीय रेखाकला परीक्षेत अ श्रेणी प्राप्त गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या निर्देशानुसार क्रीडा शिक्षिका रफिया लंगोटे व प्रशिक्षिका आरती मलजी यांच्या मार्गदर्शनाखाली देशभक्ती गीतांवर



विद्यार्थ्यांनी कवायत संचलनाचे सादरीकरण केली. सूत्रसंचालन प्रशालेच्या सहशिक्षिका स्वप्ना शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली इ.१० वीच्या विद्यार्थीनी प्रिया कुमावत व वैष्णवी पोलू यांनी केले कार्यक्रमाची सांगता पौष्टीक खाऊवाटपाने झाली.



## चतुरबाई श्राविका विद्यालय व महावीर हायस्कूल

प्रजासत्ताक दिनानिमित्त चतुरबाई श्राविका विद्यालय व महावीर हायस्कूल येथे ध्वजारोहण सोहळा पार पडला. प्रमुख पाहुणे सुरेखा विकास मरगूर आणि अनिता श्रीमंत सुर्यवंशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका रुपाली चेंडके मॅडम होत्या. प्रारंभी सरस्वती, प.पू.श्री.समंतभद्र महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.



## संभाजीराव शिंदे विद्या मंदिर

संभाजीराव शिंदे विद्या मंदिर विडी घरकुल, येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून संस्था अध्यक्ष डॉ. सुर्यप्रकाश कोठे, संस्था सदस्या डॉ. राधिका चिलका, मार्गदर्शक वासूदेव ईप्पलपल्ली, मार्गदर्शीका तनूजा मारपल्ली हे लाभले. तसेच प्रशालेचे प्रभारी मुख्यध्यापक सतीश मल्लाव, ज्यू कॉलेजचे प्रमुख प्रा.नवनाथ व्हटकर, प्राथमिक विभागच्या प्रमुख श्रीमती सविता बरबडे हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरूवात प्रमुख पाहूण्यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. कार्यक्रमाची सांगता वंदे मातरमने झाली, शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. सूत्रसंचालन दत्तात्रय नरोटे यांनी केले. तर आभार गीता गोटीपामूल यांनी मानले.

## चाँद तारा उर्दू शाळा

चाँद तारा उर्दू प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रसिद्ध कॅन्सर तज्ञ डॉ. फहिम गोलीवाले यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले तर अध्यक्षस्थानी बशीर अहमद बागवान होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या अध्यक्षा डॉ. जे.बी. बागबान, डॉ. परवेजआलम अतनुरकर उपस्थित होते. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी देशभक्तीवर गीते, भाषणे व सांस्कृतीक कार्यक्रम सादर केले तसेच विद्यार्थ्यांनी सामुहिक कवायद सादर केले व असाक्षर मुक्त शाळेची शपथ घेतली तसेच विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या वेशभुषा



परिधान केले होते. मुख्याध्यापिका सौदागर गजाला यांनी प्रस्ताविक केले. सूत्रसंचालन खतिब उम्मे हबीबा यांनी तर आभार शेख शमीम यांनी मानले.



## एन. के. किडस् स्कूल

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून बाळे राजेश्वरी नगर येथील एन.के किडस् स्कूलमध्ये एल.के.जी. वर्गाचे पालक सचिन पिसके व शुभांगी पिसके यांनी शाळेला अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची भेट दिली. याप्रसंगी खंडोबा देवस्थानचे चेअरमन विनय ढेपे, राजु आलुरे, विकास कस्तुरे, शाळेच्या मुख्याध्यापिका श्वेता कस्तुरे, दिपाली कुलकर्णी, अश्विनी शिंगण, पुनम कळसाईत, सेविका संगीता हेगडकर उपस्थित होते.



## मध्य रेल्वे सोलापूर इन्स्टिटयुट

येथील डॉ. बी.आर. आंबेडकर क्रीडा संकुल, रेल्वे इन्स्टिटयूट मैदानावर प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा यांच्या हस्ते राष्ट्रध्वज फडकवण्यात आला. सोलापूरचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक यांनी मानवंदना स्वीकारली आणि रेल्वे सुरक्षा दल, नागरी संरक्षण आणि स्काऊट्सच्या तुकड्यांनी सादर केलेल्या संचलनाची सलामी घेतली. डॉ. सुजीत मिश्रा यांनी उपस्थितांना संबोधित करताना सर्व रेल्वे कर्मचारी, त्यांचे कुटुंबीय आणि उपभोक्त्यांना हार्दिक शुभेच्छा दिल्या. सोलापूर विभागातील ३६ रेल्वे कर्मचाऱ्यांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेसाठी सन्मानित करून प्रशस्तिपत्रे प्रदान करण्यात आली.

## नूतन प्रशाला

श्री नूतन प्रशाला विजापूर रोड येथे भारताचा प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला, ऑपरेशन सिंदूर हा देखावा दाखवून विद्यार्थ्यांनी, काश्मिरची सध्या परिस्थिती दाखवली, देशभक्तीपर गीते, लोकशाहीची मूल्ये, यावर आधारित चारोळ्या कवीता, प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. प्रमुख पाहुणे नगरसेविका ज्ञानेश्वरी देवकर, मुख्याध्यापक शहापुरे सुरज, यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. याच कार्यक्रमाचे औचित्य



साधून प्रशालेत साक्षरता अभियान, स्वच्छता सप्ताह, घेण्यात आला. सूत्रसंचालन, कुमारी लोभे, प्रास्ताविक अनंत कुमार रणदिवे यांनी केले तर आभार अनुश्री गोरडे यांनी मानले.

## हरिभाई देवकरण प्रशाला

हरिभाई देवकरण प्रशालेच्या भव्य प्रांगणात सर्व संस्थांचे प्रमुख एकत्रित येऊन संयुक्तिक प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्रमुख माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर नु.म.वी शिशु शाळेतील विद्यार्थ्यांनी संचलन गीतावर आधारित नृत्य सादर केले. प्राथमिक शाळेतील इयत्ता दुसरीच्याच्या विद्यार्थ्यांनी सुंदर नृत्य सादर केले. प्रजासत्ताक दिनाचे निमित्त साधून सोलापूर जिल्हा मुख्यालय स्तरावर पाच हजार विद्यार्थ्यांचे देशभक्तीपर गीतावर आधारित संगीतमय कवायतीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, सोलापूर महानगरपालिका मुख्य लेखाधिकारी डॉक्टर रत्नराज जवळगेकर, प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, म.न.पा प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी सुलभा वठारे, माध्यमिकचे उपशिक्षणाधिकारी मल्हारी माने, म.न.पा प्राथमिक शिक्षण मंडळाचे श्री ढेपे आदी उपस्थित होते. यावेळी साक्षरतेची प्रतिज्ञा तसेच बालविवाह विरोधी प्रतिज्ञा



म्हणून घेण्यात आली. पाहुण्यांचा सत्कार मुख्याध्यापिका दीपा पाठक यांच्या हस्ते करण्यात आला. एसपीएम इंग्लिश मीडियम शाळेने नाटक सादर केले. विद्यार्थिनींनी वंदे मातरम या गीतावर नृत्य सादर केले. सूत्रसंचालन प्रमोद चुंगे यांनी केले.

## प्रभाग क्र. २३ मध्ये प्रजासत्ताक दिन साजरा

प्रजासत्ताक दिन या दिनाच्या औचित्य साधून सुरुवात प्रभाग २३ येथील भागात स्वामी विवेकानंद नगर दोन विघ्नहर्ता गणेश सभागृहात प्रमुख अतिथी नूतन नगरसेविका ज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते व उपस्थितीत मंडल अध्यक्ष महेश देवकर, पर्यावरण संरक्षण गतिविधी जिल्हा संयोजक मदन पवार, पूर्णमव्हिजन सृष्टीचे सीईओ डॉ. राजेश मनेरिकर, इको नेचर क्लबचे अध्यक्ष डॉ. मनोज देवकर यांच्या उपस्थितीत करण्यात आला. तसेच प्रमुख उपस्थिती पर्यावरण संवर्धनासाठी कार्य करणाऱ्या संस्था व्यक्ती व सोसायटीतील नागरिक यांनी आपापल्या घरातून इलेक्ट्रिकल गॅझेट



व इतर इलेक्ट्रॉनिक वस्तू गोळा करून ते संकलन करण्यात आले. यावेळी आरती आरगडे, इको नेचर क्लबच्या सदस्या उमा दिगिनाल, जलसंधारण अधिकारी गजानन होळकर, रेल्वे विभागाचे अधीक्षक श्रीपती देगीनाल, पर्यावरण प्रेमी मानसी गोरे, ऋषिकेश पाटील, सागर पाटील, शाम कदम, संगीता घागरे, करुणा कदम, मोहन बरंकाल आदी उपस्थित होते. प्रभाग २३ मधील प्रत्येक सोसायटीमध्ये हे संकलन केंद्र करण्यात येणार आहे. ज्ञानेश्वरी महेश देवकर या सोलापूर महानगरपालिका व लोकसहभाग व या संस्था यांना एकत्र करून प्रभाग २३ प्रदूषणमुक्त प्लास्टिक मुक्त कचरा मुक्त करण्याचा संकल्प केला आहे.. कचरा संकलनासाठी प्रयत्नशील असणाऱ्या सर्व मान्यवरांचा सत्कार ही करण्यात आला. नवनिर्वाचित प्रतिनिधीचा सत्कार ही करण्यात आला ई-कचरा संकलनासाठी ९६२३५३८९९९ हा संपर्क क्रमांक देण्यात आला आहे. प्रदूषण मुक्त प्लास्टिक मुक्तसाठी सर्वांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन करण्यात आले.

## छत्रपती शिवाजी शैक्षणिक संकुल

छत्रपती शिवाजी शिक्षण संकुलातर्फे प्रजासत्ताक दिनी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर माननीय श्री मनोहर सपाटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रशालेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुजाता जुगदार यांनी प्रास्ताविक केले. माजी उपमुख्याध्यापक प्रा अनिल लोंढे व प्रशालेतील विद्यार्थ्यांनी ध्वजगीत व देशभक्तीपर गीत सादर केले. तसेच याप्रसंगी संकुलातील विविध स्पर्धेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा अध्यक्षांच्या हस्ते व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी वेटलिफ्टिंग स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थी श्रीनिवास कदम यांचा सत्कार करण्यात आला. तसेच दैनिक लोकमत जिल्हास्तरीय आर्चरी राऊंड मध्ये सर्वज्ञ गाढवे, वैष्णवी पौळ यांनी प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल सत्कार करण्यात आला. तसेच विविध स्पर्धा परीक्षेत आणि क्रीडा स्पर्धेत यश मिळवलेले कुमारी जेनिफर बद्धिपुडी, नंदिनी बंडगर, जिक्कवा लोणार, अभय यादव, रुद्र जावळे, मनस्वी तानवडे यांचा सत्कार करण्यात आला.. तसेच यावेळी प्रशालेतील एनसीसी ऑफिसर आशा राठोड यांना तीन स्टार मिळाल्याबद्दल आणि राजस्थान येथील ट्रेकिंग कॅम्प यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. प्रशालेतील एनसीसी ऑफिसर गगन अंकुशे यांना दोन स्टार मिळाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. प्रशालेतील सहशिक्षिका रत्नावली माळी व सौ अश्विनी भोसले यांनी टीईटी परीक्षेत प्रथम प्रयत्नात यश संपादन केल्याने त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास संस्थेचे सेक्रेटरी राजेंद्र शिंदे, प्राथमिक विभागाचे शालेय समिती चेअरमन विनायक पाटील, संचालक अशोक चव्हाण, मुकुंद जाधव, मंगेश जाधव, मुख्याध्यापिका सुजाता जुगदार, प्राचार्य नितीन मोटे, प्राचार्य मंजुश्री पाटील, प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका उषा गोकळे, उपमुख्याध्यापक श्रीपादराव जगदाळे, पर्यवेक्षक सुरेश जगताप व किरण देशमुख, विजया मोटे, एनसीसी प्रमुख आशा राठोड



व गगन अंकुशे, आरएसपी प्रमुख विजय वाडेकर, नितीन गोरे, खाऊवाटप प्रमुख चव्हाण जनार्दन उपस्थित होते.

## प्रजासत्ताक दिन...



**करकंब : येथील स्नेहल पवन तिटंबे यांच्या श्लोक पवन तिटंबे (वय-३) व स्वामिनी पवन तिटंबे (वय-३ तीन महिने) या बालकांनीही या उत्साहात सामील होऊन देशप्रेमाच्या भावना व्यक्त केल्या. त्या बालकांनी देशाप्रती दाखविलेल्या देश प्रेमाबद्दल त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.**




### वखारिया विद्यालय, बार्शी

उपळे दुमाला येथील श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वखारिया विद्यालयात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. विद्यालयाचे मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांनी प्रथम महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करुन ध्वजारोहण केले. राष्ट्रगीत, राज्य गीत, ध्वजगीत गायनानंतर संगीत कवायतचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख सहशिक्षक रमेश लंकेश्वर यांनी तर सूत्रसंचालन सहशिक्षक एन.एन. महाले यांनी केले. ग्रामस्थांच्या आणि मान्यवरांचे उपस्थितीत विविध स्पर्धेत प्राविण्ये मिळवलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांचे हस्ते बक्षीसे देण्यात आली.



### हर्षवर्धन हायस्कूल, तळे हिप्परगा

हर्षवर्धन हायस्कूल हिप्परगे तळे (ता. उत्तर सोलापूर) येथे प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला यावेळी ध्वजारोहण संस्था सदस्य श्रीमती पुष्पा लोंढे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव विठ्ठलराव गरड हे होते. कार्यक्रम सादर करण्यासाठी प्रशालेतील सहशिक्षिका श्रीमती मीरा माने व पल्लवी दराडे यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी प्रशालेचे मुख्याध्यापक लक्ष्मण राऊत यांनी प्रजासत्ताक दिनाची माहिती तसेच प्रजासत्ताक दिन का साजरा केला जातो ? याविषयी माहिती दिली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन लोंढे, संस्था सदस्य विपुल गंभीरे, प्रशालेचे माजी मुख्याध्यापक उद्धव ढेकळे उपस्थित होते. प्रास्ताविक शांताराम सालगुडे, सूत्रसंचालन श्रीमती पल्लवी दराडे आभार सुरेश शिंदे यांनी मानले.



### वेळापूर ग्रामपंचायत, वेळापूर

वेळापूर ग्रामपंचायत येथे प्रजासत्ताक दिन विविध गुणदर्शन कार्यक्रमाने उत्साहात साजरा करण्यात आला. प्रारंभी वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी वेळापूर ग्रामपंचायतीच्या वतीने विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला माजी सरपंच विमल जानकर, वेळापूर सरपंच रजनीश बनसोडे, उपसरपंच नानासाहेब मुंगूसकर, रिपाई माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, ग्रामपंचायत सदस्य अमृतराव माने देशमुख, दीपकआबा राऊत, हनुमंत वायदंडे, रविराज गायकवाड, डॉ. स्नेहल जानकर, प्रियंका आडत, सीमा खाडे, विमल जाधव, ग्रामपंचायत अधिकारी कैलास सुरवसे, अशोक बनसोडे, मीनाक्षी सरवदे, मनीषा भानवसे, सौ अनिता बनसोडे, विजय बनसोडे, युवराज मंडले, शंकर आडत, दिलीप बनसोडे, सुनील साठे, प्रदीप सरवदे, मनोहर माने, अजीत साठे, स्वप्निल सरवदे, रायचंद खाडे, धनंजय शिवपुजे, दादा कांबळे, समील साठे, बजरंग कानगे, दीपक माने उपस्थित होते.



### बार्शी आगारात १४ चालकांचा सन्मान

बार्शी बस आगारात प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. आगार व्यवस्थापक श्रीमती मधुरा संदिपान जाधवर यांच्या हस्ते ध्वजारोहण होऊन राष्ट्रगीत व मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी चालक, वाहक आणि प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगारातील सुरक्षित प्रवासाचा संकल्प करण्यात आला. यावेळी उपस्थित सर्वांनी राष्ट्रगीत गाऊन तिरंग्याला मानवंदना दिली. या कार्यक्रमाला आगार व्यवस्थापक श्रीमती मधुरा जाधवर तसेच आगार लेखाकार विजय बुटे, स्थानक प्रमुख विजय हांडे, सहाय्यक वाहतूक अधीक्षक नितीन गावडे, वाहतूक निरीक्षक गणेश चव्हाण, सहाय्यक कार्यशाळा अधीक्षक आकाश नाईक हे उपस्थित होते. याप्रसंगी देशाला सेवा देणाऱ्या सैनिकांचे व एसटी कर्मचाऱ्यांचे स्मरण करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये १४ चालकांना आगारप्रमुख श्रीमती जाधवर यांच्या हस्ते सुरक्षित सेवेचा बिल्ला, प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देण्यात आले. सूत्रसंचालन वरिष्ठ लिपीक पुरुषोत्तम वाघुलकर यांनी केले व वरिष्ठ लिपीक महेंद्र क्षीरसागर यांनी आभार मानले.

# श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्तनिवास येथे ध्वजारोहण

### श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेस विशेष अलंकार

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२६ जानेवारी -**
श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास येथे भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. श्री ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर) यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मंदिर समितीच्या सदस्या शकुंतलाताई नडगिरे, प्र. व्यवस्थापक संदेश भोसले, लेखा अधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख पृथ्वीराज राऊत, संजय कोकीळ, राजेंद्र सुभेदार, बलभिम पावले, विनोद पाटील, भिमाशंकर सारवाडकर, राजेश पिटले, पांडूरंग बुरांडे, अतुल बक्षी, सावता हजारे, राजेंद्र घागरे, शंकर मदने तसेच मंदिर समितीचे अधिकारी व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून मंदिर परिसर व श्री विठ्ठल रुक्मिणी भक्तनिवास संपूर्णपणे तिरंगा रंगाची आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता. तसेच फुलांची नयनरम्य आरास करण्यात आल्याने परिसरात देशभक्तीपर वातावरण निर्माण झाले होते.



याशिवाय, मंदिर समितीच्या श्री संत तुकाराम भवन येथील अन्नछत्रामध्ये भाविकांसाठी भोजनप्रसादात गोड पदार्थाचा समावेश करण्यात आला होता. याचा सुमारे दोन हजार भाविकांनी लाभ घेतला. दर्शनरांगेतील वाढती गर्दी लक्षात घेऊन भाविकांसाठी चहापान तसेच खिचडी वाटपाची व्यवस्था देखील करण्यात आली आहे. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने श्री विठ्ठल रुक्मिणी मातेस अलंकार परिधान करण्यात आले होते. श्री विठ्ठलास सोने मुकुट, बालाजी नाम, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हिऱ्याचा कंगन जोड, मोत्याचा तुरा, शिरपेच, मत्स्य जोड, तोडे जोड, तुळशीची माळ, मोहरांची माळ, अष्टपैलू मण्याची कंठी, पदकासह लॉकेट, तांदळ्या हार, सूर्यकळ्याचा हार, झनक हार आदी तसेच श्री रुक्मिणी मातेस सोने मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, तांबडी चिंचपेटी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ, हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी अलंकार परिधान करण्यात आले होते.



### दत्त प्राथमिक व दिलीपराव सोपल प्रशाला, बार्शी

येथील दिलीपराव सोपल प्रशाला व दत्त प्राथमिक विद्यामंदिर बार्शी या दोन्ही शाळेत प्रजासत्ताक दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मेजर दत्तात्रय मोरे, प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेच्या सचिवा तेजस्वी ठोंगे, प्रमुख उपस्थिती म्हणून नानासाहेब चौधरी, बबलू साळुंखे, तानाजी वाघमोडे, सागर झोळ, वर्षा जगताप, सविताताई झिंझुरके, दत्त प्राथ. चे मुख्याध्यापक श्रीकांत कुंभारे, दिलीपराव सोपल प्रशालेचे मुख्या. सचिन काळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रमुख पाहुणे व व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. मानवंदना कुंभारे यांनी दिली. ध्वजारोहणानंतर संगीतमय सामूहिक कवायत घेण्यात आली. सूत्रसंचालन युवराज जगताप यांनी तर आभार संतोष ठोंबरे यांनी मानले.

### कासेगाव मधील बिरोबा वस्ती जि.प. शाळेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**कासेगाव,दि.२८ जानेवारी-**
कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील बिरोबा वस्ती जिल्हा परिषद शाळेत प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात व आनंदात साजरा करण्यात आला नेताजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष दिलीप चौगुले यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. यावेळी अध्यक्षस्थानी सोसायटीचे माजी चेअरमन तुकाराम जाधव होते. तर प्रमुख अतिथी म्हणून कासेगावचे तलाठी आरिफ हुडीवाले, ग्राम पंचायत सदस्या सुरेखा चौगुले, केंद्रप्रमुख पुरुषोत्तम कोळी, तंटामुक्तीचे अध्यक्ष संजय पवार, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुनील आवताडे, सामाजिक कार्यकर्ते सुधीर चौगुले, उस्मान शेख, रणजीत चौगुले उपस्थित होते. यावेळी शालेय विद्यार्थ्यांनी कवायत सादर करून उपस्थित उपस्थितांची मने जिंकली. याबरोबरच सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. मुख्याध्यापक राजशेखर बुरकुले यांनी प्रास्ताविक केले. यावेळी इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांचे भाषण झाले. यावेळी पवार, चौगुले, कोळी यांनी मनोगत व्यक्त केले. वाघमारे यांनी आभार मानले.



## बार्शीत सर्वत्र शासकीय प्रजासत्ताकदिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२७ जानेवारी-**
बार्शी शहरात सर्वत्र प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नगरपरिषद, तहसील कार्यालय, बाजार समितीसह शासकीय झेंडावंदन भगवंत मैदानावर झेंडावंदन करण्यात आले. पोलीस उपअधीक्षक कार्यालयात सकाळी झेंडावंदन करण्यात आले.

नगरपरिषदेत नूतन नगराध्यक्षा तेजस्विनी कथले यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी तैमूर मुलाणी, विरोधी पक्षनेते नागेश अक्कलकोटे, नगरसेवक भारत पवार, संतोष बारंगुळे, नगरसेविका विद्या बंगाळे, सरस्वती भानवसे, सायरा मुल्ला, कर अधिकारी विठ्ठल पाटोळे, अधिकारी महादेव बोकेफोडे उपस्थित होते. पोलीस उपअधीक्षक कार्यालयात पोलीस उपअधिक्षक अशोक सायकर यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले. यावेळी सर्व पोलीस कर्मचारी उपस्थित होते. भगवंत मैदान येथे शासकीय झेंडावंदन तहसीलदार एफ. आर. शेख यांनी केले. यावेळी नगराध्यक्षा तेजस्विनी कथले, प्रशांत कथले, उपनगराध्यक्ष रोहित पाटील, पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक दिलीप ढेरे, निवासी नायब तहसीलदार सुभाष बदे, रवींद्र सानप आदी अधिकारी गण उपस्थित होते. श्री शिवाजी महाविद्यालय, श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज तर कवायतमध्ये सुलाखे हायस्कूल, जिजामाता, उर्दू शाळा, न्यू हायस्कूल आदी शाळा सहभागी झाल्या होत्या.



### शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेज, सांगोला

सांगोल्यातील शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थेचे सचिव अंकुशराव गायकवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर राष्ट्रगीत, ध्वजगीत आणि महाराष्ट्र गीताचे गायन केले. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच देशसेवा, शिस्त, एकता व सामाजिक बांधिलकी जपावी, युवकांनी देशाच्या प्रगतीसाठी ज्ञान, कौशल्य आणि नैतिक मूल्यांचा उपयोग करावा, असे आवाहन अंकुशराव गायकवाड यांनी मनोगतात केले. संस्थाध्यक्ष बाबुराव गायकवाड यांनीही सर्वांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## सीतामाता शेळके प्रशालेत प्रजासत्ताक दिन उत्साहात



**अक्कलकोट,दि.२८ जानेवारी-**
नागणसूर (ता.अक्कलकोट) येथील श्रीमती सीतामाता शेळके प्रशालेत ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थाध्यक्ष अखिल भारतीय शिवाचार्य संघटनेचे उपाध्यक्ष श्री ष. ब्र. श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी व बम्मलिंग देवरु यांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतीय संविधानाचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर ध्वजपूजन व ध्वजारोहण करण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी राष्ट्रगीत, राज्य गीत, ध्वज गीत सादर केले. शरदचंद्र गंगोंडा यांनी संविधान प्रास्ताविक सादर केले. यावेळी विविध देशभक्तीगीतांवर संगीत कवायत घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त सहभाग घेतला. त्यानंतर विजयी विश्व तिरंगा प्यारा, स्वागत गीत, जयस्तुते जयस्तुते श्री महान्मंगले हे स्फुर्तिदायक गीत सादर केले. कुष्ठरोग निर्मूलन व साक्षर अभियान संदर्भात शपथ घेण्यात आली. यावेळी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झालेली ज्योती प्याटी हिचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. गंगोत्री मठपती, श्रवंती लिंबितोटे, अश्विनी धनशेट्टी, अंबिका मायनाळे, ज्योती प्याटी, वैष्णवी शिवूर, आकांक्षा देशमुख, साक्षी गगोंडा आदी विद्यार्थ्यांनी भाषणातून प्रजासत्ताक दिनाचे महत्व सांगितले. यावेळी श्रीकंठ शिवाचार्य महास्वामीजी म्हणाले, विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत भारतीय संस्कृती जपणे काळाची गरज आहे. आपल्या देशाचे आचार विचार जगात सर्वश्रेष्ठ असल्याने प्रत्येकांनी पाळावे व देश सेवा करावी. मुख्याध्यापिका विणा पाटील, सहशिक्षक काशिनाथ फुलारी, महबूब नागणसूर, रामेश्वर सोलापुरे, शरदचंद्र गंगोंडा, शिवकुमार गंगोंडा यांनी परिश्रम घेतले. यावेळी उपसरपंच शरणप्पा प्रचंडे, तंटामुक्त अध्यक्ष प्रसाद प्रचंडे, नागणसूर केंद्रप्रमुख इराप्पा गजा, श्रीमंत धनशेट्टी, सचिव जगन्नाथ गंगोंडा, धर्मा प्रचंडे, चंद्रकांत खिलारी, गुरप्पा दरगोंडा, शिवपुत्र धनशेट्टी, गंगप्पा हडपसर, सिद्धाराम गंगोंडा, गजानन प्रचंडे, श्रीशैल गगोंडा, बसवराज हनमगोंडा, लक्ष्मण हनमगोंडा, बसवराज मलगोंडा आदी यावेळी उपस्थित होते. उपस्थित विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले.



### जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कासारवाडी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारवाडी येथे प्रजासत्ताकदिनी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शाळेतून सर्व विद्यार्थ्यांची शिस्तबद्ध आणि लेझीमसह प्रभातफेरी काढण्यात आली. ग्रामपंचायत कार्यालय कासारवाडी येथील ध्वजारोहण ग्रामसेविका एम. टी. सोनवणे यांच्या हस्ते करण्यात आले. शहीद मेजर विठ्ठल खांडेकर यांच्या स्मारकासमोरील ध्वजारोहण मेजर शिवाजी गुंड यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कासारवाडी येथील ध्वजारोहण शाळेचे मुख्याध्यापक सुधाकर बडे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर संगीत कवायत घेण्यात आली. प्रास्ताविक बाळासाहेब मुंढे यांनी केले. कासारवाडी शाळेचा माजी विद्यार्थी अमित शिंदे याने शाळेस साठ हजार रुपये किमतीचा संगणक भेट दिला. शहीद मेजर विठ्ठल रामा खांडेकर यांच्या कुटुंबीयाने शाळेस एक सिलिंग फॅन भेट दिला. मुख्याध्यापक सुधाकर बडे यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमास सरपंच अश्विनी मंडलिक, उपसरपंच सुधीर गायकवाड, शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा प्रीती कांबळे, उपाध्यक्षा अंबिका खाडे, नितीन मंडलिक, माजी सरपंच राकेश मंडलिक, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष शरद गुंड, ग्रामसेविका सोनवणे, अतुल कांबळे उपस्थित होते.



### आदर्श पब्लिक स्कूल, कुर्डूवाडी

येथील आदर्श पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे प्रजासत्ताक दिन देशभक्तीपूर्ण वातावरणात पार पडला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे सहाय्यक आयुक्त मारुती फडके यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.अमोल सुरवसे हे होते. यावेळी गटशिक्षणाधिकारी विकास यादव, एपीआय मांजरे , सामाजिक कार्यकर्ते नरेशजी पाटील, उद्योजक रमेश कोंढारे, संस्थेचे सचिव दयानंद सुरवसे,संचालक मोहन सुरवसे,शिवाजी हावळे, संचालिका आशा सुरवसे, वर्षा सुरवसे उपस्थित होते. सूत्रसंचालन गणेश ठवरे, विजयकुमार लोंढे व सागर बोमनवाड यांनी केले.




### वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय, बार्शी

येथील श्री वर्धमान जैन सार्वजनिक तालुका वाचनालय येथे प्रजासत्ताक दिन श्री जैनाश्रमचे प्रविणचंद सुराणा व परिवार यांच्या हस्ते ध्वजारोहणाचा कार्यक्रम करण्यात आला. वाचनालयाचे आनंद पुनमिया यांनी सूत्रसंचालन व प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुणे प्रविणचंद चांदमल सुराणा यांचा सत्कार मणिलालजी बोथरा यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच शालेय राष्ट्रीय बुध्दीबळ स्पर्धेमध्ये देशात पहिला नंबर मिळवल्याबद्दल सान्वी दत्तात्रय गोरे हिचा सत्कार करण्यात आला. यावेळी जैनाश्रमचे युवक माणिक सुराणा, महावीर दुगड, आशोक सुराणा, पियुष कोटेचा, सचिन छेडा, किरण श्रीश्रीमाळ, इंद्रपाल कुंकूलोळ, ऑ.सेक्रेटरी आनंद पुनमिया, संचालक धिरज कुंकूलोळ,आनंद सुराणा, प्रमोद भंडारी, अशोक कांकरिया उपस्थित होते, संचालक आनंद सुराणा यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वाचनालयाचे ग्रंथपाल सुरेश यादव, क्लार्क विराज पतंगे, सहा. ग्रंथपाल शितल लुकडे यांनी परिश्रम घेतले.



### आदर्श विद्यालय, सांगोला

सांगोल्यातील वामनराव शिंदे साहेब आदर्श विद्यालयात ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संस्थाध्यक्षा कौशल्यादेवी शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले. यानंतर समर्थ विद्यार्थी-समर्थ भारत संकल्प या उपक्रमा अंतर्गत संकल्प अभियान प्रशालेत राबवण्यात येवून विद्यार्थ्यांकडून सामुदायिक प्रतिज्ञा व वाचन घेण्यात आले. या अभियानाचा मुख्य उद्देश सचिव निलकंठ शिंदे यांनी मनोगतात सांगितला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक आर.एम.पवार यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. ध्वजारोहणास मानवंदना एस.एस.कुंभार यांनी दिली.

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## योगेश खटकाळे यांच्या प्रयत्नातून कडलास येथे रस्त्याचे काम पूर्ण



**सांगोला, दि.२८ जानेवारी -**

सांगोला तालुक्यातील कडलास येथील जि.प.प्रा.शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाल्याने शाळकरी मुले व पालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. ही समस्या कडलास येथील युवकांनी योगेश खटकाळे यांच्या निदर्शनास आणून दिली.

त्यांनी तात्काळ दखल घेत संबंधित यंत्रणेला सूचना दिल्या. त्यांच्या आदेशानुसार रस्त्याची दुरुस्ती करून देण्यात आली. सदर रस्त्याचे काम पूर्ण झाल्यामुळे शाळेत ये-जा करणाऱ्या लहान मुलांना व पालकांना मोठा दिलासा मिळाला आहे. ग्रामस्थांनी या तातडीच्या आणि प्रभावी कार्यवाहीबद्दल समाधान व्यक्त केले आहे. माजी आ.शहाजीबापू पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जनतेच्या प्रश्नांवर त्वरित उपाययोजना करण्याची जी परंपरा आहे, त्याच परंपरेनुसार हे काम पूर्ण करून देण्यात आले असे यावेळी ग्रामस्थांनी सांगितले. तसेच येथे निसर्ग संवर्धनासाठी मान्यवरांच्या आर्थिक सहभागातून वृक्षारोपण करण्यात आले.



### महत्त्वाचे



### अहिल्यादेवी यांनी समाजोपयोगी राज्य कारभार केला : कुलगुरु डॉ. महानवर

**बार्शी, दि.२८ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली असून, पर्यावरण संवर्धनविषयक कामगिरी देखील अतिशय महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असे प्रतिपादन पुअहो विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रकाश महानवर यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे पुअहो अध्यासन आणि श्री शिवाजी महाविद्यालयातील इतिहास विभागाच्या संयुक्त विद्यम ने आयोजित करण्यात आलेल्या एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उदघाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव होते. यावेळी जेष्ठ साहित्यिक रघुराज मेटकरी, पुअहो अध्यसनाचे संचालक डॉ. प्रभाकर कोळेकर, डॉ. मुरहरी केळे, प्राचार्य डॉ. अब्दुल शेख, इतिहास विभाग प्रमुख डॉ. विष्णू वाघमारे आदी मान्यवर उपस्थित होते. बीजभाषक जेष्ठ साहित्यिक रघुराज मेटकरी म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या राज्य कारभाराची हजारो कागदपत्रे सरकारने खुली केली आहेत. नव संशोधकांनी कागदपत्राच्या आधारे अहिल्यादेवींचे दुर्लक्षित राहिलेले कार्य समाजापुढे ठेवावे. अध्यक्षीय समारोपात डॉ. यादव यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आणि कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपले जीवन अर्थपूर्ण जगावे. तसेच ऑक्सफर्ड विद्यापीठाप्रमाणे सोलापूर विद्यापीठातही नव संशोधक निर्माण व्हावेत असे त्यांनी मत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. प्रभाकर कोळेकर यांनी, सूत्रसंचालन डॉ. रविकांत शिंदे यांनी तर आभार डॉ. सोमनाथ यादव यांनी मानले.




### बोचरेवस्ती शाळेत वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात; ४० हजारांची बक्षिसे

**करकंब, दि.२८ जानेवारी-**

जि.प.प्रा.शाळा बोचरेवस्ती या प्रशालेचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात संपन्न झाले. पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत या विद्यार्थ्यांचे ४० हजार रुपयांची रोख बक्षिसे देऊन कौतुक केले. स्नेहसंमेलनाचे उदघाटन केंद्रप्रमुख दशरथ मोरे व करकंब रोटरी क्लबचे अध्यक्ष डॉ.अक्षय मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दिलीप माने, उपाध्यक्ष विजय पवार, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पेहे, करकंब, उंबरे केंद्रातील विद्यार्थी, शिक्षक, पालक, महिला, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी विद्यार्थी, विद्यार्थिनींनी गणेश वंदन, विविध प्रकारची गीते, गवळणी, भारुड, समाज प्रबोधनपर नाटक, गोंधळगीत, विनोद, शेतकरी व कोळीगीते सादर करून त्यांनी आपल्या कला सादर केल्या. विविध प्रकारची गीते, नृत्य सादर करत विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक नवनाथ कवडे,शिक्षक संतोष कापसे, सोमनाथ पवार,शिक्षिका मंगल माने शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष सदस्य यांनी परिश्रम घेतले.

# टेंभुर्णी पोलिस ठाण्यातून पोक्सो गुन्ह्यातील आरोपी फरार

## पोलीस कस्टडीत असताना बाथरूमजवळून पळ काढण्यात यश; नाकाबंदी व व्यापक शोधमोहीम सुरू

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२८ जानेवारी-**

टेंभुर्णी पोलीस ठाण्यात पोक्सो कायद्यांतर्गत दाखल गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यातील आरोपी पोलीस कस्टडीतून फरार झाल्याची खळबळजनक घटना मंगळवारी (दि.२६) दुपारी घडली. या घटनेमुळे पोलीस यंत्रणेसह संपूर्ण टेंभुर्णी परिसरात एकच खळबळ उडाली. आरोपी अद्याप फरार आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस उपनिरीक्षक पुरुषोत्तम धापटे हे करीत आहेत. सदर गुन्ह्यातील आरोपी श्रीकृष्ण अंकुश लांडे (वय २८ वर्षे, रा. परिते, ता. माढा, जि. सोलापूर) यास दि. २३ जानेवारी २०२६ रोजी पहाटे १.५८ वाजता अटक करण्यात आली होती. न्यायालयाने त्यास दि. २७ जानेवारी २०२६ पर्यंत पोलीस कस्टडी मंजूर केली होती. तपासादरम्यान आरोपीच्या सुरक्षेसाठी पोहेकॉ परांडे व पो.कॉ. देशमुख यांची गार्ड म्हणून नेमणूक करण्यात आली होती. मंगळवारी तपास कामकाज सुरू असताना आरोपीस लघवीसाठी पोलीस ठाण्याच्या मागील बाजूस असलेल्या बाथरूमकडे पोहेकॉ परांडे हे घेऊन गेले. आरोपी लघवी करून बाहेर येताच त्याने अचानक पोहेकॉ परांडे यांच्या हाताला जोराचा हिसका देत तेथून पळ काढला. ही बाब लक्षात येताच पोहेकॉ परांडे यांनी मोठ्याने आरडाओरडा केला. त्यावेळी पोलीस उपनिरीक्षक पुरुषोत्तम धापटे, पो.कॉ. देशमुख तसेच खाजगी इसम शुभम शिंदे यांनी तात्काळ आरोपीचा पाठलाग केला. मात्र सुमारे दुपारी ४.३८ वाजण्याच्या सुमारास आरोपी पळून गेल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली. घटनेनंतर तातडीने संपूर्ण पोलीस यंत्रणा कामाला लागली. सपोफौ माळी, सपोफौ रणदिवे, पोहेकॉ जगताप, पोहेकॉ सरडे, पोहेकॉ लांडगे, पोहेकॉ आरकिले, पोहेकॉ शिंदे, पोना झोळ, पो.कॉ. मुलाणी, सपोफौ झिंजे, पो.कॉ. इंगोले यांना आरोपीच्या शोधासाठी रवाना करण्यात आले आहे. तसेच नियंत्रण कक्ष व शेजारील पोलीस ठाण्यांना नाकाबंदी करण्याबाबत तातडीने सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, फरार झालेल्या आरोपीविरुद्ध स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा पुढील तपास PSI मदने करीत आहेत. मात्र सायंकाळ उशिरापर्यंत आरोपी पोलिसांच्या हाती लागलेला नव्हता. टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, फरार आरोपी श्रीकृष्ण अंकुश लांडे याचे वय २८ वर्षे असून त्याची उंची सुमारे ५ फूट ६ इंच आहे. त्याचा रंग सावळा असून ओळखीची खूण बारीक दाढी आहे. पळताना त्याने हिरवा टी-शर्ट व काळी पॅन्ट परिधान केली होती. आरोपी ऊसाच्या शेतात किंवा आजूबाजूच्या पिकांमध्ये लपून बसलेला असण्याची शक्यता असून, कोणत्याही शेतकऱ्यास किंवा नागरिकास सदर संशयित आढळून आल्यास तात्काळ टेंभुर्णी पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी केले आहे. या घटनेमुळे टेंभुर्णी व परिसरात खळबळ उडाली असून पोलीस प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.



श्रीकृष्ण लांडे




## अमोल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट

**तभा वृत्तसेवा.**
**करकंब, दि.२६ जानेवारी-**

अभिछाया प्रतिष्ठान संचलित अमोल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय करकंब येथील विद्यार्थ्यांनी क्षेत्रभेटी अंतर्गत अकलूज येथील शिवामृत दूध संघ, विनय वाघदरे यांची केशर आंबा नर्सरी, गांडूळ खत प्रकल्प, मत्स्य प्रकल्पांची पाहणी केली.

विद्यार्थ्यांनी केशर आंबा कलम करण्याची पद्धत, मत्स्यप्रकल्प गांडूळ प्रकल्प यांना भेट देऊन त्याविषयी माहिती समजावून घेतली. शिवामृत दूध संघ अकलूजचे कार्यकारी संचालक रविराज इनामदार व त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना या पदार्थांच्या उत्पादनाची विभागवार माहिती देऊन मार्गदर्शन केले. मानव आणि पर्यावरणातील गुंतागुंतीचे संबंध प्रत्यक्ष अनुभवता आल्याने, विशिष्ट ठिकाणाला प्रत्यक्ष भेट देऊन तेथील भौगोलिक, सामाजिक सांस्कृतिक, ऐतिहासिक, पर्यावरणीय गोष्टींचा सखोल अभ्यास करावयास मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व समाधान दिसून येत होते.

याप्रसंगी प्रशालेचे प्राचार्य अजित पवार, कृषी विज्ञान व तंत्रज्ञान विषय शिक्षक प्राध्यापक प्रमोद रेडे, शिक्षक सागर शेटे, विपुल गोसावी, शिक्षिका लक्ष्मी माने, अनिता मोरे, सविता चंदनशिवे, पूनम गायकवाड, राधा शिंदे मदतनीस आदी उपस्थित होते.

> विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानापलीकडे जाऊन प्रत्यक्ष अनुभवा, भौगोलिक व सामाजिक घटकांचे प्रत्यक्ष दर्शन व्हावे, नकाशे, पुस्तके अथवा चित्राऐवजी प्रत्यक्ष ठिकाणास भेट देऊन हवामान, माती, वनस्पती, प्राणी, लोकजीवन यांचा अनुभव मिळावा. मानवीवस्ती, शेती उद्योगासारख्या वर्गात शिकलेल्या भौगोलिक, सामाजिक संकल्पना प्रत्यक्ष पाहता याव्यात या उद्देशाने या क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते.
>
> **- प्राचार्य अजित पवार,**
> अमोल माध्य. उच्च माध्य.
> विद्यालय, करकंब.

## पोक्सो प्रकरणात ॲड.संगीतराव यांना जामीन

**तभा वृत्तसेवा.**
**टेंभुर्णी, दि.२६ जानेवारी-**



टेंभुर्णी पोलिस ठाण्यात परस्परविरोधी तक्रार दाखल झालेल्या होत्या. त्यात एका अल्पवयीन मुलीवर अत्याचार केल्याच्या संबंधित प्रकरणात ५ संशयित व्यक्तिविरोधात फोक्सो.गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या वकील अजिंक्य संगीतराव यांना बार्शी न्यायालयाने गुरुवार जामीन मंजूर केला आहे.

या प्रकरणात विविध व्यक्तींविरोधात तक्रारी दाखल झाल्या असून, संपूर्ण प्रकरण सध्या तपासाच्या प्रक्रियेत आहे. अजिंक्य संगीतराव यांच्यावर या प्रकरणात थेट स्वरूपाचा कोणताही आरोप नसून, त्यांचा सहभाग असल्याबाबत अद्याप ठोस पुरावे समोर आलेले नाहीत, असा युक्तिवाद बचाव पक्षाने न्यायालयात केला.

तसेच, या प्रकरणात परस्परविरोधी तक्रारी दाखल झाल्याने संपूर्ण बाब गुंतागुंतीची असल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. अजिंक्य संगीतराव यांना भीमानगर हद्दीतील पुणे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील एका हॉटेलमधून अटक करण्यात आली होती. मात्र, सर्व बाबींचा विचार करून न्यायालयाने त्यांना ५० हजार रुपयांच्या जात मुचलक्यावर जामीन मंजूर केला. या प्रकरणात आरोपींच्या वतीने जेष्ठ वकील ड. आर.आर पाटील यांनी बाजू मांडली, तर सरकारतर्फे ड. देशमुख यांनी काम पाहिले. यावेळी ड. अजिंक्य संगीतराव यांचेवतीने ड.आर. आर.पाटील, ड. राहूल मिरगणे, ड. संतोष साळी यांनी काम पाहिले. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या वकील अजिंक्य संगीतराव यांना बार्शी न्यायालयाने गुरुवार जामीन मंजूर केला आहे.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने तपास सुरू असताना आरोपीला जामीन देणे योग्य ठरेल, असा निर्णय दिला. न्यायालयाच्या निर्णयामुळे अजिंक्य संगीतराव यांना मोठा दिलासा मिळाला असून, पुढील चौकशीत सत्य समोर येईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## आर्या कॉलेज फार्मसीची कोल्हापूरच्या एस.जी. फाइटोफार्मा कंपनीस भेट

**टेंभुर्णी, दि.२८ जानेवारी-**




टेंभुर्णी येथील आर्या कॉलेज ऑफ फार्मसी च्या विद्यार्थ्यांनी डी फार्मसी अभ्यासक्रमाच्या फार्मसी क्षेत्रभेटी अंतर्गत कोल्हापूर मधील एसजी फायटो फार्मा प्रायव्हेट लिमिटेड या औषध निर्माण कंपनीस भेट दिली. या भेटीदरम्यान कंपनीमधील व्यवस्थापकांनी व कर्मचाऱ्यांनी कंपनीमधील सर्व कामकाजाबद्दल तसेच फार्मासिस्टचे फार्मा कंपनीमधील महत्त्व,कार्य याबद्दल सविस्तर माहिती दिली. विद्यार्थ्यांनी कंपनीमधील सर्व विभागास भेटी दिल्या जसे की औषधे बनवणारी यंत्रसामग्री, लेबलिंग, पॅकेजिंग, स्टोरेज तसेच पावडर फॉर्मुलेशन, कॅप्सूल, टॅबलेट, लिक्विड फॉर्मुलेशन या सर्व विभागांना भेटी देऊन माहिती संग्रहित केली. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे व शंकेचे निवारण कंपनीमधील कर्मचाऱ्यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय चव्हाण यांनी कंपनीच्या व्यवस्थापकांचे व सर्व कर्मचाऱ्यांचे आभार मानले.

## अलीपूर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२८ जानेवारी-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित, राजर्षी शाहु लॉ कॉलेज, बार्शी यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत मौजे अलीपूर येथे आयोजित सात दिवसीय विशेष श्रम संस्कार निवासी शिबिराचे उद्घाटन मोठ्या उत्साहात संपन्न झाले.

'शाश्वत विकासाच्या दिशेने युवकांची भूमिका : जलसंधारण व्यवस्थापन व पडीक जमीन विकास' या अत्यंत महत्त्वपूर्ण विषयावर हे शिबीर दि. २३ ते २९ जानेवारी या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. शिबिराचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. माया मीठ्ठा यांनी केले. आपल्या मनोगतात त्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व विशद करताना, विद्यार्थ्यांनी केवळ शैक्षणिक प्रगतीपुरते मर्यादित न राहता समाज आणि राष्ट्राच्या उभारणीसाठी कार्य करावे, असे आवाहन केले. शिबिराचे उद्घाटन सरपंच श्री.अशोक मुंढे यांच्या हस्ते झाले. राष्ट्रीय सेवा योजना ही केवळ एक उपक्रम नसून ती विद्यार्थ्यांच्या जीवनाला दिशा देणारी चळवळ असल्याचे त्यांनी नमूद केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. रत्नदीप सोनकांबळे हे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांनी शिबिराच्या माध्यमातून गावात जाऊन लोकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवावा आणि आपल्या कार्याचा ठसा उमटवावा, असे प्रेरणादायी आवाहन केले. युवकांच्या ऊर्जेचा योग्य दिशेने वापर झाला तर देशाचा शाश्वत विकास निश्चित साध्य होऊ शकतो.

या उद्घाटन समारंभास उपसरपंच, कृषी अधिकारी, ग्रामसेवक, सर्व अलीपुर गावचे सदस्य, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक गायकवाड, दळवी, महाविद्यालयातील आय.क्यू.ए.सी.समन्वयक प्रा. शिकारे मॅडम, प्रा.कुलकर्णी मॅडम, सुरवसे मॅडम, हरदडे मॅडम, साखरे मॅडम, प्रा. शेख, खोत, तायडे, वडणे, कार्यालयीन कर्मचारी गव्हाणे, वाघे, शेळके, माने, कोल्हे, ठोंबरे उपस्थित होते. तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे एकूण ५० स्वयंसेवक या शिबिरात सहभागी झाले आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा संचालक डॉ. दत्तप्रसाद सोनटक्के यांनी प्रभावी व संयोजित पद्धतीने केले. कार्यक्रमाचे आभार प्रा. समाधान काळे यांनी मांडले.

या सात दिवसांच्या शिबिरामध्ये जलसंधारण, पडीक जमीन विकास, ग्रामस्वच्छता, वृक्ष लागवड , मतदार जनजागृती, योगाचे महत्त्व प्रशिक्षण व सामाजिक बांधिलकी जोपासणारे विविध उपक्रम राबविण्यात येणार असून या माध्यमातून युवकांमध्ये राष्ट्रनिर्माणाची जाणीव अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

## तमाशा कलावंत खेडकर म्हणाले, हा सोन्याचा दिवस

### 'पद्मश्री' जाहीर होताच प्रतिक्रिया देताना भावुक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, ता.२७ जानेवारी -**

माझ्यासाठी हा दिवस सोन्याचा आहे. पांडुरंगाच्या कृपेने माझ्या आयुष्याचे सार्थक झाले. शेवटच्या श्वासा पर्यंत रंगमंचावर कला सादर करण्याची शक्ती रंगशारदा देवीने द्यावी, अशी भावना ज्येष्ठ तमाशा कलावंत रघुवीर खेडकर यांनी व्यक्त केली. यावेळी रघुवीर खेडकर भावूक देखील झाले होते.

विशेष म्हणजे भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पहिल्यांदाच मनोरंजन आणि समाज प्रबोधन करणाऱ्या तमाशाला केंद्र सरकारने पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मान केला आहे. या निमित्त खेडकर यांची भेट घेऊन त्यांच्याशी वार्तालाप करुन दैनिक तरुणभारतच्या प्रतिनिधीने त्यांच्या भावना जाणून घेतल्या.


तमाशा फडावर असतानाच पुरस्काराची माहिती


केंद्र सरकारने पद्मश्री पुरस्कार जाहीर केल्यानंतर रघुवीर खेडकर यांनी भावना व्यक्त केली. रघुवीर खेडकर यांच्या तमाशाचा फड सध्या शेजारील सांगोल्या मध्ये आला आहे. तमाशाच्या मंचावर असतानाच पद्मश्री पुरस्कार मिळाल्याची माहिती श्री. खेडकर यांना मिळाली. तिसरी पिढी कार्यरत

रघुवीर खेडकर म्हणाले की, वयाच्या दोन वर्षांपासून तमाशाच्या मंचावर मी उभा राहिलो. या क्षेत्रातील माझी आई गुरु आहे. आईच्या चरणी मी हा पुरस्कार समर्पित करतो. तमाशाच्या माध्यमातून सम ाज प्रबोधन व मनोरंजनाचे काम करत आलो आहे. माझी ही तिसरी पिढी या क्षेत्रात काम करत आहे.

**प्रामाणिकपणे केलेल्या कामाचे चिज**

आतापर्यंत प्रामाणिकपणे केलेल्या कामाचे या पुरस्कारामुळे माझे चीज झाले आहे. माझ्यासाठी आजचा सोन्याचा दिवस आहे. तमाशा लोककलावंताच्या अनेक समस्या आहेत. तमाशा कलावंतांसाठी सरकारने दरमहा चांगले मानधन द्यावे, त्यांना राहण्यासाठी कायमस्वरूपी निवास व्यवस्था द्यावी, तालुक्याच्या ठिकाणी तमाशा भवन उभारण्यात यावे, अशा विविध मागण्या संदर्भात मी केंद्र सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे यावेळी श्री.खेडकर यांनी सांगितले.







## रोटरी क्लब ऑफ करकंबला गोल्ड मेंबरशिप चॅम्पियन पुरस्कार

**तभा वृत्तसेवा.**
**करकंब, दि.२८ जानेवारी-**

रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट ३१३२ यांच्यावतीने रोटरी क्लब ऑफ करकंब यांनी सदस्य संख्यावाढ व संघटन बळकटीकरणासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल गोल्ड मेंबरशिप चॅम्पियन हा मानाचा पुरस्कार रोटरी डिस्ट्रीक्ट संमेलनात गोवा येथे प्रांतपाल सुधीर लातुरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.




यावेळी करकंब रोटरीचे संस्थापक अध्यक्ष डॉ.प्रशांतकुमार मोरे,क्लब डायरेक्टर रघुनाथ जाधव,रोटरीन बाळासाहेब शिंगटे उपस्थित होते. रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ अंतर्गत रोटरी चळवळीचा विस्तार करण्यासाठी रोटरी क्लब ऑफ करकंब यांनी सातत्यपूर्ण व समर्पित प्रयत्न केले.क्लबच्या या कार्याची दखल घेत डिस्ट्रिक्ट स्तरावर त्यांचा गौरव करण्यात आला.क्लबने दाखवलेले नेतृत्व,निष्ठा,सेवाभाव आणि संघभावना यामुळे रोटरीच्या युनिट फॉर गुड या ब्रीदवाक्याला प्रत्यक्ष कृतीतून साकार करण्यात यश मिळाले असल्याचे प्रमाणपत्रात नमूद करण्यात आले.या पुरस्कारामुळे रोटरी क्लब ऑफ करकंबने भविष्यातही समाजोपयोगी व रोटरी मूल्यांवर आधारित उपक्रम अधिक जोमाने राबविण्याचा निर्धार केला. रोटरी अध्यक्ष डॉ.अक्षय मोरे,सचिव लक्ष्मण जाधव,रोटरीन शार्दुल शहा, सुनिल दुधाणे,धनंजय इदाते,डॉ. विनोद शिंगटे,राहुल पुरवत,धनंजय गुळमे,सुरेंद्र इदाते,प्रा.किसन सलगर, शाम महामुनी हे नेहमीच परिश्रम घेतात.